PRATISAAD PRODUCTIONS’

MARATHI FEATURE FILM

‘DHAPPA’

FINAL DRAFT DIALOUGES

BY KSHITIJ PATWARDHAN

BLANK SCREEN

1. Int-Ext/ Mausi Home, Amruta Home, wada/Day

FEMALE VO: हो, अहो जुळल्यात ना, बावीस गुण! दोन अधिक दोन चार! बेस्ट आकडा आहे! म्हणूनच म्हणलं लवकर भेटून घ्यावं.

CUT TO...

एक मुलगा वाडयातून चालत चालत, इकडे तिकडे पहात भिंतीच्या दिशेनी चालत येतोय. बाकी मुलं वेगवेगळया दिशेला पळतायत.

CUT TO...

फोनचा माऊथपीस दिसतो.

बाई २ (फोनवर): त्यांनी सगळं सांगितलं तेव्हाचं मला वाटलं होतं छान आहे स्थळ!... अर्थात हिने नाही पाहीला अजून...

CUT TO...

मुलगा भिंतीजवळ टेकून राज्य घेतो.

मुलगाः दहा...वीस... तीस...

CUT TO...

बाई १ः हयाला पण मी आत्ता मागे लागून उभा केलाय लग्नाला... आँ? नाही नाही काही प्रॉब्लेम नाहीये... नॉर्मलच आहे. उलट जरा जास्तच नॉर्मल आहे.

CUT TO...

मुलगा भिंतीजवळ टेकून राज्य घेतो.

मुलगाः पन्नास साठ सत्तर...

CUT TO...

बाई २ः मल आज उदया सुटटी आहे. आणि तिलाही. तेव्हा  भेटून घेऊयात आपण.

CUT TO...

बाई १ः उत्तम! मग उदयाच येतो, मी आणि हे, पंप्या नाहीये नेमका, सॉरी हां, म्हणजे आमचा हृषिकेश! नाही नाही मी मावशी त्याची. मंदोदरी मधुसूदन कुलकर्णी. हां...

CUT TO...

मुलगाः ऐंशी नव्वद शंभर...

CUT TO...

मोबाईल कट केला जातो.

CUT TO...

फोन ठेवला जातो.

CUT TO...

मुलगाः रेडडी का?

CUT TO...

2. Int/ Amruta Home/ Day

खिडकीतून काही मुलं डोकावून पहातायत. समोर एक माणूस बसलेला आहे. हे अमृताचे वडील. त्यांच्या शेजारी एक मित्र.

वडीलः आमचे वंशज पेशव्यांच्या दरबारातले हिशोब तपासनीस. एवढंच काय, पुण्यातली पहिली सायकल विकत घेतली ती माझ्या पणजोबांनी! त्यांच्यामुळे सायकलचा वापर सुरु केला लोकांनी पुण्यात. काय हो?

मित्रः हो हो.

आई त्यांच्याकडे पाहून शांतपणे समोर पहाते.

आईः (विषय बदलायचा म्हणून) अं, म्हणूनच मी म्हणलं आज हे पण असतील तेव्हा बोलता येईल नीट.

काकाः आपण काय करता?

वडीलः फ्रीलान्सिंग प्रिंटींग करतो मी. पाहीजे तेव्हा आणि पाहीजे तसं काम करतो. आजही जमणार नव्हतं, पण हिला म्हणलं, बघायला येणार असतील तर थांबतो मी. ही नको नकोच म्हणत होती, मीच मागे लागून थांबलो.

काकाः आपणच बोलत बसलोय इतक्या वेळ... तुम्ही तिला बोलवा ना...

आईः अगं बाई, लक्षातच आलं नाही माझ्या... आलेच.

मावशी पर्स बाजूला ठेवते. साडीतली मुलगी आणि आई बाहेर येतात. त्यांचे फक्त पाय दिसतायत. टेबलवर चहा ठेवला जातो. मुलीचा फक्त हात दिसतो.

काका चहा घेतात. बघून हसतात.

मुलगी बसलीये. आई शेजारी आहे. मुलगी रेस्टलेस होऊन पाय हलवतीये. आई फटका मारते पाय थांबतो.

मावशीः छान आहे हो!

आईः तोही आला असता तर बरं झालं असतं.

मावशीः मुलखाचा लाजाळू आहे तो, मला म्हणाला मी बोलायचं मुलीशी? म्हणलं आता बोलताना एवढा लाजतोयस उदया मुलं होताना किती लाजशील.

वडील आणि मित्र हसतात.

मावशीः बाकी सगळं छान आहे पण, उत्तम शिकलाय, चांगल्या कंपनीत आहे, स्वतःचा फ्लॅटही घेतलाय. काय नाही म्हणून नाही. (समोर पहात) तू घे खायला?

मुलगी खायला घेते. तिचा फक्त हात दिसतो. चमचा ठेवायच्या नादात खाली सांडतो.

मावशीः राहू दे, राहू दे. (आईला) तुमची मुलगी फोटोपेक्षा प्रत्यक्षात जास्त चांगली दिसते. आपण बोलूच. (तिला) मग उदया भेटा तुमच्या त्या सीसीडी का फिसीडी ला, काय? (आईला) दोघं शोभून दिसतील एकदम!

आई हसते.

CUT TO...

3.Ext/Road/Evening

एक स्कार्फ गुंडाळलेली मुलगी गाडी लावते. हाताला अॅक्सलरेटरचं ग्रीस तसंच लागलंय. स्कार्फ काढते. केसांवरुन हात फिरवते. गडबडीत आत तशीच चालत जाते. गाडीला किल्ली तशीच राहीलेली दिसते.

CUT TO…

3A.Int/Coffee Shop/Evening

अमृता स्कार्फ पूर्ण काढून समोर उभी रहाते. इकडे तिकडे पहाते. प्रश्नात पडते.

अमृताः (जोरात) ह्रषिकेश…

तिघे वळून पहातात.

अमृताः अं… मुलगी बघायला आलेला...?

एकच हात खाली जातो.

अमृताः (स्वतःशीच) आईच्चा घो… (पुन्हा पहात) अमृता सानेला बघायला आलेला… ??

ह्रषि तिच्याकडे पहातो. उठतो. जवळ जातो.

ह्रषिः मी... (ती हसते.) उशीर झाला तुला खूप...

अमृताः ॲक्चुली रस्त्यात एकाला मारलं म्हणून वेळ लागला. कट मारला मुददामून, मग काय दिली किल्ली म्हात्रे पुलावरुन खाली टाकून.

ह्रषिः बाप रे!

अमृताः अं... (इकडे तिकडे पहात) मला भूक लागलीये, खायला जाऊयात??

CUT TO...

4. Int/Restaurant/ Evening

लहान मुलाचा हसणारा चेहरा दिसतो. अमृता त्याला वेडावून दाखवतेय. थोडया वेळाने त्याला कडेवर घेते.

अमृताः कसला गोड आहे हा! नाव काय याचं?

ओ देशपांडे अशी हाक ऐकू येते. ह्रषि तिकडे पहातो. एक ओळखीचा येतो. त्याला मिठी मारतो.

ह्रषिः अरे कसा आहेस देशमाने? बऱ्याच वर्षांनी?

मित्रः हो रे... (अमृता कडे पहात) क्या बात है यार, कॉंग्रॅटस... नमस्कार वहीनी... मी मंदार...

अमृता वळून पहाते.

ह्रषिः (कपाळावर हात मारुन घेतो.)

अमृता हसायला लागते. मित्राला बोलावते. बाळाला परत आईकडे देते. खुणेनीच सांगते.

मित्र त्याकडे पहातो. त्याला लक्षात येतं.

मित्रः हरकत नाही. सॉरी, चल कंटीन्यू... भेटू नंतर... (अमृताला) बाय!

ह्रषिः (हसून बसतो) फायनली! मी ह्रषिकेश देशपांडे.

अमृताः ऑफ कोर्स! मी अमृता साने. (दोघं एकमेकांकडे पहातात.) आता काय बोलायचं असतं?

दोघं हसतात. म्युझिक सुरु होतं. त्यांच्यात बोलणं सुरु होतं. टाईम ट्रान्झिशन. थांबतं.

अमृताः मस्त आहेस तू. मला मजा आली तुझ्याबरोबर गप्पा मारायला.

ह्रषिः मलाही.

अमृताः म्हणजे डन?

ह्रषिः (हसत) मी कळवतो लवकरच.

अमृताः बरं, गोड खाणार काही? डेझर्ट, आईस्क्रीम वगैरे? खाशील! (हाक मारते) अरे, केशव दोन आईस्क्रीम.

ह्रषिः (आश्चर्याने) तू ओळखतेस वेटर ला?

अमृताः नाही सहज, मी काहीही हाक मारते, केशव, मुकटदत्त, मेरुमणी... (हसायला लागते.) आईस्क्रीम ठेवलं जातं.

CUT TO…

5. Int/Amruta Home/Evening

देव्हाऱ्यात साखर ठेवली जाते. अमृताची आई नमस्कार करुन बाहेर येते. अमृता वाडयात लपाछपी खेळताना शोधतेय.

आईः अमृता...ऐ अमू...

अमृताः थांब गं आई दोन मिनिट!

आई खाली उतरुन तिच्या जवळ जाते. तिला बाजूला घेते

आईः ते हो म्हणाले...

अमृताः काय?

आईः ते हो म्हणाले. लग्न ठरलं तुझं बाळा!

तिच्या गालावरुन हात फिरवते.

अमृता आईकडे पहाते तिला काय रिॲक्ट व्हावं ते कळत नाही, तेवढयात मागून जोरात धपाटा बसतो आणि धप्पा, धप्पा असा आवाज येतो. स्लो मोशन मध्ये सगळी पोरं तिच्या जवळ येतात आणि धप्पा धप्पा करत ओरडतात. आई लगबगीने दुसरीकडे जाते. ती त्या घोळक्यात तशीच उभी.

SONG ONE: TITLE MONTAGE

अमृता तशीच लाजत लाजत उभी आहे.

अमृताला ह्रषि घर दाखवायला आत घेऊन येतो. तो सांगणार तेवढयात ती बाल्कनीच्या दिशेने आपणहून जाते. तिथून पहाते. तो तिच्या मागे येतो, दोघे बाल्कनीतून पहातात. ती खुश होते.

मंदोदरी मावशी, अमृताची आई आणि एक गुरुजी बसलेत. मागे वडील मित्राबरोबर गप्पा मारतायत.

मावशी कागदावर १२ +४+ २०१२ असं लिहीतेय.

दोघे रस्त्यावर उभे आहेत, ती एका टपरीकडे बोट दाखवते आणि तो एका कॉफीशॉप कडे, ती नाराज होऊन त्याच्याबरोबर चालू लागते.

एका डी टी पीच्या दुकानात लग्नाची पत्रिका लिहीली जाताना दिसते.

ह्रषि एक्सेल शीट मध्ये अल्फाबेटीकली कोणाला कसं इन्व्हाईट करायचं ते लिहीतोय.

ह्रषि ऑफिसमध्ये आहे. ती पण ऑफीसमध्ये ती मेनु लिहून घेतेय. तो तिला समजावतोय, ती कांदयाची भजी खोडून पालकाची भजी असं लिहीते.

मॅनेजर ह्रषिला खुणेनेच आत बोलावतो.

Int/ Manager Cabin/ Day

मॅनेजरः किती?

ह्रषिः वीस,

मॅनेजरः दोन!

ह्रषिः पंधरा

मॅनेजरः चल चार!!

ह्रषिः दहा तरी!! मला हनिमूनला तर जाऊ दे...

मॅनेजरः लास्ट सहा दिवस! दोन महिन्यात प्रोजेक्ट सबमिशन आहे, मी नवीन रिक्रुटमेंट करतोय, वेळ कमी आहे आणि तू लग्न ठरवलंय न विचारता. तू प्रोजेक्ट झाल्यावर जाना हनिमूनला. आणि तसही तिथे जे करता ते घरी करताच येतं की! वेगळं कशाला जायचं मग?

ह्रषि डोक्याला हात लावतो.उठतो.

मॅनेजरः सहा दिवस,आणि दोन महिन्यानी लीव्ह.

ह्रषि त्याच्याकडे चिडून पहातो,

मॅनेजरः आणि हो काँग्रॅटस!

Cut To...

अमृता ऑफीसमध्ये एका मैत्रिणीला मिठी मारते. सगळयांना बाय करते आणि निघून जाते.

ऱ्हषि ट्रायल रुम मधून शेरवानी घालून येतो. मावशी त्याला झकास दिसतोय असं सांगते. तो आत जातो.

दार उघडलं जातं. अमृता पैठणी नेसून बाहेर आलीये. आई कशी वाटतेय विचारते. अमृता आरशात पहाते. स्वतःलाच डोळा मारते. नाचायला लागते. वडील येतात. शांत होते. वडील जातात. परत नाचायला लागते.

एका डॉक्टर लग्नानंतरच्या सेक्स बददलच्या काही गोष्टी सांगतायत. ऋषि लाजून इकडे तिकडे पहातोय. अमृता उत्सुकतेने ऐकते. मध्येच प्रश्न विचारते. ऋषि चकीत होतो.

मंदोदरी मावशी उखाणे लिहीताना दिसते. एवढीशी मुंगी हत्तीला मारते...काय तिची शक्ती...

अमृता जीन्स आणि टी शर्ट घालून घरातून फोनवर बोलत बाहेर पडते. आई तिला थांबवते आणि सांगते पंजाबी ड्रेस घाल. ती आत जाते. बदलून बाहेर येते.

ऋषि आणि अमृता गाडीतून चाललेत. मागे खूप पिशव्या. तो विचारतो कसं कस? ती त्याला वेडावाकडा चेहरा करुन दाखवते. तो तसाच प्रयत्न करतो. समोर जोरात हॉर्न वाजतो. आणि लाईट येतो. लाईट बंद होतो. तो फेशियल करायला बसलाय. ती ही दुसरीकडे तेच करतीये. दोघं आरशात पहातात.

कार्यालयात आदल्या दिवशी अमृता फोनवर बोलतेय.

अमृताः तू लग्नाला येणार नाहीयेस? तुला काही लाज? तू खडडयात जा!

फोन कट करते.

CUT TO…

6. Ext-Int/ Marriage Hall/Morning

सूर्य उगवतो. कार्यालयाच्या बाहेर बोर्ड लावला जातो. साने देशपांडे शुभविवाह. लोकं आत येतात. ताटातून अक्षता घेतल्या जातात. अंतरपाट धरला जातो. मंगलाष्टके सुरु होतात. लोकं अक्षता टाकतायत. गुरुजींशेजारी मंदोदरी मावशी उभी आहे. ती पिशवीतून कागद काढते आणि गुरुजींकडून माईक काढून घेते. कागदावर लिहीलंय सावधान शुभ मंगल सावधान, चालः शीला, शीला की जवानी... ती गायला सुरुवात करते.

सावधान... शुभ मंगल सावधान,  साने मंडळींना साजेसा देशपांडयांचा मान मान...

ओ हो हो...सावधान...शुभमंगल सावधान...साने मंडळीना साजेसा देशपांडयांचा मान मान...

यांची अमृता मुलगी गोड...कष्टाने त्यांनी जपली फार...   माहेराहून जाताना डोळयात येईल पाण्याची धार...  पण आमचा ऱ्हषि कुमार सांभाळेल तिला एकदम छान...आठवण नाही येणार तिला कधीच हो घरच्यांची... इतकी सवय होईल तिला देशपांडयांच्या प्रेमाची... कळणारही नाही माहेर आहे का सासर, तिचं हरपून जाईल भान...

अमृता अंतरपाटावरच मान वळवून हसायला लागते. ह्रषि ऑकवर्ड होतो. अमृता आणखी हसतेय. आई तिला सरळ करते. आंतरपाट खाली जातो. दोघं माळ घालतात. त्याचा फोटो फ्रीज होतो.

CUT TO…

MONTAGE:

अमृताचे कपडे ह्रषिच्या शेजारी ठेवले जातात. त्याचा मोबाईल काढून तिच्या मोबाईलला चार्जिंग लावलं जातं. किचनमध्ये काही पातेली येतात. ड्रेसिंग टेबलवर डिओ आणि आफ्टर शेव शेजारी मॉश्चरायझर आणि फेयरनेस क्रिम येतं, बेडरुमच्या दारात विन्डचाईम्स लागतात. गजरांच घडयाळ ठेवलं जातं. बुटांच्या रॅक मध्ये तिच्या चपला ठेवल्या जातात. त्यांच्या दोघांचा फोटो बेडरुममध्ये ठेवला जातो.

CUT TO…

SLATE: दोन महिन्यानंतर...

CUT TO…

7. Int/ Rishi Bedroom/Morning

(तसाच एकमेकांना माळ घातल्याचा फोटो दिसतो. अमृता लॅपटॉपवर पहातेय. ह्रषि शेजारी तयार होतोय.)

ह्रषिः काय करतेय अमू डॉन?

अमृताः अरे हिम्मतला लग्नाचे फोटो मेल करायचेत.

ह्रषिः (आरशात शर्ट नीट करत) कोणाला?

अमृताः हिम्मतराव, माझा मित्र. तो नाही का जंगलात...

ह्रषिः हां... मला वाटलं ब्रेकफास्ट मिळेल

अमृताः तयार आहे सर!

ह्रषि चमकतो. तिच्या जवळ येतो. तिला मागून मिठी मारतो.

ह्रषिः व्वा! काय बक्षीस देऊ याबददल?

अमृताः (त्याच्या गालावर हात ठेवते) वेळ दया थोडा! उपकार होतील.

ह्रषिः (तिच्या गळयाला हात लावत) थोडे दिवस! अगदी थोडे दिवस. खरंच. तुझीशप्पथ.

अमृताः म्हणजे मी मेले तर चालेल , शहाणाच आहेस!

इमेल आयडी टाकते. तो समोर पहातो. हात कीबोर्डच्या दिशेनी नेतो. तिला खुणेनेच काय विचारतो.

अमृताः म्हण प्लीज... पासवर्ड सांगतेस का ग अमृता?

ह्रषिः प्लीज, पासवर्ड सांगतेस का गं अमृता?

अमृताः नाही!! (हसायला लागते.)

ह्रषि तिला आणखी घटट आवळतो. ती त्याच्याकडे पहाते.

ह्रषिः ऐ... सांग ना प्लीज...

अमृताः तात्या विंचू.

ह्रषिः ( चमकून ) काय??

अमृताः (त्याला सोडून दूर पळते.) पासवर्ड... तात्या विंचू... एम भग भुगे!

ह्रषि डोक्यावर हात मारुन घेतो.

CUT TO...

7 A.Int/Dining Room/Morning

उपमा समोर आणून ठेवला जातो.

अमृताः भाव नको ना खाऊ! सांग ना?

ह्रषिः (हसून पहातो. एक घास खातो.) व्वा! मस्त आहे.

अमृताः (बदलत) हो ना? मघाशीच खाली जाऊन आणला, नवीन उघडलंय ना सदगुरु स्नॅक सेंटर.

ह्रषिः (डोक्याला हात लावतो.)अगं ऐ!! तू कधी बनवणारेस?

अमृताः बनवीन रे. ह्रष्या सांग ना तुझा पासवर्ड, मी सांगीतला की नाही!

ह्रषिः हं, एका अटीवर! मला आज डबा दयायचा. ...

अमृताः ई!डबा काय मी तुला अर्ध्या तासात देते. कर्मानी मेलास!

ह्रषिः पासवर्ड तुला आज एक सांगून उदया चेंज करुच शकतो मी.

अमृताः आयला हो?? लागली!

ह्रषिः काय?

अमृताः ( दाताखाली जीभ चावत) सॉरी!!

ह्रषिः जा... दया आता डबा! (ती पहाते.) जा!!

अमृताः (आत जाते.) ऐ ह्रष्या बरं झालं आठवलं, मावशी विचारत होत्या. ह्रषि येणारे का मंगळवारी?

ह्रषिः नाही गं मला व्हीसी आहे, आणि मी तसंही काय करु त्या मंगळागौरीला येऊन?

अमृताः बरं आता काय!

ह्रषिः (तिच्याकडे पहात) राहू दे. तू इकडे ये.

ती मागे वळून पहाते.

ह्रषिः ये ना.

अमृताः ( झारा काढते.) ठरवं हा... बायको हवीये का डबा?

ह्रषिः अं...दोघांपैकी एकच असेल तर... ऑफकोर्स... डबा!

त्याच्या अंगावर झारा फेकला जातो. तो पकडतो आणि हसायला लागतो.

CUT TO…

8. Int/Office/Afternoon

मॉनिटर ऑफ होतो. ह्रषि समोर बसलाय. मॅनेजर मॉनिटर ऑफ करुन टिफीनची बॅग डेस्कवर ठेवतो.

मॅनेजरः (सॅनिटायझरने हात पुसत) बिलीव्ह मी, मी अजूनही धक्क्यात आहे.

ह्रषिः का रे विनय?

मॅनेजरः वेळेवर काम करुन प्रोजेक्ट फायनल स्टेजमध्ये आलाय. झपाझप काम करतायत रे सगळे. तुझ्या टीममधल्या कोणालाही सांगावं लागतं नाही. आय टी कंपनी आहे का एनजीओ आहे काही कळत नाहीये. व्हीसी एकदा नीट झाली ना... बास... मग चेंजेस आणि कम्प्लिशन!

मॅनेजर सिल्व्हर फॉईल मध्ये गुंडाळलेली पदार्थ काढतो.

मॅनेजरः आज, रशियन सँडविच दिलंय बायकोने.

ह्रषिः (खूश होत) माझ्याकडे सरप्राईज आहे आज! डबा दिलाय आज अमृतानी!

मॅनेजरः कसं काय जमवलंस?

ह्रषिः पासवर्ड सांगतो म्हणालो.

मॅनेजरः बायकांना एक कशानी मोटीव्हेशन मिळेल ना सांगता येत नाही.

दोघं हसतात.

ह्रषिः घ्या...

टिफीन काढतो, उघडतो. टिफीन रिकामा आहे. तो चक्रावून पहातो. अमृताला फोन लावतो.

CUT TO…

8A. Int/Home/Afternoon

टीव्हीवर तात्या विंचू दिसतो.

अमृता समोर बसलीये. फोन वाजतो. अमृता  पहाते. आवाज कमी करते. फोन उचलते.

ह्रषिः अमृता पासवर्ड मी डबा भरुन दिल्यावर सांगणार होतो, नुसता डबा दिल्यावर नाही.

अमृताः हाहाहाहा... म्हणजे?

ह्रषिः अगं मोकळा डबा दिलास तू!

अमृताः आईच्चा घो. खरंच? एक मिनिट थांब...

पळत पळत किचनमध्ये जाते. त्याच डब्या सारखा दुसरा भरलेला डबा तिथेच आहे. अमृता ते बघत.

अमृताः अरे सॉरी तुला डबा देताना नेमका हिम्मतचा मेसेज आला होता, फोटो बघून. म्हणून तिथेच राहीला हा. त्याला खूप आवडले आपले फोटो. मला म्हणला चिकणा नवरा काढलास.

ह्रषिः (शॉक बसल्यागत) काढलायस? अवघड आहे. बरोबर आहे गं नवऱ्या पेक्षा मित्राचा मेसेज जास्त महत्वाचा आहे गं तुला. जाऊ दे. बाय.

फोन ठेवून मॅनेजर कडे पहातो.

मॅनेजरः अ, खायला जाऊया कँटीनमध्ये?

हृषिः (आश्चर्याने) का?

मॅनेजरः (सँडविच गुंडाळत) रशियात लोकं हे कशी जेवत असतील कुणास ठाऊक?

दोघं हसतात. सँडविच डस्टबीन मध्ये पडतं.

CUT TO…

9. Int/ Hall/ Evening

मला जाऊ दया ना घरी गाणं चालूच आहे. मंदोदरी मावशी मधोमध बसून अदा करतेय. मग उठते. दोन चार बायका मागून येतात. आणि सगळया मिळून दनादना नाचायला सुरुवात करतात. अमृता पर्समध्ये किल्ली टाकत टाकत आत येते. समोर पहाते आणि तिला प्रचंड हसू फुटतं. मावशी नाचतेच आहे.

CUT TO…

9A. Int/ Hall/ Evening

अमृता आणि मावशी गोलात उभ्या आहेत.

१ः नेटवर सापडलाय हं! अं… एका हातात पर्स, दुसऱ्या हातात रुमाल, सचिन राव असताना, कशाला हवा हमाल?

सगळया हसतात, टाळया वाजवतात.

२ःआता तू घे गं… गं नाव…

अमृता दचकून बघते.

३ः घरी काय म्हणतेस? हृषिकेशराव?

अमृताः (लाजत) छे, मी त्याला हृषि, हृष्या, हृष्यू काहीही म्हणते… कधी कधी तर नुसतं हूररर करुन पण बोलवते.

सगळया हसतात.

मावशीः (तिला धपाटा घालत) बाईचं खरं स्कील हेच! नवऱ्याला हाडहूड करायचं, पण त्याला जाणवू दयायचं नाही!

मावशीः (जवळ जात.) घे...

अमृता सगळयांवर नजर टाकते.

अमृताः अच्चीत गच्ची गच्चीवर झाड, झाडाला फुलं, फुलांचा पडलाय सडा, हृषिकेश रावांचं नाव घेते तुमच्या आईच्या...

सगळया बायका झापकन गायब होतात.

अमृता इकडे तिकडे पहाते. कुणीच नाही. हसते.

मावशी तिला पुन्हा ढुसणी देते. अमृता भानावर येते. सगळया तशाच समोर उभ्या आहेत.

अमृताः दोन तीन महिन्यांचा संसार पण प्रत्येक दिवस गोड! तिन्हीसांजेला मनाला लागे हृषिकेशरावांची ओढ!

सगळया टाळया वाजवतात.

मावशीः (तिला धपाटा मारत) व्वा! व्वा! अप्रतिम, नाव काढलंस!!

मावशी तिच्याकडे पाहून आनंदाने गालावरुन हात फिरवते.

अमृताः आईनी एसेमेस केला होता जायच्या आधी.

CUT TO…

10. Int/Bedroom/ Night

नाईट लॅम्पचा प्रकाश आहे. अमृता अंथरुणात बसलेली आहे. मागे घडयाळात पावणे चार वाजलेले दिसतात.

अमृताः कुठायस तू? अजून? हो मेसेज मिळाला अकरा वाजता... त्या मॅनेजरला म्हणाव, तुझ्या आयला दुसरं कोणी नाही का? हो पण, मला तुला केवढं काय काय सांगायचं होतं... संध्याकाळी म्हणजे? बाप रे! मी आईकडे जाणारे... हं... बर, नाही करत डिस्र्टब, काळजी वाटली म्हणून फोन केला, हं, जेवलास ना? हां.

फोन टाकते. तशीच पडते. लाईट बंद करते. पुन्हा फोन वाजतो. पंप्या असं लिहीलंय. मेसेज येतो. आय लव्ह यू... ती रिप्लाय करते आय लव्ह यू टू थ्री फोर फाईव्ह सिक्स.. आणि पुढे खूप स्माईलीज दिसत रहातात.

CUT TO…

11. Int/Amruta home/ Afternoon

अमृताचे आई समोर बसलीये. एक माणूस किराणा घेऊन बसलाय. वडील आरशात भांग पाडतायत.

आईः (लिस्ट पहात) कितना मंहंगा है, हमारा कंबरडा मोडेगा ये बिल भरके.

अमृता आत येते. आई शेजारी जाऊन बसते.

आईःया, (त्याच्याकडे पहात) साबुदाणा एक किलो बोला, ये परस्पर दो किलो भेजा है... क्या कारभार करते हौ तुम लोग! और ये विम बार बोला था ना, दूसरा क्यों दिया...? कितना फेरफार किया है यादी में!

अमृताः (आईकड पहात, त्याच्याकडे पहात) अरे कैलास तुला मराठी येतं ना?

माणूसः हां, याच हिंदीत बोलत होत्या मघाच पासून... ताई पैशे आत्ता देणार का नंतर?

आईःजा जा तू, मी मालकाशी बोलते.

कैलास पिशव्या मोकळया करुन निघून जातो.

आईः वाण्याशी घासाघीस केल्याशिवाय ना सामान आणलंय असं वाटतच नाही.

वडील: मी जाऊन येतो, आज आमच्या सुनिलचा सत्कार आहे (तिच्याकडे पहात) काय गं तू कधी आलीस? आणि काय रहायला का आता?

अमृता: आत्ताच आलीये आणि जाणारे लगेच.

वडील निघून जातात. आई दोन तीन वस्तू घेऊन आत जाते. अमृताही तिच्या मागोमाग गोष्टी उचलून आत जाते.

अमृता: आई!

आई: बोला... ( एकेक डबा रॅकवरुन खाली घेते.)

अमृता: आई, खूप कंटाळा आलाय गं! वाढदिवस, लग्न, मुंज, डोहाणजेवण, मंगळागौर... काल पाचवं फंक्शन झालं दोन महिन्यातलं. त्यात ती नऊवारी. नेसण्याच्या आनंदापेक्षा सुटण्याची भिती जास्त.

आई: होईल सवय. तुमचं बाकी छान चाललंय ना?

अमृता: डोंबलाचं छान. वैताग आलाय नुसतं घरी बसून, बर हाही बिझी आहे खूप...मला वाटतंय परत ऑफीस सुरु करावं.(आई झाकणं उघडते.) करु का? तुझंही थोडं काम कमी करायचंय मला. (आई तिच्याकडे पहाते हसते. अमृता तिला थांबवत) आई तू खरंच ट्रान्सफर मिळत नसेल तर सोडना जॉब!

आई: सोडून काय करु? यांचा रोजचा बाजीरावाच्या वरताड थाट पाहू? त्या पेक्षा मी, माझं काम, वाचन, प्रवास खूप बरं आहे. ट्रान्सफर मिळतही नाही आणि मिळाली तरी उपयोग नाही कारण तूही घरी नसणार आता!!

अमृता आईकडे पहाते. आईला मिठी मारते, तोच पाण्याचा आवाज येतो.

आई: (डोळे पुसत) आजकाल डोळयाला आणि नळाला कधी पाणी येईल सांगता येत नाही!

अमृताः आई तू साप्ताहिकात वगैरे एखादी कथा लिहीच!

आई हसते. गहू उचलते. डब्यात गहू ओतले जाताना दिसतात.

CUT TO…

12. Int/Rishi Home/ Night

लॅच मध्ये किल्ली लावली जाते. दार उघडतं. खाली डोअर मॅट पाण्यावर तरंगताना दिसते. नळाचा आवाज येतोय. ह्रषि त्याकडे आश्चर्याने पहातो. दार आख्ख उघडतो. आ वासून उभा रहातो. मॅट खालून काही पत्र बिलं, सगळं ओलं झालेलं हातात घेतो. बाजूला ठेवतो. हातात बूट आणि पँट फोल्ड केलेली असा आत येतो. सगळीकडे पाणी आहे. नळाचा आवाज येतोच आहे. तो तिकडे पहातो. आत जातो. समोर किचनमध्ये सिंकवरचा नळ जोरात चालू आहे. भांडी तरंगतायत. तो त्या दिशेनी येतो. वाताहत झालेली आहे. जाऊन नळ बंद करतो. अमृताला फोन लावतो आणि तेवढयात लाईटस जातात. तो आणखीन चिडतो.

ह्रषिः हॅलो अमृता…अजून एक तास?

CUT TO...

13. Int/Rishi Home/ Night

अगदी थोडयाशा शिल्लक असलेल्या मेणबत्तीवर नवीन मेणबत्ती लावली जाते.

ह्रषिः (मेणबत्ती लावून बसतो.) कुठे गेली होतीस तू?

अमृताः (मेणबत्तीत ज्योतीमध्ये बोट फिरवून खेळतीये.)

ह्रषिः अमू काय बोलतोय मी? किती वेळ झाला ?

अमृताः अरे आईकडून लवकर निघाले होते, वाटेत भेटले सगळे म्हणून थांबायला लागलं, तरी लवकर आले, हिम्मत असता तर सोडलंच नसतं मला…

ह्रषिः मी सांगतोय काहीतरी, तीस तास सलग काम करुन आल्यावर पुन्हा एक तास सगळं आवरलंय मी...

अमृताः सॉरी.

ह्रषिः अमू, थोंड, थोड,  लक्ष दे घराकडे... इतके दिवस मागे लागलोय लेटर बॉक्स बसवून घे. केलंस का साधं काम? आज सगळी पत्र भिजली. घर आपलं आहे की नाही? मग आपणच त्याची काळजी नको का घ्यायला? आँ? मागे तुझं लक्ष नव्हतं तेव्हा गॅसवरचं दूध उतू गेलं, मित्राबरोबर गप्पा मारत बसलीस शर्टची कॉलर जळाली,  त्या दिवशी रस्त्यात एकाला शिव्या दिल्यास.

अमृताः (आवाज वाढतो.) तू उगाच ओ के ओ के म्हणलास, मी तर बुकललाच असता त्याला...

ह्रषिः एकतर जरा हळू... आणि हेच बुकलण, आईच्च घो, लागली वगैरे जरा कमी कर...

अमृताः ती नॅचरल टेन्डन्सी आहे माझी.

ह्रषिः बरोबर आहे पण...आता लग्न झालंय... तेव्हा थोडं लग्न झाल्यासारखं वागायला नको का?

अमृताः म्हणजे कसं.

ह्रषिः म्हणजे नीट वावरणं, चार चौघात हळू बोलणं, लहान मुलासारखं धांगडधिंगा न करणं, आपण कसे दिसतोय, कसे बसतोय हयाचं जरा भान ठेवणं. आता साधी गोष्ट आहे, मी तुला एवढया वेळा म्हणलं बाहेर जाताना छोटं का होईना एक मंगळसूत्र घालत जा. तरी घातलंस का तू? नाही! कारण तुझ्या डोक्यातच नसतं, आपलं लग्न झालंय आपण तसं रहावं वगैरे, आणि मी सांगतो म्हणून कर ना एकदा, अगं आईचं आहे ते.. माझ्या इमोशन्स...

झापकन लाईटस येतात. ह्रषि पहातो . अमृता त्याच्याकडे पहाते. ओढणी थोडी खाली घेते, त्याला मंगळसूत्र घातलेलं दाखवते. मेणबत्ती विझवते.

अमृताः (हसते) ह्रष्या, तुझा जाम पोपट होतो ना असा कधी कधी?

ह्रषिः हो झाला माझा पोपट, पण मी सांगतोय ते महत्वाचं आहे ना? का नाही? सतत थिल्लरपणा करण्यापेक्षा त्याच्याकडे लक्ष दे जरा! उपकार होतील.

तिथून निघून जायला लागतो. अमृता त्याला थांबवते.

अमृताः ह्रषि...चिडू नको ना!

ह्रषिः मग काय नाचू?

अमृताः नाही नाचू पण नकोस. दमला असशील ना...

ह्रषिः (हात जोडतो.) धन्य आहेस तू...

CUT TO...

14. Ext/Balcony/ Night

विन्डचाईम्सचा आवाज येतोय. पूर्ण अंधार. अगदी थोडासा उजेड. अमृता उभी आहे. ह्रषि मागून येऊन तिला मिठी मारतो.

ह्रषिः काय झोप नाही येते?

अमृताःचॅक

ह्रषिः मी त्रास देतो ना तुला खूप?

अमृताः चॅक

ह्रषिः हे कशामुळे होतंय माहीतेय?

अमृताः माझ्यामुळे?

ह्रषिः नाही.

अमृताः मग तुझ्यामुळे?

हृषिः (हसत) नाही, आपण कुठे बाहेर गेलो नाही आहोत ना. म्हणून...

अमृताः तूच बघ...

हृषिः मी नाही. तू बघ आता, डोळे बंद कर...

अमृताः बास आता डोळे बंद करुन पाप्या घेणं वगैरे... तू नको तेव्हा जाम दिवाळी अंकांमधल्या कथांसारखा वागतोस, त्यात नाही का सेक्स केला म्हणायला इतके लाजतात, मग काय त्यांचे श्वास एकरुप झाले, ते प्रेमात चिंब भिजले, रात्रीला सुगंध मिळाला... हड ऐ...

हृषिः थांब जरा... (एन्व्हलप बाहेर काढतो.)

अमृताः हे तर काहीच नाही अरे हैदोस मध्ये तर ना...

हृषिः अगं ऐ!! थांब, कसला हैदोस? उघड डोळे. (तिच्या हातात ब्रोशर आणि तिकीटस देतो.) टू नाईटस, थ्री डेज... जाऊयात?

अमृता अचानक आनंदी होते.

अमृताः बघू...

तो एन्वलप मागे लपवतो. ती एन्वलप काढून घ्यायचा प्रयत्न करते. तो दुसरीकडे नेतो. त्याच्यांत झटापट चालू होते. फायनली ती त्याला मिठी मारते.

CUT TO...

15. Int/ Hotel room/ Day

पडदा उघडला जातो. अमृता पडदा उघडतेय. शेजारी हृषि खिडकी बंद करतो. दोघं एकमेकांकडे पहातात. हसतात.

CUT TO...

15A. Int/ Hotel room/ Night

हृषि आणि अमृता खाली एका कोपऱ्यात बिलगून बसलेत.

अमृताः ऐ हृष्या तुला वाढदिवसाला काय देऊ?

हृषिः डबा दे. भरुन! (अमृता त्याला मारते.)

हृषिः (तिच्या नाकाला हात लावत) तुला? तुझाच लवकर आहे.

अमृताः मला... माहीत नाही, आत्तापर्यंत वाढदिवसाला असं काही विशेष केलं नाहीये मी. पण एकदाच, हिम्मत बरोबर लाईट हाऊस ला गेले होते. तिकडे जाऊ आपण. तू गेलायस कधी?

हृषिः नाही.

अमृताः काय जागा होती यार. हिम्मत म्हणला होता...

हृषिः डन! डन!

अमृताः आणि ऐक ना...

हृषिः हां...

अमृताः (त्याची मान वळवत) तुला बोअर नाही ना होते.

हृषिः नाही.

अमृताः माझी ना माझी ना एक फॅंटसी आहे, मी कधीच कोणाला बोलले नाही कधी... पण...

हृषिः त्यात काय बोल ना...

अमृताः (हळूच) एकदा लाईट हाऊस मध्ये करायचं!

हृषिः (आश्चर्याने उडतो.) काय??

अमृताः हां... एकदम ! हैदोस इन लाईट हाऊस! (त्याला खांदयाने ढकलते.)

तो डोक्याला हात लावतो. हसायला लागतो.

अमृताः तू येशील ना?

ह्रषिः कशाला?

अमृताः वाढदिवसाला रे, लग्नानंतर पहिला वाढदिवस तिकडे झालं पाहीजे यार, आणि फँटसीचं बघू आपण, तू त्याचं टेंशन नको घेऊ! ... तू ये तर मग पुढचं होईल आपाओप!

ह्रषिः आपोआप?

अमृताः (त्याचं नाक धरते) अरे पंप्या, समोर निळा समुद्र, आजूबाजूला कुणीही नाही, आपण दोघं, मग काय! (त्याला धरते) असा ना लक्षात राहील पाहीजे वाढदिवस!

ह्रषिः करु ना, अगदी आयुष्यभर लक्षात राहील असा करु! पण आत्ताचं काय?

अमृताः आत्ता काय म्हणजे... बसू ना गप्पा मारत! शांतता, चांदण्यांनी चमचमणारं आकाश, आणि खूप साऱ्या गप्पा... हेच ठरलं होतं ना आपलं?

ह्रषिः हो, अजूनही काही ठरलं होतं... एक मिनिट... एक मिनिट... तुझ्या इथे काहीतरी लागलंय!

अमृताः काय रे... (झटकते.तो तिच्या खांदयावर बोट ठेवतो ती पहाते मग तिच्या कपाळावर बोट ठेवतो ती पहाते मग गालावर आणि मग ओठावर बोट ठेवतो. ती त्याच्याकडे पहाते. तो तिला जवळ ओढतो. )

CUT TO…

SONG 2: LOCATION: A RESORT SOMEWHERE IN FOREST

ROMANTIC SONG WHERE RISHI AND AMRUTA SHARE INTIMATE MOMENTS, UNDERSATAND EACH OTHER AND SPEND SOME QUALITY TIME.

CUT TO…

16. Int/ Hotel room/ Night

अमृता आणि ह्रषिची गाडी बिल्डींगमधून आत येते. मागे काही मुलं क्रिकेट खेळताना दिसतात. ह्रषि गाडी पार्कींगला लावतो. गाडी थांबते. दोघे उतरतात. गाडीच्या डिक्कीतून काय काय पिशव्या काढतात. तो तिच्या हातात पिशव्या देतो. एकमेकांकडे पाहून हसतात. तो डिक्की लावतो.

ह्रषिः अमू, उदयापासून प्रॉपर रुटीन! काही ना काही तरी एक्सरसाईज. डायट, एकही दिवस सबब नाही, जेवायच्या झोपायच्या वेळा पाळायच्या. आणि सगळयात महत्वाचं म्हणजे...

अमृताः (उत्साहाने ओरडत) ह्रषि एक मिनिट... प्लीज बॅग धर...

ह्रषिः काय काय झालंय काय?

अमृता पिशव्या त्याच्या हातात देते. आणि पळत सुटते. ह्रषिच्या हातातून पिशव्या सुटतात. पडतात. अमृता पळत पळत जाताना दिसते. बिल्डींग समोर पाठमोरा उभा असलेला मुलगा वळतो. त्याच्या चेहऱ्यावर प्रचंड आनंद. तोही पुढे येतो. अमृता समोर येऊन ओरडते.

अमृताः च्यूत्या...

ह्रषि दिसतो. आणि ठाळकन काच फुटल्याचा आवाज येतो. दोघं समोरासमोर येतात.
एकमेकांना साष्टांग नमस्कार घालतात. दोन तीन गाडया येऊन तिथेच थांबतात. लोकं वळून वळून पहातात. अमृता ने त्याची गचांडी धरलीये. मग त्याला बखोटीला धरते.

अमृताः वर चल, मारतेच तुझी!

तो सोडवायचा प्रयत्न करतो ती आणखीन घटट पकडते आणि त्याला वर घेऊन जायला लागते.
ह्रषि मागे उभा आहे. अचानक धक्यातून बाहेर येतो. जवळ पहातो. पडलेल्या पिशव्या उचलतो.

CUT TO…

17. Int/ Drawing Room/ Night

हिम्मतराव पाय वर घेऊन बसलाय.

हिम्मतरावः अगं येणार होतो माझी आई, पण सेंट्रल गर्व्हन्मेंटचा प्रोजेक्ट म्हणजे भोंगळ कारभार, त्यात दोन दिवसाआधी कळलं, प्रोग्रॅम एक्सटेन्ड होतोय. आमचं काय बाबा, सरकारनं धू म्हणलं की ध्वायची!

ह्रषिला ठसका लागतो. तो ऑकवर्ड झालाय. विषय बदलायचा म्हणून

ह्रषिः हिम्मतराव, हे नाव थोडं ऑड नाही वाटत?

हिम्मतरावः थोडं काय खूप, तुम्हाला सांगतो ऑक्सफोर्डला तर खूप प्रॉब्लेम व्हायचा... लोक मला हिमॅन, हिमतरो, हिटमॅन, स्टोनमॅन काहीही म्हणायचे...

ह्रषिः (दचकून)कुठे?

हिम्मतरावः ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी आहे. शिक्षण मिळतं तिथे.

ह्रषिः नाही नाही तू काय करत होतास तिथे.

हिम्मतरावःमास्टर्स तिथेच केली ना... मग पुढे फेलोशिप वगैरे...

अमृता चहा घेऊन येते.

हिम्मतरावः (त्याकडे पहात) भवाने मला वाटलं कुकर तरी लावशील. चहा?

अमृताः लावणारे! हां फेलोशिप कशात केलीस ते सांग ना...

हिम्मतरावः (चहा घेत.) अंडरस्टॅंडिंग द चेंजिग क्लायमेट सिनॅरिओ, द चेंज आॅकर्ड इन बिहेवियर अ‍ॅण्ड ब्रिडींग पॅटर्न ऑफ बटरफ्लाईज इन साउथ इस्ट एशियन डेन्स फॉरेस्ट.

ह्रषिः चांगल आहे. पाठांतर चांगलं आहे.

हिम्मतरावः खरंच काही कळलं का लोक शास्त्रीय संगीताला मान डोलावतात तशी डोलावली? (अमृता आणि तो टाळी देतात.) हां, नावाच, प्रसिध्द डॉक्टर हिम्मतराव बावस्कर, त्यांची आमच्या आजाला विंचूदंशातून वाचवला, मग आपला जन्म झाला तेव्हा आजा म्हणला हा पण त्यांच्यासारखा मोठा डॉक्टर व्हायला पाहीजे म्हणून नाव ठेवलं हिम्मतराव!!

ह्रषिः नाईस...

हिम्मतरावः धाकटया भावाचं अजून नाईस आहे, पंजाबराव! त्याच्या पेक्षा धाकटयाच बजाजराव, त्याच्याहून धाकटयाचं ठेवलं होतं... पण झालाच नाही हो.

ह्रषिः (हसतो, अमृताला सांगत) ही इज सो फनी!

हिम्मतरावः पप्या पण हेच म्हणतो.

ह्रषिः असो (आळस देत.) चला, मी निघतो, परत आलात की भेटू...

हिम्मतरावः मी इथंच रहाणारे दोन तीन दिवस.

ह्रषिः ( अमृताकडे पहात) इथे?? काय गं??

अमृताः (खूश होत) एक नंबर ना!

ह्रषिः (मान डोलावत, कुत्सितपणे) एक नंबर एक नंबर! (तिथून उठतो.)

तिथून निघून जातो.

अमृताः (त्याला मारत) मग?

हिम्मतः (तिला मारत) मग ?

अमृताः (दोनदा मारते) मग मग?

हिम्मत तिच्या नाकाला धरतो. अमृता सोड सोड ओरडते. हिम्मत सोडतो ती त्याला चावते. तो ओरडतो. ह्रषि वळून पहातो. हिम्मतचा आवाज येतो. ‘लोकांना दात असतात हिला करवती आहेत.’

CUT TO…

18. Int/ Balcony/ Day

एक ओली चडडी बाल्कनीत झटकली जाते. हिम्मतराव टॉवेलवर उभा आहे, ती झटकतोय आणि तिकडे टाकतोय. मग बनियान पण तसाच झटकून टाकतो. मागून ह्रषि येतो तिकडे पहातो.

ह्रषिः काय रे, काय करतोयस?

हिम्मतः आत्ताच वाळत घालतो नाहीतर उदया तुमचे घालायला लागतील.

ह्रषि पहातो आणि निघून जातो. हिम्मत झटकून आणखी एक कपडा बार वर टाकतो.

CUT TO…

19. Int/ Drawing Room/ Day

टेबलावर मॅक बुक ठेवललेला आहे. ह्रषि तयार होऊन ज्यूस पितोय त्याकडे पहातो. समोर हिम्मतराव सुटाबुटात उभा आहे. मॅक बुक दुसऱ्या बॅगेत टाकतो.

हिम्मतरावः व्हॉटस अप?

ह्रषिः (नक्कल करत) व्हॉटस अप?? (शांतपणे) बरं आहे.

हिम्मतरावः बरं, मला टाकणार का फर्ग्युसन रोडला? लेक्चर आहे साडे नऊ ला...

ह्रषिः सोडतो की, कोणाच लेक्चर आहे?

हिम्मतरावः (सहजपणे) माझं!

ह्रषिः नाही नाही, म्हणजे कोण देणारे?

हिम्मतरावः मीच!

ह्रषि खचतो. अमृता चहा घेऊन येते.

हिम्मतरावः (दोन कप हातात घेत.) थँक यू अमृततुल्य! घ्या...(ह्रषि मान डोलावतो.) अर्धा? पाव? एक घोट? (ह्रषि सगळयाला नकारार्थी मान डोलावतो.)

ह्रषिः नाही नको. मला ज्यूस. (ज्यूस ओतून घेतो. प्यायला लागतो.)

हिम्मतरावः कालच सांगणार होतो तुम्हाला.ह्रषिकेशराव चहाच्या घोटाला आणि बाईच्या ओठाला कधी नाही म्हणू नये.

ह्रषिच्या तोंडातून ज्यूस सांडतो. त्याला ठसका लागतो.

हिम्मतरावः दमानी...

ह्रषिकेशः सगळा ग्रुपच तसा दिसतोय, मला वाटलं फक्त हिच अशी आहे.

हिम्मतः ही? हये सगळयात शामळू आहे उलट. हिला मी आमच्यात आणलीये धरुन धरुन! रात्री भेटा तुम्ही सांगतो तुम्हाला एकेक किस्से.

CUT TO...

दोघे निघतात, तेवढयात हिम्मतराव थांबतो. चाचपडत पहातो.

हिम्मतरावः अमरे माझा फोन कुठाय गं?

अमृताः मला नाही माहीत.

हिम्मतरावः मला माहीतीये, तुझेच किडे आहेत! गपचूप फोन दे अमरे, मार खाशील... ओ सांगा तुम्ही.

ह्रषिः (हसून) दे गं फोन.

अमृताः नाहीये! मराठी कळतं?

हिम्मतरावः असं, अच्चीवर गच्ची... गच्चीवर टाकी...

ह्रषिः (दचकतो.) ऐ, अग फोन दे ना तू!

हिम्मतरावः ( बॅग चाचपडत) गच्चीवर टाकी... टाकीत मासा... माश्याने मारला सूर...

ह्रषिकेश इकडे तिकडे शोधाशोध सुरु करतो. अमृता हसते.

हिम्मतरावः (बॅगेत वाजतो.)  आणि माझा मोबाईल भेटला. (मोबाईल काढतो.) आयो, एक मिनिट होल्ड कर... (अमृताच्या पाया पडतो. अमृता आशीर्वाद देते.)

हिम्मतरावः एक वाजता फोन करतो. दुपारी बेडेकरला मिसळ टाकू, मग चार साडेचार ला गुडलकला बनमस्का आणि चहा आणि संध्याकाळी वैशालीला एसपीडीपी, रात्री कटटा आहेच! आज जिंदगी उधळून देऊ अमरे!  (फोन घेतो.) हां पप्या दिले का पैशे नलीला... हां...अन तिला सांग भाऊ आहे, जास्त त्रास झाला तर ये सरळ निघून. सहन करण्याला पण काहीतरी मर्यादा असती. पप्या?  फार मारलं नाहीये ना तिला?

(आत अमृता ह्रषि दोघंच)

अमृताः (टाळया वाजवत उडया मारत) एक नंबर. अल खराब मजा येणारे!

ह्रषिः (तिच्याकडे पहात) आज मेंटेनन्स दयायचाय, एल आयसीचा हप्ता भरायचाय, लेटर बॉक्सचं बघा काहीतरी आणि तू जॉब सर्चही सुरु करणार होतीस. आणि हा असला मित्र आहे तुझा? काल आलाच हा रहायला, लुंगी घालून बसला होता इथे, तिही पिवळी! ह्रदयी वसंत फुलताना ही याची रिंगटोन आहे, याला मोबाईल भेटतो? आयेशा जुल्का याला सामान वाटते आणि हा ऑक्सफोर्डचा टॉपर? मला तर हा तुळजापूरचाही वाटत नाहीये.

अमृताः सगळयांना असंच वाटतं तू टेंशन नको घेऊ, मी काम करते उदयापासून!

ह्रषिः चला... (निघून जातो.)

अमृताः ऐ... धतड ततड! धतड ततड !

CUT TO…

20. Int/ office/ Afternoon

ह्रषि आणि एक जण पार्टीशनच्या जवळ उभे आहेत.

ह्रषिः हो मलाही कळलं पार्टी आहे ते, बघू कधी मुहूर्त लागतोय. आपण आपलं काम करत रहायचं.

अचानक शेजारुन कोणीतरी निघून जातं. त्याला एक क्षणाकरता कोणीतरी ओळखीचं गेल्या सारखं वाटतं. तो वळून पहातो. एक मुलगी पाठमोरी जाताना दिसते, वळून आत जाते. ह्रषि पहात रहातो.

ह्रषिः एक मिनिट.

वळतो आणि तिच्या मागे जातो. कॉरीडॉरच्या इथे वळतो आणि त्या मुलीला मागे जाऊन तिच्या खांदयावर टॅप करतो. ती वळते.

राधिकाः येस...?? (अचानक) ओह... हाय!!

ह्रषिः व्हॉट अ सरप्राईज! इकडे कशी काय?

राधिकाः मी जॉईन झाले इकडे परवा. तू इथे काम करतोस?

ह्रषिः हो! दोन वर्ष झाली.

दोघेही तसेच शांत उभे आहेत.

ह्रषिः (मध्येच) कशी आहेस?

राधिकाः छान! तू कसा आहेस?

ह्रषिः मी पण मजेत. तरी मला वाटलंच शेजारुन कोणीतरी ओळखीचं गेलं. आणि तेच सी के, इर्टनिटी!

राधिकाः ओह, अजून लक्षात आहे तुझ्या! चल मग, भेटूया...

ह्रषिः प्रोजेक्ट असाईन झाला?

राधिकाः नाही अजून.

ह्रषिः तू घाईत आहेस का?

राधिकाः नाही. का?

ह्रषिः कॉफी?

राधिकाः (घडयाळाकडे पहाते.) ठीक आहे.

ह्रषिः तुला जायचं असेल तर फाईन, नंतर पिऊ.

राधिकाः नाही इटस ओके. चल.

ह्रषिः धीस वे.

दोघं चालायला लागतात.

ह्रषिः आय डोन्ट बीलीव्ह आपण असे ऑफीसमध्ये भेटलोय. इतक्या वर्षांनी.

राधिकाः आय नो, मलाही.

दोघं चालत जाताना दिसतात.

CUT TO…

20A. Int/ office/ Canteen

ह्रषि कॉफी आणून ठेवतो.

ह्रषिः मग ?

राधिकाः (शांतपणे) तुझी ती भगवान श्रीकृष्णासारखी स्माईल गेली नाही अजून!

तो पुन्हा तसाच हसतो.

ह्रषिः कोणाशी कॉन्टॅक्ट आपल्या बॅचपैकी?

राधिकाः नाही.

ह्रषिः राधिका लग्न केलं मी… आत्ता तीन महिने झाले.

राधिकाः ग्रेट. कॉंग्रॅटस! (त्याला सेकहँड करते. ह्रषि मोबाईलमधून फोटो दाखवतो. फोटो दिसतो.)

राधिकाः ओह, शीज सो प्रीटी! लहान वाटते ना थोडी?

ह्रषिः सहा वर्षाचं अंतर आहे आमच्यात. कधी कधी ती गमतीने मला बाबा सुध्दा म्हणते. आमचं सोडा, तुमचं काय?

राधिकाः माझं काय ? घरचे शोधतायत. बघू कधी होईल ते. मला काही घाई नाहीये पण.

ह्रषिः करेक्ट आहे.

राधिका खिशातून पाकीट काढते. सिगरेटचं पाकीट समोर ठेवते. ह्रषि आश्चर्याने पहातो.

ह्रषिः काय गं? कधीपासून...?

राधिकाः (विषय टाळायचा म्हणून) काही नाही जनरलच!

CUT TO…

21. Int/ Home/ Drawing Room

हिम्मतराव आणि अमृताच्या गाण्याचा आवाज ऐकू येतो. मुझसे मुहब्बत का इजहार करती. काश कोई लडकी मुझे प्यार करती... दोन पाय सोफ्याच्या बाहेर बादलीत बुडवलेले आहेत. हळूहळू लुंगी वर घेऊन बसलेला हिम्मतराव आणि सोफ्याखाली अमृता असं दिसतं. हिम्मतराव लुंगी वर घेऊन बसलाय.

हिम्मतरावः काय दर्द आहे आवाजात...

अमृताः अल खराब!

खाकरल्याचा आवाज येतो. दोघं चमकून बघतात. ह्रषि ऑफीसमधून येऊन उभा आहे.

अमृताः आमच्या घराला मी तिलीस्मी दरवाजा नाव ठेवलंय. उघडल्याचा आवाजच येत नाही. बसा मालक...

ह्रषिः मी आलोच चेंज करुन!

हिम्मतरावः बसा हो... रात्री कुणाला कळतंय तेव्हा, नंतर करा चेंज!

ह्रषि त्याच्याकडे पहातो. बसतो.

अमृताः हां... या  या फोटोखालच्या कॉमेंटस वाच, मोठयाने वाच!

हिम्मतः  नॉटी बट नाईस, शॉर्ट पँट बट स्वीट फोटो, खडी है शबनम, पँट है थोडी कम, धूप का मौसम, साथ में हमदम, लुकिंग जॉर्जस...

जोरजोरात हसायला लागतो. ह्रषि पण हसतो.

ह्रषिः (हसत) काय पहाताय काय तुम्ही? आणि कोणही खडी शबनम??

अमृताः (हसत) कोण काय?

लॅपटॉप वळवते, तिचाच हॉटपँट मधला फोटो दिसतो. ह्रषि ते पहातो अचानक चेहरा बदलतो.

ह्रषिः अ,(तिच्याकडे पहात) कधी टाकलेस तू हे?

अमृताः (खूश आहे) काल! मस्त आहेत ना...??

ह्रषिः नाही बरोबर आहे पण...

अकाऊंट बंद करतो. मागे दगडूशेट आणि आयेशा जुल्काचा फोटो दिसतो. चमकतो.

हिम्मतरावः काहीही म्हणा... (ह्रषिच्या पाठीत मारत) या फोटोत एवढुशा चडडीत काय सामान दिसलीये अमरी!

ह्रषिः (उडतो.) काय?

हिम्मतरावः सामान! आयेशा जुल्का पेक्षा सामान!  काय अमरे... (तिला टाळी देतो.)

ह्रषि सर्द झालाय. मोठया शॉक मध्ये आहे. त्याचा चेहरा दिसत रहातो. त्यावर हिम्मतरावची वाक्य ऐकू येतात.

हिम्मतरावः काय सिनेमे बिनेमे पाहीले का नाही तिचे. अहो, आपल्या कडे वीस जीबीचं

फोल्डर आहे वेगळं, पप्यानी तर घराच्या दारावर एकसे एक फोटो लावलेत. अमरे एकदा घेऊन ये गं हयांना, तंबूतला पिक्चर दाखवू... फुल अंधेरेमे झामझूम, आणि ते गाणं कुठलं गं... हां... गुटर गुटम, गुटर गुटम... चढ गया उपर रे... अटरीयाँपे लोटण कबूतर रे...!

CUT TO…

22. Int/ Home/ Drawing Room

सोफ्याखाली गादीवर चादर अंथरली जाते. अमृता उशी टाकते. हिम्मतराव टीव्ही बघत बसलाय.

अमृताः आत झोप ना तिकडे !

हिम्मतः नको गं... हे जरा मोकळं ढाकळं वाटतं.

अमृताः बरं... (कमरेवर हात ठेवत) बरं झालं आठवलं, लग्न कधी करणारेस तू...

हिम्मतः जा ह्रषिकेशराव बोलवतायत.

अमृताः (त्याला मारते.) गप रे. खरंच, नाहीतर तुझी ती कोण सुजेन ब्राझील ची तिला विचार!

हिम्मतः सुजेन. अगं आकाराचा तरी विचार कर. माझ्या कमरेएवढा एकेक दंड आहे तिचा, सुजेनने एक धपाटा मारला तर मी सुजेन, अगं राग आला तर सिलेंडर फेकून मारते ती. तुला सांगतो (तिचा हात पकडतो.) एकदा तिचं लाडकं मांजर तिच्याच पायाखाली आलं, तर पार चेमटलं ते, आता भिताडावर लावलंय शोपीस म्हणून ! ॲ!

अमृताः (हसते.) बाकी मस्त आहे, शेवटचं खोटं होतं.

हिम्मतः होय गं? (तिचा हात पिरगाळतो.)

अमृताः सोड!

आत बाथरुममध्ये ह्रषि ऐकतो आणि झपकन वर पहातो.

अमृताः (त्याच्या डोक्यावरुन हात फिर वत) बरं वाटलं आलास, नाहीतर लग्नानंतर माझा रोबो झाला होता. जरा मोकळं वाटलं.

हिम्मतरावः तुमचा आभारप्रदर्शनाचा कार्यक्रम झाला असेल तर मी जरा लवंडू का?

अमृताः (हसते) बाय! (निघायला लागते.)

हिम्मत चॅनल बदलतो आणि अचानक त्याच्या चेहऱ्यावर आनंद दिसतो.

हिम्मतः (जोरात ओरडत) अमरे बघ काय लागलंय?

नार्गाजुनचा अत्यंत दुय्यम साऊथ सिनेमा लागलेला दिसतो.

अमृताः आईल्ला... एक नंबर!! किती दिवस झाले पहायचा होता...

पळत जाऊन त्याच्या जवळ बसते. दोघे आनंदाने पहातायत. नार्गाजून फाईट मारताना दिसतो.

CUT TO…

23. Int/ Home/ Bedroom

ऱ्हषि कूस वळवून पहातो. तर बेडवर अमृता नाहीये. तो उठतो. इकडे तिकडे पहातो. बाहेर जातो. तर सोफ्यावर अमृता झोपलेली आणि खाली गादीवर हिम्मतराव. तो परत येतो आणि धाडकन दार लावून घेतो.

CUT TO…

24. Ext/office/Day

दार उघडतं. राधिका आणि ह्रषि स्मोकिंग झोन मधून आत येतात.

राधिकाः आयटी कपंनीत एवढा मोकळा वेळ असतो असं वाटत नाही. बघ ना, कॉफी प्यायली तीनदा, दोनदा सिगरेट ओढली, नेटवर बसले दोन तास.

ह्रषिः आत्ता वेळ जाता जात नाहीये, एकदा प्रोजेक्ट मिळाला की मग सगळं घेऊन इथंच रहायला यायला लागेल. मग नो एस्केप.

राधिकाः बघूयात ना. खरंतर मी खूप एक्साईटेड आहे काम करायला. नाहीतरी एमसीएम कधी कामाला येणार?

ह्रषिः (चमकून) काय तू एम सी एम केलंस? कधी?

राधिकाः दोन वर्षांपूर्वी.

ह्रषिः (ऑलमोस्ट हसत) एवढया उशीरा?

राधिकाः (त्याच्या डोळयात डोळे घालत) पढनेकी कोई उम्र नही होती, जब चाहे शुरु हो जाये.

ह्रषिः यकीन नही आता क्या ये वही राधिका है...?

राधिका शांतपणे हसते. ती एका ठिकाणी थांबते.

राधिकाः एक मिनिट एक मिनिट...

पोस्टर दिसतं त्यावर समर बॉलिवूड बॅश आणि खाली प्रोजेक्ट अचिव्हर्स फेलीसीटेशन असं लिहीलंय.

राधिकाः चला, काहीतरी हॅपनिंग आहे! तू जाणारेस का?

ह्रषिः मला प्राईज आहे, जावचं लागेल !

राधिकाः तू जाणार असशील तर मग मी पण येईन.  माझ्या बाकी कोणी फार ओळखीचं नाहीये. तुझ्या बायकोलाही घेऊन ये ना, मी भेटीन तिला.

ह्रषिः हं... भेटू ना... चला, निघतो आत्ता. (जायला निघतो.)

राधिकाः ह्रषि, (ह्रषि वळतो.) खूप बरं वाटलं तुला भेटून, तू मजेत आहेस हे बघून.

ह्रषि छान हसतो.

राधिकाः सिरीयसली.

ह्रषि पुन्हा तसाच हसतो.

राधिकाः तू सुदर्शन चक्र का नाही लावत करंगळीला?

हृषिः निघतो मी...तुमचं बरं आहे...आम्हाला कामचं काम आहे.

CUT TO...

एका पार्टीशनच्या इथून जाताना हसण्याच्या आवाजने थबकतो. त्याच्या कानावर वाक्य ऐकू येतात. ‘नाही रे, तू बघ तिला, माईंड ब्लोईंग आहे, पाटील म्हणून आहे गावचा त्याच्या फ्रेंड लिस्ट मधली आहे, आत्ता हनिमूनला जाऊन आली, शी इज टू गुड!! दुसरा हसतो. हृषि हे ऐकतो. इकडे तिकडे पहातो. अस्वस्थ झालाय.

CUT TO...

25. Int/Home/Evening

अमृताच्या ओरडण्याचा आवाज येतो. दार उघडतं तर अमृता आणि हिम्मतमध्ये आॅलमोस्ट मारामारी चालू आहे. अमृताने एक फोटो वर धरलाय. हिम्मत तो फोटो घ्यायचा प्रयत्न करतोय.

अमृताः मी हा फोटो देणार नाही, तू काय पाहीजे ते कर.

हिम्मतः टाकीन दोन रटटे. गपचूप दे.

दोघे समोर पहातात. हृषिकेश उभा आहे.

हिम्मतरावः सांगा हिला, मी म्हणलं हीचा जॅकी श्रॉफच्या कटआऊटची पप्पी घेतानाचा फोटो आहे मी म्हणलं... हाच लाव ना फ्रेम करुन...

हृषिः अमृता बाहेर ये जरा...

अमृताः तू आधी यातला कुठला फोटो फ्रेम मध्ये टाकायचा हे सांग. हा आमचा जास्त चांगला आहे की नाही? मग? (फोटो फ्रेम मध्ये टाकते. त्याच्या जवळ येते. ) आज जुने फोटो प्रिंट करुन आणले त्याने. मस्त ना?

हृषिः कधी निघतोयस तू?

हिम्मतः काय?

हृषिः नाही म्हणजे कधी पर्यंत आहेस?

हिम्मतःकाय आठवडाभर...

अमृता वळून पहाते हसते. हिम्मत डोळा मारतो. हृषि वैतागतो.

हिम्मतः गम्मत केली हो! हे काय निघालोच.

अमृता त्याच्या जवळ आलीये.

अमृताः का काही झालं का?

हृषिः नकारार्थी मान डोलावतो.

अमृताः बोल ना काय झालं? तू असं का विचारलंस?

हृषिः नाही मी कालच विचारणार होतो. (मोठयाने) पण तू काल रात्रभर बेडरुम मध्ये नव्हतीस!

अमृता अचानक बावरते. हृषि निघून जातो. हिम्मतराव त्याच्याकडे पहातो.

हिम्मतरावः अमरे आय द गो!

सगळे फोटो एकत्र गोळा केले जातात.

CUT TO…

26. Int/Home/Evening

फेसबुकचं पेज दिसतं. गाडी निघून गेल्याचा आवाज येतो. अमृता खिडकीतून बाहेर पहातेय. आत येते.

हृषि लॅपटॉपवर बसलाय.

हृषिः अमृता, तुझा फेसबुकवरचा फोटो काढून टाक.

अमृता त्याच्याकडे आश्चर्याने पहाते.

अमृताः काय?

हृषिः फेसबुकवरचा फोटो काढून टाक.

अमृताः काय रे एकदम? (त्याच्या जवळ येते.)

ह्रषिः मी सांगतोय ना. प्लीज माझं ऐकशील. हां, प्लीज काढून टाक.

तिथून उठतो. तिला बसवतो. अमृताला काही कळत नाहीये. तो पुन्हा तिच्या खांदयावर हात ठेवतो.

ह्रषिः आणि समजा कुणी विचारलं तर माझं नाव सांग. म्हणावं  ह्रषिने टाकायला सांगीतला होता, मलाच काढावासा वाटला.

अमृताः पण का? मला कळत नाहीये एकदम भसकन काय झालंय काय?

ह्रषिः प्रत्येक गोष्टीला कारण असलंच पाहीजे का? ( अधिकाराने.) प्लीज! मी सांगतोय ना!

अमृता त्याच्याकडे पहाते. वळते. आणि फोटोज डिलीट करते. ह्रषि मागून पहातोय. अमृता डिलीट करते आणि उठते. तशीच चिडून उठते.

अमृताः (जाताजाता) केले डिलीट सगळेच!

ह्रषि तिच्याकडे पहातो. आश्चर्यचकीत होतो. तिला जाऊन थांबवतो. ती मागे वळते.

ह्रषिः हे काय वागणं आहे? हा अतिरेकीपणा झाला, मी, मी फक्त त्या एका फोटो बददल बोलत होतो.

अमृताः नाही, कळलं मला, हिम्मतराव सामान म्हणाला ना म्हणून तुला हे सगळं सुचतंय.

ह्रषिः वेडी आहेस का तू?(ती निघते. तिला धरुन, अधिकाराने) तू बोल माझ्याशी आधी.

अमृताः (हात सोडवत) काय बोलणार? आज फोटो काढायला लावलास, उदया म्हणशीलही इंटरनेट वापरायचं नाही, परवा बाहेर जाताना बुरखा घालून जा म्हणायलाही कमी करणार नाहीस!

तो मान खाली घालतो. शांत आहे. ती त्याच्या जवळ जाते, त्याला खिजवायला त्याच्यकडे पहाते.

अमृताः काय, कर ना मान्य, त्रास झाला तुला, तो सामान म्हणाल्याचा. अं, सांग ना तुला सहन नाही झालं! मी काढले असते फोटो. (गुदगुल्या करते.) ऐ, पंप्या बोल ना... पंप्या..

ह्रषिः (संतापून) बास्स! हे लहान मुलासारखं वागणं बंद कर प्लीज... वैताग आलाय मला. (अमृता थबकते.) तू एककाम कर, धर, आणखी टाक फोटो, कपडे न घालताही टाक. मग आजच्यासारखी ऑफीसमध्ये लोकं घाण घाण बोलू दे... होऊ दे मला त्रास. पण तुला काय? तुला काहीच वाटणार नाही, तुला उलट भारी वाटेल, कारण तुला प्रोत्साहन दयायला तुझा तो फालतू मित्र आहेच. ग्रो अप, अमृता! मजा मजा बास्स! माझा पेशन्स संपायच्या आत बंद कर हे!

तिथून निघून जातो. दार धाडकन बंद होतं. अमृताचा चेहरा दिसत रहातो.

CUT TO…

27.Int/Bedroom/Night

अमृता सताड डोळे उघडे ठेऊन झोपलीये. ह्रषि लांब कूस वळवून झोपलाय. अमृता त्याच्याकडे पहाते आणि शेजारी वळते. समोर दोन फोटो आहेत. एक तिचा आणि ह्रषिचा, आणि एक तिचा आणि हिम्मतचा लहानपणीचा. ती दोन्हीकडे पहाते. पहात रहाते.

CUT TO…

28. Int/Office/ Evening

आरसा ॲडजेस्ट केला जातो. गाडीच्या आरशातून राधिका आणि ह्रषि बोलत बोलत येताना दिसतात.

राधिकाः मग काय आज दुपारी पिक्चर पाहीला मी.

ह्रषिः काय? कोणी बघीतलं नाही?

राधिकाः पराग सरच म्हणाले बिनधास्त बघा म्हणून. नेक्स्ट वीक पासून सुरु होणारे काम! तेही बिझी आहेत पार्टीच्या अरेंजमेंट मध्ये. मग काय फ्लोअरवर आनंद आहे.

ह्र्षिः व्वा!

दोघे हसतात.

कॅबवाला उतरतो. राधिका थांबते. त्याच्याकडे पहाते. तो दार उघडतो.

राधिकाः चल, मी निघते.  बाय, भेटू...

कॅब मध्ये बसायला जाते. तेवढयात कॅबवाला तिला हात लावतो. तिला एकदम शिसारी येते.

राधिकाः (एकदम आवाज लावत ओरडते.) ( फाडकन मुस्काडात मारते.) लाव अजून हात लाव, कुठे लावायचाय ? आँ? हात लावतोस? (परत मारते.)

ह्र्षि मागे वळून पहातो. तिकडे जातो. तिच्या जवळ येतो.

ह्र्षिः काय गं काय झालं?

राधिकाः चार दिवस झाले बघतीये. मी आले की हयाचं सुरु होतं. माझ्यावर मिरर अॅडजस्ट करतो, मुददामून दार उघडायला येतो, एक दोनदा हातही लावला, मला वाटलं चुकून लागला असेल, म्हणून दुर्लक्ष केलं. आज लिमीट क्रॉस केली यानी (त्याची गचंडी धरते.) काय वाटतं तुम्हाला बाई म्हणजे? कधीही कुठेही हात लावाल? तू परत जर दिसलास ना आसपास. आत्ता हातानी मारलंय, बांबू घालीन डायरेक्ट!

ह्र्षि राधिकाला धरतो.

ह्र्षिः तू शांत हो, प्लीज.(पुढे घेऊन येतो. एक दोन क्षण जातात.)

राधिकाः (डोळयात संताप तसाच आहे.  डोळे मिटते पुन्हा उघडते.)

ह्र्षिः आर यू ऑलराईट?

राधिकाः (मान डोलावते.) बाई म्हणजे वाटते काय यांना, पाहीजे तेव्हा पाहीजे तसं मोलेस्ट करु शकतात का?

हृषिः राधिका, शांत हो... (तिच्या खांदयावर हात ठेवतो. ती त्याच्या कडे पहाते.) मी सोडतो तुला चल.

राधिकाः (राग आवरत) नाही नाही मी जाते.

हृषिः प्लीज.

राधिकाः नाही खरंच नको, मी जाते माझी माझी.

हृषिः रिक्षाचे पैसे मला दे... चल!

राधिका शांतपणे त्याच्याकडे पहाते.

हृषिः चल गं, जास्त भाव खाऊ नकोस.

राधिकाः ओ के.

तिथून चालायला लागतात. गाडीपाशी येतात. हृषि रिमोट ने गाडी उघडतो.

गाडीचे लाईटस ब्लिंक होतात.

CUT TO...

28A. Int/Office/ Evening

राधिका गाडीतून उतरते. बाहेर येऊन दारापाशी थांबते.

हृषिः (मीटर टाकल्याची अॅक्शन करत)चाळीस रुपये पन्नास पैसे.

राधिकाः थॅंक्स!

हृषिः बाय द वे, मघाशीच विचारणार होतो, बॅडमिंटन चालू आहे का अजून?

राधिकाःनाही, परत सुरु करायचंय. पार्टनर शोधतेय. तू आलायस तर घरी चल ना, आईला भेट.

हृषिः अगं, नाही नाही. आत्ता येत  नाही, परत उदयाची तयारी करायचीये. कपडे आणायचेत.

राधिकाः बरं. ठीक आहे.

ह्रषिः चल...

राधिकाः ह्रषि, सॉरी मी मघाशी एकदम अशी रिॲक्ट झाले. पण मी नाही टॉलरेट करु शकत.

ह्रषिः इटस ओके.  करायलाही नाही पाहीजे.

राधिकाः उदया भेटूयात. उदया काय कॉश्च्युम?

ह्रषिः बघ फक्त तू! वेड लागणारे सगळयांना...

राधिकाः वाव! भेटू उदया. बाय.

ह्रषि हसतो. राधिका लांब जाते. मागे वळून पहाते. त्याला बाय करते.

CUT TO…

29. Int/Home/Night

पोलिसाचा अर्थात बाजीराव सिंघमचा वेश घालून ह्रषि आरशात उभा आहे. खोटया मिशीवर हात फिरवतोय. अचानक दार उघडतं. समोर पहातो तर अमृता बॉबीमधल्या डिंपलच्या वेशात उभी आहे.

अमृताः काय?

ह्रषिः व्वा!  तुला असं पाहीलं की सगळा राग विसरायला होतं.

अमृताः डन (त्याला मिठी मारते.)!

ह्रषिः ॲक्चुली मला विचारशील तर तू बॉबी पेक्षा जब वी मेट मधली गीत म्हणून चांगली दिसशील.

अमृताः इ, त्या घरगुती कपडयात?

ह्रषिःतीच तर गम्मत आहे, पार्टीसारखे कपडे घालून प्रत्येकच जण येणार. पण असा विचार कोणी केला नसणारे. म्हणजे मी तुझ्या कॅरे क्टर वाईज म्हणतोय बाकी मला कपडयाचा

काही प्रॉब्लेम नाही. म्हणजे तू ठरवं. हा कसा आपल्या आपल्यातला आहे. बाहेर, कॅरेक्टर म्हणून तो एकदम वेगळा दिसेल! परत हां, मला कपडयांचा प्रॉब्लेम नाही... हां... नाहीतर परत म्हणशील मी कपडयांवरुन बोललो...

ती त्याच्याकडे नाराजीने पहाते.

CUT TO...

30. Ext/Party venue/Night

हृषिकेशची गाडी पार्टीच्या ठिकाणी पोचते. शेजारुन एक जण ठाकूर म्हणून येतो. दुसरा त्याला शेक हँड करतो. ठाकूर तसाच उभा आहे. अमृता आणि हृषि गाडीतून उतरतात. अमृता गीतच्या वेशात आहे. राधिका त्यांच्याकडे पहाते. समोर चालत येते. ती बॉबीमधली डिंपल बनून आलीये.

राधिकाः व्हॉट अ प्लेजंट सरप्राईज!

हृषिः माईंडब्लोईंग दिसतेयस.

अमृता त्याच्याकडे पहाते.

अमृताः फारच कमाल आहे. नाही?

हृषिः हो! (सावरत) मग? मी म्हणलंच होतं तुला! बरं झालं ना? नाहीतर सेम झाला असता!

अमृता त्याच्याकडे पहाते. हसते.

हृषिः राधिका, अमृता, अमृता राधिका.

दोघी शेक हँड करतात तेवढयात तिसरा एक हात मध्ये येतो. अमृता आणि राधिका वर पहातात. हिम्मतराव उभा आहे.

अमृताः तू?

हिम्मतः नमस्कार... ( दोघं एकमेकांना वाकून नमस्कार करतात.राधिका अवाक होते.)

अमृताः आईल्ला! तू कसा काय इकडे!

हिम्मतः सांगतो. मॅडम मस्त आहेत पण.

राधिकाः एक्सक्युज मी!

हिम्मतः मस्त आहे तर मस्त आहे, आपलं सगळं तोंडावर असतं.

राधिकाः हू आर यू?

हिम्मतः लेट मी इंट्रोडयूस, माय नेम इज हिम्मतराव धोंडे पाटील,

चाईल्डहूड फ्रेंड ऑफ अमरी.

राधिकाः अमरी...??

अमृताः मी... हा माझा बालमित्र. सायंटिस्ट आहे. ऑक्सफोर्ड चा टॉपर आहे.

राधिकाः ओह! हाय!

हिम्मतः बघा, शिक्षणाला किती महत्व आहे, शिक्षण सांगोपर्यंत एकदम हाडहूड करत होत्या.

आता शेक हॅंड करतायत आपणहून.

ह्रषिः तू कसा काय इ कडे?

हिम्मतः पराग काळे आपला मित्र! मला म्हणला ये, म्हणलं आलो!

राधिकाः ओह, पराग सर! ते माझे सिनियर!

हिम्मतरावः पराग सर? सिनियर? अहो पऱ्या माझा गांड दोस्त!

मागे जोरात गाडी धडकल्याचा आवाज येतो. ह्रषि लांब निघून जातो. राधिका तोंडावर हात ठेऊन उभी आहे.

हिम्मतरावः अहो मॅडम, लहानपणी आम्ही डॉक्टर डॉक्टर खेळायचो तेव्हा हा पऱ्या कॅलक्युलेटर वर कॉम्प्युटर खेळायचा, मी सातवीत असताना दहावीचा अभ्यास घेतला होता त्याचा, मलाच म्हणला होता परिक्षेला बस, पण म्हणलं चुकून बोर्डाबिर्डात यायचा!

अमृताः त्यांनी बोलवलंय ठीक आहे, पण आज बॉलिवूड थीम आहे.

हिम्मतरावः आपल्याला नाही लागत!

अमृताः असं कसं, त्याशिवाय आत सोडणार नाहीत! कम्पलसरी आहे.

हिम्मतः अस्सं!?? त्याला काय लागतंय तेव्हा ?? आलोच!

गाडीतून जाऊन दोरखंड आणतो, निळा फुल स्लीव्हस दुमडतो, शेजारुन कपडयांना माती लावून घेतो, आणि बॅच उलटा करुन त्याच्यावर सेवन एट सिक्स लिहीतो. दोरखंड खांदयावर घेतो. आणि हुबेहूब दिवार मधल्या अमिताभ सारखा दिसतो. मागून पराग येतो.

परागः अहो पाटील साहेब, कुठे आहात कुठे तुम्ही?

हिम्मतः पराग, तुम लोग मुझे वहाँ ढूंढ रहे हो, और मै तुम्हारा यहाँ इंतजार कर रहा हूँ! एँ

पराग हसतो. राधिका हसते. अमृता हसते.

परागः चला...

राधिकाः चलो... लेटस गो... (अमृताचा हात धरुन निघते.)

हिम्मतः ( हृषिला) चला एँ... हृषिकेशराव कुठे गेले एँ, बोलवा त्यांना एँ,

सगळे आत जातात...

CUT TO...

30A. Int/party venue/ Night

बार पाशी हिम्मतराव आणि राधिका बसलेले आहेत.

हिम्मतः मॅडम तुम्ही काय करता एक्सॅक्टली?

राधिकाः मी याच कंपनीत जॉईन झालेय, आठ दहा दिवस झाले.

हिम्मतरावः डेटा एन्ट्री ऑपरेटिंग?

राधिकाः व्हॉट?

हिम्मतरावः नाही डेव्हलपमेंट टेस्टींग का डेटा एन्ट्री ऑपरेटिंग?

राधिकाः टेस्टींग.

दोघं समोर पहातात.

राधिकाः ऐ, तुझा नंबर दे ना...

हिम्मतः बुटाचा? आ सॉरी मोबाईलचा... घ्या... ९१९८५२२०१२... मागच्या वर्षी ११ होता,

त्याच्या आधी १०, त्याच्या आधी मोबाईलच नव्हता , पीसीओ, एक रुपयात धुमाकूळ!

राधिका हसते. हृषि येतो. हातात ड्रिंक

हिम्मत घेतोः थँक यू, एँ...

हृषिः सॉरी तुला बोअर झालं असेल.

राधिकाः आजीबात नाही, हा पराग सरांचा गांड दोस्त!

हृषि चक्रावून तिच्याकडे पहातो.

CUT TO… TIME TRANSITION

CUT TO…

30B. Int/ Party venue/ Night

हृषि, राधिका, अमृता आणि हिम्मत उभे आहेत. समोर एक मुलगा राजकपूरच्या वेशात माईकवर

‘जिस देश में गंगा बहती है’गातोय.

हिम्मतः  (त्या मुलाकडे पाहून) हा जर गायक असेल तर मी तर तानसेनच आहे! (राधिका हसते.) नायतर काय? आणि काय चाललंय हे? ही काय पार्टी आहे? त्या पऱ्याला विचारतो जेवायला काय मऊभात ठेवलाय का? जरा नाचा बिचा की! (राधिका हातानेच नाही म्हणते.) काय गं अमरे? ओ ह्रषिकेशराव.

ह्रषिः राहू दे.

हिम्मतः नको तिथं जाम लाजता तुम्ही आयटी तली लोकं. पार्टी म्हणल्यावर कसं नाचायला पाहीजे, दंगा घालायला पाहीजे. पण तुम्ही म्हणजे इथं येणार ते स्ट्रटॅजी म्हणून. एंजॉयमेंट म्हणून नाही! ते बघा...

(समोर लोक उभे आहेत, एकमेकांना कार्ड देतायत. बिझनेसचं बोलतायत. मुलाला मोजक्या टाळया मिळतात. मुलगा पुन्हा गातोय, तेरे मन की गंगा और मेरे मन की जमना)

हिम्मतरावः अरे हा परत गायला लागला! चला मी जातो... तुम्हाला मजाही नीट करता येईना.

ह्रषिः एवढं असेल तर तू जा, आणि तू गा. तू कर मजा...

हिम्मतरावः गायलं असतं झेपायचं नाही तुम्हाला...

ह्रषिः झालं काढलंस कारण? तुमच्यात भाषेत सांगायचं तर बोलायला राघू आणि कामाला आगलागू असं म्हणतात याला. चला, जाऊ दे.

हिम्मतरावः (ग्लास ठेवतो.) अरर... उगाच बोललात. आता बघा...फुलपाखरांची शपथ घेऊन सांगतो, नाहीना तुम्ही आपणहून माझ्याबरोबर नाचायला आलात... नाव हिम्मतराव धोंडे पाटील, लावणार नाही. (उठतो.) लक्षात ठेवा, असल हिम्मत तर होईल गम्मत. (तिथून उठतो.)

राधिकाः ऑल द बेस्ट. (ड्रिंक घेते. समोर पहाते.)

हिम्मत माईकपाशी जातो आणि सुरु करतो.

SONG 3: PARTY SONG, WHERE HIMMATRAO GRABS THE WHOLE ATTENTION AND BECOMES A STAR. KETKI AND AMRUTA JOIN HIM AND DANCE LIKE NOBODY WATCHING. RISHI IS FRUSTRATED. HE DRINKS HEAVILY IN THE FRUSTRATION.

Cut To…

30C. Int/ Party venue/ Night

पराग काळे (माईकवर)ः बाय द वे, आपले आजचे फेलिसीटेन्स होणारेत त्याच माणसाकडनं, ज्यानं इतका वेळ आपल्याला नाचवलं, धमाल केली… फुलपाखरांवरच्या डायव्हसिर्टवर ऑक्सफोर्ड मधून स्कॉलरशिप मिळवलेला या देशातला पहिला माणूस, त्या विषयावर तेवीस इंटरनॅशनल पेपर्स प्रेझेंट केलेला एकमेव भारतीय, आणि भारत सरकारचा यंग सायंटिस्ट अवार्ड सर्वात कमी वयात मिळवलेले एच डी पाटील, अर्थात हिम्मतराव धोंडे पाटील.

हिम्मत समोर येतो. हृषि दारुचा ग्लास रिकामा करतो.

परागः या वर्षीचं पहील अवार्ड… हृषिकेश देशपांडे…

सगळे टाळया वाजवतात. अमृता आणि राधिका ओरडत टाळया वाजवतात.

परागः हृषिकेश देशपांडे…

हृषि चिडून निघतो. वर जातो हिम्मत कडून अवार्ड घेतो. हिम्मत अमृतालाही बोलवतो. दोघं मिळून अवार्ड घेतात. राधिका टाळया वाजवतेय. हृषि तिच्या हातात अवार्ड सोडून खाली चालत येतो.

Cut TO…

31. Int/Home/ night

घराचं दार उघडलं जातं. ह्रषि आणि अमृता आत येतात. चपला टाकल्या जातात. अमृता ह्रषिची ट्रॉफी डेस्कवर ठेवते. आणि दमून सोफ्यावर बसते.

अमृताः ह्रष्या, मस्त आहे राधिका.. कशी आली होती ना ती राधिका. हिम्मत तर वेडाच झाला तिला बघून! तोच गेलाय सोडायला.

ह्रषिः ओ? इज इट? द ग्रेट हिम्मतराव... द बटरफ्लाय मॅन! बसला लगेच दुसऱ्या फुलावर! यूसलेस बटार...

अमृताः माहीतेय मला तू का चिडलायस ते. राधिका बरोबर नाचायला गेलास, तेवढयात तिनं हिम्मतचा हात धरला...

ह्रषिः तो जो लुंगी घातलेला दोन पायांचा प्राणी आहे ना, त्याच्यामुळे चाललंय सगळं. सगळीकडे येतो, तुला घेऊन जातो. मग राधिका बरोबर नाचतो. मी विचारु का त्याला का करतो तो हे?

अमृताः (सोफ्यावर पडत) हां, विचार विचार...

ह्रषिः बघं हां... (फोन काढतो. फोनलावतो) हॅलो बटारफ्लाय मॅन, काय? इतके दिवस बायको होती ते पुरलं नाही का? का इंटरेस्ट संपला तिच्यातला? लगेच राधिका बरोबर सुरु. एका वेळेला दोन दोन फुलांवर, आयेश है एका बटार ची !

(अमृता दचकून पहाते. उठते.त्याच्या जवळ जाते. त्याच्या फोन बंद करायचा प्रयत्न करते.)

ह्रषिः तू परत तिला भेट, नाही ना दोघांच्या तंगडया तोडून हातात दिल्या, नाव सांगणार नाही अरे भाडया...

अमृताः (फोन काढून घेते.) हॅलो हिम्मत! (फोन टाकते. त्याच्याकडे पहाते.)

अमृताः खोटा खोटा फोन लावलास तू? काय चाललंय काय हे?

ह्रषिः रॉंग क्वश्चन टू रॉंग पर्सन! तुमचं काय चाललंय? मी मध्ये आलोय ना तुमच्या?

अमृताः (ओरडत) प्लीज थांबव हे!

ह्रषिः (शेजारची ट्रॉफी उचलतो. थाडकन जमीनीवर आपटतो.) मी? मी थांबवायचं? अगेन रॉंग क्वश्चन टू रॉंग पर्सन! तुम्ही थांबवा, नाहीतर तुम्ही रहा, मी जातो...

निघायला लागतो. अमृता थांबवायला जाते.

अमृताः (त्याला धरत) तू आत चल आधी...

ह्रषिः (तिला धरतो.) मला कोणी सांगायचं नाही. परत तो दिसला तर आपले संबंध संपले. कळलं? संपले म्हणजे फिनिश्ड! बास्स!

अमृता त्याच्याकडे पहाते. त्याला धरुन आत नेते.

Cut To…

ह्रषि बेडवर पडतो. अमृता त्याचे पाय सरळ करते. त्याच्या अंगावर चादर टाकते. आणि तिथून निघते.

ह्रषिः (तिचा हात पकडतो.) तिला आणि त्याला काही सांगायची काही सोय नाही. पण तू... तू तरी अशी नको वागूस राधिका... तुला माहीतीये मला तुझी काळजी वाटते... आणि तो माणूस गोड गोड बोलून तुला लांब घेऊन जाईल. प्लीज राधिका. ट्राय टू अंडरस्टॅंड.

अमृता हात सोडवते आणि तशीच खाली बसते. प्रचंड शॉक्ड आहे.

Cut To...

32. Ext/ office Smoking zone/ afternoon

मॅनेजर समोर बसला आहे. हायपर आहे.

मॅनेजरःकाय करु मी या लोकांचं? बँगलोरच्या क्लायंटने डेडलाईन प्रीपोन केलीये आणि त्यात सारीकानी प्रेगन्सीमुळे पेपर्स टाकलेत.

ह्रषिः (हसत) डोन्ट वरी विनय मी आहे. आणि नवीन रिक्रुटमेंट पैकी घेऊयात कोणीतरी.

मॅनेजरः साहील आहे...

ह्रषिः अं...साहील नाही रे... एवढया लवकर नाही ग्रास्प करणार तो.

मॅनेजरः स्वामीनाथन...?

ह्रषिः स्वामीनाथन... चांगली आहे. (अंदाज घेत) अं... राधिका...?

मॅनेजरः मला काही प्रॉब्लेम नाही, तू कम्फर्टेबल आहेस ना... असशीलच म्हणजे. मी परागशी बोलतो.

ह्रषिः ओ के. बेस्ट.

मॅनेजरः ती सगळयात नवीन आहे हां पण.

ह्रषिः मी घेतो ना करुन...

मॅनेजरः सगळं ठीक आहे. फक्त जरा हळू!

ह्रषिः (हसत) डोन्ट वरी! तुला वाटतंय तसं काहीच नाहीये. (उठतो. ) आणि तू प्लीज डोक्यातनं हे काढून टाक.

मॅनेजर त्याच्याकडे पहातो. फोन उचलतो.

मॅनेजरः हॅलो पराग...?

CUT TO...

33. Int/ Home/Day

फेसबुक वर राधिकाचं अकाऊंट दिसतं. अमृता ते चेक करतेय. त्यात फीलींग हॅपी अॅण्ड एक्साईटेड आफ्टर लाँग लाँग टाईम' असा स्टेटस दिसतो. जीमेल वर हिम्मत चॅटवर आहे ती डिसेबल करते.

ह्रषिः (फोनवर बोलत आत येतो. ) थोडा वेळ लागेल. पण होईल. आपण एकत्र काम करणार म्हणजे न व्हायला काय झालं? हे बघ काही गोष्टी डेस्टीन्ड असतात. त्या होतातच. (अमृता त्याच्याकडे आश्चर्याने पहाते.) ते करुयाच, तसही मला काहीतरी फिटनेस अॅक्टीव्हीटी करायचीच होती डेस्परेटली, आणि त्यात तू असलीस तर बेस्ट! तिला विचारतो मी.

फोन ठेवतो. अमृता शांत आहे.

अमृताः पानं घेते.

ह्रषिः नाही नाही मे खाल्लं मघाशीच...

अमृताः अरे, कळवायचं नाहीस, मी आख्खा स्वयपाक केला आज.

ह्रषिः अच्छा तू आख्खा स्वयपांक केलास का आज? मला कसं कळणार पण.

अमृताः एक फोन करता येतो ना. महत्वाचं वाटलं पाहीजे फक्त.

ह्रषिः कामात होतो मी आणि नाही वाटलं तेव्हा महत्वाचं.

अमृता त्याच्याकडे पहाते. त्याचा आवाज येतो.

ह्रषिः मी आणि राधिका बॅडमिंटन खेळायला जाणार आहोत. यू कॅन जॉईन इफ यू वॉन्ट!

अमृता त्याच्याकडे वर पहाते. साटकन आवाज येतो.

CUT TO…

34. Int/ Badminton Court/ Day

ह्रषि (ओरडत)ः फोरटीन टवेल्व्ह

राधिका सर्व्हीस करते. अमृता रिर्टन करते. राधिका जोरात स्मॅश मारते. अमृता चुकते.

ह्रषिः (टाळया वाजवत ओरडतो.) सेट अॅण्ड मॅच राधिका . दोघी नेटच्या बाजूला येतात.

अमृता तिच्याकडे बघून हसते.

राधिकाः (तिला जवळ करत) माझी तर प्रॅक्टीसच संपलीये.  आणि अमृता चांगली खेळतेस की तू! थोडा क्वीकनेस पाहीजे अजून!  कदाचित ट्रॅकपँट मुळे तुला थोडं अवघड पडत होतं.

ह्रषिः हो मग काय... अगं शॉटर्स घालून यायची ना... खेळताना बरं पडलं असतं. आणि शॉर्टसची खरी गरज इथे आहे. खेळाताना कम्फर्ट सगळयात महत्वाचा. काय राधिका?

राधिकाःऑफ कोर्स!

अमृताः निघूयात?

राधिकाः या सगळयात तुम्हाला सांगायचचं राहील...

अमृताः काय लग्न करतीयेस?

ह्रषिः तू वेडी आहेस का जरा?

अमृताः मी विचारलं फक्त! तू एवढा काय उचकतोयस?

राधिकाः थांबा! (जर्कीन काढते.) हा टी शर्ट कसा आहे?

ह्रषिः फॅब्युलस, कलर्स तर अप्रतिम आहेत, नाही अमृता? (पाणी पितो.)

राधिकाः (अमृताला) मस्त आहे ना? हिम्मतराव ने दिलाय. (ह्रषिच्या तोंडातून पाणी पडतं) कालच आला. टी शर्ट आणि पोस्टकार्डस पण . अशक्य माणूस आहे मला फोन केला आणि म्हणाला (त्याच्यासारखं बोलत) मॅडम तुमचे डोळे सेम आयेशा जुल्कासारखे आहेत.

अमृताला टाळी देते.

अमृताः ठसका लागला त्याला! ह्रषि! पाहीलास का रे नीट? बघ किती मस्त फुलपाखरं आहेत.

राधिकाः काका लाईटस बंद करा...

ह्रषिः हं, मघाशी बरा वाटला होता, आता जरा भडक वाटतोय, म्हणजे असा रस्त्यावरनं घेतल्यासारखा. असं वाटतंय ते फुलपाखरु कधीही उडून जाईल! चला, आपल्याला उशीर होतोय.

तिघे निघतात. धाप धाप धाप लाईटस बंद होतात.

CUT TO…

35. Int/ Radhika Home/ Night

राधिका आणि आई शेजारी झोपलेत. राधिका सताड डोळे उघडे ठेऊन विचार करतेय. पलिकडच्या खोलीतून बहीणीचा नवऱ्याशी फोनवर बोलण्याचा आवाज ऐकू येतो. अत्यंत प्रेमाने बोलतेय. राधिका ला ते सगळं ऐकू येतंय ती शांतपणे कूस बदलते. मोबाईल काढते.

CUT TO…

36. Int/ Bedroom/ Night

अमृता बेडवर बसलीये. ह्रषि बाथरुममध्ये आहे. मोबाईलचा मेसेज टोन वाजतो. ती त्याकडे बघते. आणखीन एक वाजतो. ती पुन्हा पहाते. थोडी चलबिचल होते पण उचलत नाही. तशीच शांतपणे बसून रहाते.

CUT TO…

37. Int/ Office/ Afternoon

ह्रषि काम करत बसलाय.  आवाज येतो शुक शुक. ह्रषि फास्ट टाईप करतोय. पुन्हा आवाज येतो. शुक शुक.

ह्रषि तिकडे पहातो. राधिका डोकावून पहाते.

राधिकाः ह्रषि हे प्रोसेस वन सोपं होतं. टू जरा कॉम्प्लीकेटेड आहे. आपल्याला बराच वेळ बसून करायला लागणारे.

ह्रषिः करुयात. (समोर पाहून काम करतो. मध्येच तिकडे बघतो.) बाय द वे...

राधिका तिकडे नाहीये. मागे वळतो. ती समोर उभी आहे. हातात सिगरेटचं पाकीट आणि लायटर

ह्रषिः आत्ता अर्ध्यातासापूर्वी ओढलीस ना? तू कमी कर हां सिगरेट.

राधिकाः करते. उदयापासून.

ह्रषिः सिरीयसली सांगतोय, पुढे खूप प्रॉब्लेम्स कॉम्प्लीकेशन्स होतात, अजून लग्न व्हायचंय तुझं! (ती मानेनीच ओके म्हणते.) आणि आज काय करायचं? घरी येतेस का?

राधिकाः नको. आपण इथेच थांबू! नाहीतर आपापलं काम करुन उदया भेटूच.

ह्रषिःइथे नको थांबायला. आणि रात्री वेगवेगळं काम करण्यापेक्षा एकत्र बसू ना. प्रोसेस फ्लो टू मिळूनच बघायला लागणारे.

राधिकाः अं, बर! (जायला लागते.)

ह्रषिः आणि हां...मी विनयशी बोललोय. बँगलोर ला तू पाहीजेस माझ्याबरोबर.

राधिकाः (त्याच्याकडे पाहून हसते) ओ के!! (तिला बरं वाटलंय)

तिथून निघून जाते. ह्रषि परत खुर्ची फिरवून काम करायला लागतो.

राधिकाः (परत तिथून डोकावत) शुक शुक, मग नुसती कॉफी तरी? प्लीज?

CUT TO…

38. Int/ Home/ Night

प्रोसेस फ्लो झपाझप टाईप होताना दिसतो.

कॉफी कप मध्ये ओतली जाते. ह्रषि कॉफी घेऊन बाहेर येतो.

राधिका शॉटर्सवर बसलीये. कॉफी घेते. पिते.

राधिकाः सुपर्ब!  लास्ट टाईम आय रिमेंमबर, आपण मुळशीला गेलो होतो तेव्हा केली होतीस तू...

ह्रषिः टपरीवाल्याशी भांडून!

दोघे हसतात. ती त्याच्याकडे पहातेच आहे. ह्रषि आळस देतो.

ह्रषिः चला... परत काम करुन तुला सोडायचंय.

राधिकाः मी जाईन रे घरी.

ह्रषिः माहीतीयेत मला तुझे घरी जाण्याचे किस्से. एकदा रात्री कुत्री मागे लागली होती तेव्हा उलटी आली होतीस तू, कॉलेजला... (ओरडत) ह्रषि... माझ्या मागे खूप कुत्री लागलीयेत.

राधिकाः (त्याला मारत) शट अप!

तो चुकवतो ती परत मारते. त्याला चिमटा काढते. तो व्हिवळतो. ती जोरजोरात हसायला लागते. तेवढयात अमृता बाहेर येते.

राधिकाः तुझा नवरा छळतोय मला...

ह्रषिः असो चला काम सुरु करुया, बास झाला ब्रेक.

अमृताः तेच म्हणलं काय होतंय का नाही काम!

ह्रषिः होतंय, तू नको काळजी करुस. झोप. गुडनाईट.

अमृता किं चीत रागाने त्याच्याकडे पहाते.

राधिकाः अगं ॲक्चुली खूप आहे, आणि ऐनवेळेला एकदम आलंय अंगावर. म्हणून हे असं दिवसरात्र करावं लागतयं!

अमृताः (कुत्सितपणे) नाही एवढा आरडाओरडा घसा कोरडा चालला होता, मला वाटलं संपलं का काय?

ह्रषिः (त्रासिकपणे) नाही संपल, तू जा झोप आत जाऊन!

अमृताः मी जातेच आहे, (जाताजाता) राधिका शॉटर्स मस्त आहे. काय ह्रषि?

तिच्या शॉर्टसकडे एक्प्लीसीटली पहाते. राधिका ऑकवर्ड होते.

अमृताः चालू दे तुमचं, गुड नाईट! (आत जाते.)

राधिकाः ह्रषि तिला प्रॉब्लेम असेल तर मी खरंच जाते.

ह्रषिः लहान आहे ती. तू तिचं बोलणं मनावर घेऊ नकोस. पटकन संपवू, मग सोडतो मी तुला...आणि कोल्ड कॉफी पी ना?

राधिकाः कोल्ड कॉफी? (कॉफीकडे पहाते.) ओ सॉरी, खरंच गार झाली.

ह्रषिः मी आणतो गरम करुन! दे! तू मला फॉर्वड कर पुढचा फ्लो...

दोन्ही कप उचलले जातात.

CUT TO…

39. Int/ Home/ Night

अमृता रात्री दार उघडून बाहेर येते. ह्रषि कुठेच नाहीये. अमृता हाका मारते. तो कुठेच नाहीये.

CUT TO…

39A. Int/ Home/ Night

गाडीचे लाईटस ऑफ होतात. ह्रषि आणि राधिका गाडीत आहेत.

ह्रषिः मग?

राधिकाः मग काय, मित्राचं पाकीट चुकून बॅग मध्ये राहीलं असं सांगितलं. नाहीतर होता मोठ्ठा ड्रामा!

ह्रषिः हं, देविका कशी आहे?

राधिकाः लहान बहीणी असतात तशीच आहे. घुमी, शहाणी, लाडकी, स्वतःचं सगळं नीट करुन घेणारी. लग्न झालं तिचं.

ह्रषिः तू पण बघ आता...

राधिकाः चालू आहे शोधणं, बघूयात... ह्रषि ॲक्चुली माझं...

तेवढयात त्याचा फोन वाजतो. तो कट करतो.

ह्रषिः हां...

पुन्हा फोन वाजतो. तो पुन्हा कट करतो.

राधिकाः फोन घे ना.

ह्रषिः राहू दे गं मी घरीच चाललोय. चल, उदया भेटू...

राधिका आणि तो एकमेकांना मिठी मारतात. मिठी सोडवते तोच तिचा मेसेज टोन वाजतो. ती मोबाईल पहाते. ह्रषि तिच्याकडे पहातो. राधिका मेसेज वाचून फक्त वर पहाते.

CUT TO…

40. Int/ Home/ Night

लॅचच दार उघडून ह्रषि आत येतो. समोर पहातो तर अमृता बसलेली आहे.

ह्रषिः (तावातावाने) राधिका ला मेसेज केलास तू ह्रषिला विचार आज घरी यायची इच्छा आहे का त्याला? कोण समजतेस कोण तू स्वतःला?

अमृताः हळू... सव्वातीन वाजलेत रात्रीचे!

ह्रषिः हे तुला कळायला पाहीजे. फोन कट केला म्हणजे येतच असीन ना...

अमृताः मग मेसेज केला हे कसं कळलं तुला?

ह्रषिः माहीतेय मला तुझ्या डोक्यात काय चालतंय ते. शी, तुला काय वाटतं गं आम्ही काय मजा करतो इथं जमून?

अमृताः कुणी पाहीलंय?

ह्रषिः तू वाटटेल ते बोलू नकोस हां, भांडणं होतील आपली.

अमृताः तू वाटटेल तसं वागायचंस आणि मी बोलायचं नाही? गेले दहा बारा दिवस पहातेय मी, बास झाल आता,ऑफीसमध्ये काम वगैर सगळं ठीक आहे, पण हे मला ही फालतूगिरी चालणार नाही!

ह्रषिः काय?

अमृताः मला ती अशी रात्री बेरात्री घरी आलेली चालणार नाही.आणि तूही घरी आणायचं नाहीस तिला!

ह्रषिः तू कोण आहेस हे सांगणारी? कुठल्या अधिकाराने बोलतेयस तू हे?

अमृताः ज्या अधिकाराने तू दारु पिऊन म्हणालास ना की हिम्मत घरी आला तर एकतर मला सोडशील किंवा त्याला धरशील. त्याच अधिकाराने. फक्त माझं टाळकं ठिकाणावर आहे, तुझ्यासारखी दारु पिऊन बडबडत नाहीये मी! काय बडबडलास हयाची तरी शुध्द आहे का तुला?

ह्रषिः माहीतीये मला मी त्याला घरी येऊ नको सांगीतलं! कारण त्याचं आणि तुझं जे काही चाललं होतं ते कुठल्याही नवऱ्यानं सहन केलं नसतं. पण तुला कुठे काही फरक पडलाय? एवढं सांगूनही तू त्याच्याशी बोलतेसच. तुमचा व्यवस्थित कॉन्टॅक्ट आहे. फोन, मेसेज, चॅट सगळं चालू असणारे त्याशिवाय उगाच पासवर्ड चेंज केलेला नसणार तू!

अमृता शॉक्ड होते.

अमृताः तू... तू माझं अकाऊंट चेक केलंस?

ह्रषिः (मान खाली घालून) मी ते सहज, बघता बघता...

अमृताः कसला चीप आहेस तू!

हृषिः व्वा! सगळी ट्रान्स्परन्सी ठेऊन पुन्हा मी चीप! मी सगळं तुला सांगून केलंय.

अमृताः ते मला खिजवायचं म्हणूनच, राधिका डिनर, राधिका वर्क, राधिका बॅडमिंटन आणि त्यात भरीस भर ती... नाही तुला सांगून उपयोगच नाहीये, तिच्याशीच बोलते ना एकदा... सोक्षमोक्ष लावते एकदाचा काय तो.

हृषिः थांब अमृता हे अति होतंय!

अमृताः होऊ दे अति, करायचंय मला अति...

प्रचंड रागाने तिच्याकडे पहातोय. राधिकाला फोन लावते.

अमृताः राधिका उदयापासून तू आमच्याकडे यायचं नाहीस, आणि हृषिला भेटायचं नाहीस... नाही याचं कारण तू मला विचारण्यापेक्षा त्याला विचार. तू काय केलंस मला माहीत नाही पण मला या घरात तू आलेली चालणार नाहीस. नाही कारण तुझ्या मैत्रीपेक्षा माझा अधिकार जास्त महत्वाचा वाटतो मला.

हृषि फोन काढून घेतो, आणि चरफडत टाकून देतो. जोरात हातावर हात आपटतो,

हृषिः हात जोडले बाई मी तुझ्यापुढे! तुला काय हवं ते करं, हवं तसं वाग! मला त्रास देऊ नकोस.

अमृताः त्रास तू दिलायस मला, तुला आवडत नाही म्हणून गेले पंधरा दिवस एक शब्दही बोलले नाहीये, कॉन्टॅक्ट ठेवला नाहीये त्याच्याशी. आणि तू मला सांगतोस?

त्याचाकडे पहाते. तो निघून गेलेला आहे.

CUT TO...

41. Int/ Home/ Night

एका फोटोच्या मागच्या बाजूला खळ लावली जाते. फोटो सरळ केला जातो त्यावर आयेशा जुल्का आहे. एक मुलगा फोटो भिंतीपाशी आणतो. भिंतीवर सर्वत्र तिचे फोटो आहेत. त्यात हा आणखी एक फोटो लावतो. समोर हिम्मत खाटेच्या बाजूला उभा राहून फोनवर बोलतोय.

हिम्मतः अगं, तू तर एक सुधरायची नाही. कोण तुझा सत्कार करणारे का नवऱ्याचा मार खाती म्हणून. बरं आम्ही आलो तरी आम्हाला हाकलून देतीस. एखादी दुसरी पोरगी असती ना नले, सासरच्यांना उलटा टांगून मिरचीची धुरी दिली असती. बघ बाई. कशाला? बरं , बघतो.

फोन ठेवतो. समोर पहातो. फोटो लागलेला दिसतो.

हिम्मतः (त्या फोटोकडे पहातो.) आयो, नवीन? लेटेस आहे का?

पप्याः हां मग? नेट कॅफे उघडला ना सच्यानी, मंग लगीच कल प्रिंट आऊट.

हिम्मत हसतो.

हिम्मतः ए पप्या, मबाईन हाय का?

पप्याः हाय ना...

हिम्मतः अन टॉकटाईम?

पप्याः रिलाईन्स आहे काही टेंशन नाही!

हिम्मतः हां...टाक...

पप्या मोबाईल टाकतो. हिम्मत झेलतो. फोन लावतो.

हिम्मतः हॅलो...मी ए जे बँक ऑफ उंबरगाव मधून बोलतोय. लोनची रिक्वायरमेंट आहे का? इंटरेस्ट कमी आहे एकदम.

अमृताः नाही.

हिम्मतः अच्छा, नाही तरीपण बँकेला तुम्हाला भेटायचंय.

अमृताः कोण बोलतंय?

हिम्मतः अरे दिवानो, मुझे पहचानो, कहां से आया... मै हू कौन...

अमृताः काही काम नसेल तर ठेवते.

हिम्मतः ऐ, आवडाक्का... अगं तुला काही लाज लज्जा शरम, आँ, पंधरा दिवस झाले, अगं तू फोन उचलेना, ती राधिका काही सांगेना, आईला फोन केला, आई म्हणते अमरी मजेत आहे, काय झालंय काय?

अमृताः...

हिम्मतः ए, सायलेन्स ऑफ द लॅम्ब्स! बोल ना...

एक अस्पष्टसा हुंदका ऐकू येतो.

हिम्मतः अमरोज, काही सिरीयस नाही ना?

अमृता रडतानाचा आवाज येतो.

हिम्मतः ऐ, अग येऊ का मी?

अमृताः नको.

हिम्मतः नाही नाही खरंच येतो. माझं काम पण आहे पुण्यात.

अमृताः नको, प्लीज. मला फोनही करु नकोस आणि आपण भेटायलाही नको या पुढे.

फोन ठेवला जातो. हिम्मतला काही कळेनासं होतं. तो सैरभैर होऊन इकडे तिकडे पहातो.

CUT TO…

42. Ext/ Parking/ Evening

राधिका गंभीरपणे उभी आहे.

हृषिः (मान खाली घालून) प्लीज मला माफ कर राधिका, मला माहीतीये जे झालं ते खूप

चुकीचं आहे. अमृता का अशी बालिश सारखी वागतेय मला कळत नाहीये.

राधिकाः ह्रषि, मला जेन्युइनली वाईट वाटलं पण मी समजू शकते तिला काय वाटतंय आणि ते कशामुळे वाटतंय. त्यामुळे मी तुझ्या घरी येणार नाही. मी नाही दिसले की होईल ती शांत आपोआप. सांग तिला घरी जाऊन की राधिका नाही येणार याच्यापुढे! आणि बॅडमिंटनही बंद करुयात आपण!

ह्रषिः पण हे चूक आहे, तिच्या मूर्खासारख्या हटटपायी मला तुझ्यासारखी मैत्रिण गमवायची नाहीये. आय नीड यू.

राधिकाः पण मी आहेच. फक्त मी घरी येणार नाहीये. आणि तेवढं अंडरस्टँडिंग आहे रे आपल्यात! हं... सोड तू...

त्याचा हात हातात घेते. शेजारुन मॅनेजर येतो.

मॅनेजरः एव्हरीथिंग इज ओ के ?

दोघे सावरतात.

ह्रषिः येस, अॅब्सल्युटली...

मॅनेजरः प्रोसेस फ्लो थ्री चा रिपोर्ट घेऊन बसूयात. मायनर चेंजेस आहेत. बाय...

ह्रषि आणि राधिकाः (त्याच्याकडे पहात) बाय...

CUT TO…

43. Int/ Coffee Shop/ Evening

टिश्यू पेपरवर कॉफीच्या कपाचे मार्क दिसतात. कप उचलला जातो. अमृता कॉफी पितेय. शेजारी हिम्मत बसलेला.

हिम्मतः आईला असं आहे होय, मग त्यात काय? अमरे आपल्या भेटण्या न भेटण्यानं तुझ्या संसारात फरक पडेल पण आपल्या मैत्रीत पडेल का? नाही! नको भेटायला, फक्त एखाद दोन महिनयातनं फोन मेसेज करत जा, तेवढंच मला आणि कंपनीला ही बरं वाटेल! काय?

अमृता मान डोलावते.

हिम्मतरावः अमरे आणि एक मेकावर बंधन घालून संसार होतोय का कुठं? उलट आहे ते बिघडतं त्यानी. मला सांग आपण आत्ता भेटतोय हे सांगितलंय का त्यांना?

अमृता नकारार्थी मान डोलावते.

हिम्मतरावः आज काय मौनव्रत आहे का तुझं? का कडवा चौथ आहे? अन का नाही सांगीतलं त्यांना? घरी जाऊन पहिले सांगायचं ! ट्रान्सपरन्सी पायजे का नको दोघातं. हे बघ अमरे, आपलं ओपन किचन पाहीजे. जे शिजत ते दिसतं! (अमृता हसते. ) चल, बिल दे! एक हुंदका दिलास तर चार तास गाडी मारत आलोय. बाहेर एवढया कॉन्सेलींगचे खूप पैसे घेतो मी.

अमृताः देते, म्हण प्लीज...

हिम्मतरावः ऐ, तू दयायचं तर दे, नायतर कप धू इथं. मी ते प्लीज बिज म्हणणार नाही हां!

अमृता पैसे देते. हिम्मत घेतो. अमृता उठते. आणि चालत पुढे जाते. दार उघडायला जाणार तोच बाहेरुन दार उघडलं जातं आणि ते नेमका हृषि उघडतो. दोघे समोरासमोर येतात. दोन क्षण जातात. मागून हिम्मत येऊन तिला मिठी मारतो.

हिम्मतः चल गं, नाहीतर तुझा नवराच यायचा इथं...

समोर पहातो. हृषिकेश उभा आहे. त्याच्यावरुन नजर काढून घेत अमृताकडे पहातो. अमृताही इकडे तिकडे पहाते. तो फक्त तिच्याकडे पहातोय. शांतपणे. तिला पकडल्याच्या आविर्भावात.

## **मध्यांतर अर्थात टाईमप्लीज...**

43A. Ext/Coffee Shop/Evening

हिम्मतराव आणि अमृता ह्रषिकेशच्या समोर उभे आहेत. तिघे एकमेकांकडे टेन्स्ड होऊन पहातात. हिम्मतराव त्याच्याकडे पहातो आणि हसायला लागतो. ह्रषिकेशही हसतो.

हिम्मतः काय योगायोग आहे का चेष्टा? अहो मी आत्ता हिला सांगत होतो ट्रान्सपरन्सीचं महत्व वगैरे, म्हणलं आपलं ओपन किचन पाहीजे. जे शिजत ते दिसतं. तेवढयात तुम्ही आलात.

ह्रषिः अरे, खरंच योगायोग आहे.

हिम्मतरावः (अमृताला टप्पल मारत) बघ ऐ बावळट, ते स्वतःच म्हणाले. दुसरा एखादा नवरा असता तर किती गैरसमज झाला असता, एखादा असता तर चिडून निघून गेला असता एव्हाना...

ह्रषिः जाऊ का मग?

हिम्मतरावः तुम्ही गोष्टी फारच पटकन मनावर घेता राव!

ह्रषिः नाही नाही तुम्हाला अजून काहीतरी बोलायचं असेल. काय गं? तू का अशी कुणीतरी पकडल्यासारखी शांत आहेस?

हिम्मतः घाबरलीये ती. अमरे ऐय... आता आहे घरी जाऊन हंटर. सटॅक!

दोघे हसतात. हिम्मत टाळी देतो.

ह्रषिः बापरे माझ्याबददल फारच भयानक काय काय सांगितलेलं दिसतंय हिने...

हिम्मतः नाही विशेष काही नाही. फक्त तुम्ही माझ्याशी बोलायला, मला भेटायला बंदी घातली असं कळलं. काय हो, मी दहशतवादी संघटना आहे का काय माझ्यावर बंदी घालायला?

ह्रषि शांतपणे उभा आहे.अचानक रिंगटोन वाजते ह्रदयी वसंत फुलताना...

हिम्मतः आयो, पप्याचा फोन आला... चला मी पळतो, नाहीतर माझा पिक्चर चुकायचा. पप्या आलाय आज पुण्यात, म्हणलं संध्याकाळी मस्त पिच्चर टाकू आणि तसेच जाऊ गावाला. चला येताय का?

ह्रषिः मी नाही, हिला विचार. (अमृताला) जा तू तुला जायचं असेल तर...

हिम्मतः ती काय येईल आता?? अमरे हॅलो वन टू थ्री फोर?

अमृताः (खिन्नपणे हसत) काय वेडे आहात का तुम्ही. जा आता हिम्मत बाय!!

हिम्मतः बघा हिच्याकडे, जातो मी.

ह्रषिः बघतो मी बरोबर. बाय. भेटू.

हिम्मतः (इकडे तिकडे पहातो.) मला म्हणलात भेटू? ही म्हणते भेटायला नको आणि तुम्ही म्हणताय भेटू?? च्यायला आज काहीतरी भलतंच घडतंय. चला...

ह्रषिःचल...

ह्रषि आणि अमृता एका बाजूने जातात. दुसऱ्या बाजूने हिम्मतराव निघून जातो.

CUT TO…

अमृता येऊन गाडीत बसते. त्याच्याकडे पहाते. ह्रषि मिरर ॲडजेस्ट करतोय.

अमृताः (सीट बेल्ट लावता लावता ) तुला वाटतं तसं खरचं नाहीये हां.

आम्ही जनरल भेटलो होतो.

ह्रषि मिरर मध्ये ॲडजेस्ट करतो. पाठीमागे हिम्मत गाडीत बसताना दिसतो. ह्रषि त्याच्याकडे पहातो. तो लांबून हात करतो. ह्रषि पण हात करतो.

अमृताः तू खरचं नाही ना चिडलास?

ह्रषिः (तिच्याकडे पहातो.) घरी जाऊन बोलूयात?

गाडी निघते.

CUT TO…

44. Int/Kitchen /Night

गॅस लायटर ने पेटवला जातो. त्यावर भांड ठेवलं जातं. ह्रषि त्यात वरुन दूध ओतता. पिशवी नीट बाजूला ठेवतो. इतक्यात अमृता समोर येते. त्याच्याकडे पहाते. तो किचनला पाठ करुन समोर उभा रहातो.

ह्रषिः आज तू दाखवून दिलसं अमृता की मी खरंच चुकतो. मी राक्षस आहे, तुझ्यावर सतत आरडाओरडा करतो, तुझ्या स्वातंत्र्यावर लिमीटेशन्स आणतो, तुला तुझी स्पेस देत नाही, तुला सतत गव्हर्न करतो...

अमृताः (त्याच्या दिशेने चालत यायला निघते) ह्रषि असं खरंच नाहीये.

ह्रषिःथांब! माझं पूर्ण होऊ दे. तसं नसतं तर तू मला न सांगता त्याला भेटली नसतीस. बरोबर? अमृता आज जे काही झालं त्याचा राग नाही आला मला. मला वाईट वाटलं.इनफॅक्ट माझे आईवडील गेले तेव्हा आलं होतं ना तसं एकटं पडल्याचं फिलींग आलं मला. बघ ना काल परवा आपली जी भांडण वादावादी झाली ते पहाता आज मी थयथयाट करुन निघून जायला पाहीजे होतं, पण नाही गेलो. मी खूप शांतपणे विचार केला. कारण मला वाद वाढवायचा नाहीये, मला यातून काहीतरी सोल्यूशन काढायचंय. सोल्यूशन ज्यानी तुझंही स्वातंत्र्य हिरावलं जाणार नाही आणि मलाही मनाविरुध्द अॅडजेस्टमेंट करावी लागणार नाही.

अमृताः असं सोल्यूशन आहे का काही?

ह्रषिः आहे. (थेटपणे) मला वाटतं आपण दोघांनी एक ब्रेक घ्यावा!

अमृताः ह्रषि तू हवं असेल तर कचाकचा भांड वाद घाल भडाभडा बोल पण असलं काही सांगू नकोस.

ह्रषिः मी काय लगेच वेगळं व्हायचं म्हणत नाहीये. ब्रेक घ्यायचा म्हणजे थोडे दिवस एकमेकांपासून लांब रहायचं. एकमेकांच्या आयुष्यात आजिबात डोकवायचं नाही. आपल्याला या नात्याबददल नेमकं काय वाटत कळेल. हे नात टिकवण्यात प्लस पॉईंटस किती आहेत आणि मायनस पॉईंटस किती आहेत याचा अत्यंत त्रयस्थपणे ाि‍व्चार करता येईल.

अमृताः शक्य नाहीये हे असं ॲनलाईझ करणं, मला नाही जमणार.

ह्रषिः जमेल. जमवावं लागेल. नाहीतर आत्ता आत दाबून ठेवलेलं नंतर कधीतरी बाहेर येईल. आणि त्यात आपण जास्त होरपळून निघू. तुला कसं वाटतंय सांग! मी परवा बँगलोरला चाललोच आहे. तीन चार दिवसांनी येणारे. तूही आईकडे जा हवं असेल तर... पाच सहा दिवस एकमेकांशी भेटायला बोलायला नको. बघूयात आपल्याला नेमकं मनापासनं काय वाटतंय?

अमृताः का पण हे सगळं?

ह्रषिः हा सगळा त्रास कशामुळे होतोय याचा विचार करायला पाहीजे ना? ( अधिकाराने) हो की नाही? (अमृता मान डोलावते.) तो आत्ताच करायला पाहीजे, म्हणजे पाच वर्षांनी असं वाटायला नको की तेव्हा विचार केला असता तर बरं झालं असतं. (अमृता वर पहाते.) आणि तसही आई किती दिवस मागे लागलीये तिला घरी पाठवा रहायला, खरंच जाऊन ये. मी न चिडता, न भांडता एवढया शांतपणे हे सगळं सांगतोय.

अमृताः उदया जाईन

ह्रषिः नाही तुला हवं असेल तर मी सोडून येतो आत्ता. म्हणजे मी पण उदया निवांत घरी बसून काम करायला मोकळा. आणि तुलाही रहाता येईल तीन चार दिवस.

अमृताः हं.

ह्रषिः आणि मी तुला हाकलत नाहीये. फक्त मला वाटतं की आपण सगळया गोष्टीवर पुन्हा एकदा विचार करावा, आणि मग काय तो डिसीजन घ्यावा.

अमृताः हं !!

डोळे भरलेत. समोर पहाते. त्याच्या जवळ जाते. त्याला कळत नाही. दूध वर आलंय. त्याचा गॅस बंद करते. त्याच्याकडे पहाते. तशीच रडत आत जाते. ह्रषि तिच्याकडे पहातो.

CUT TO…

45. Int/Amruta Home /Night

ह्रषि आणि अमृता समोर बसलेत.  दोघांमध्ये थोडं अंतर. आवाज येतो कॉफी घ्या. दोघे कॉफी घेतात. अमृताची आई बसते.

वडीलः (समोर बसलेले) त्रास बिस देत नाही ना ही?

ह्रषिः नाही.

वडीलः स्वयपाक वगैरे करायला शिकलीस का? इथं तर सगळा आनंदच होता.

अमृता वर पहाते. शांत आहे.

आईः शिकेल,आता आलीये ना चार दिवस, शिकवते तिला. बरं झालं आलीस पण, किती दिवस मागे लागले होते.

ह्रषिः मी तेच म्हणलं दोन तीन दिवस करणार काय? बोअर झाली असती एकटी, आणि मित्र मैत्रिणींना भेटून भेटून किती वेळ भेटणार?

बाहेरुन आवाज येतो. संज्या, ऐ संज्या...

वडीलः चला, भेटू परत आलात की. जरा पाकीट दे गं माझं.

आई पाकीट देते.

वडीलः आणि रुमाल, आणि ते पेन पण दे.

अमृता आणि ह्रषि समोर हे सगळं  चालू आहे. ते फक्त पहातायत. वडील निघून जातात.

आईः अमू, हिम्मत कुठाय गं?

अमृता चेहऱ्यानेच माहीत नाही असं दर्शवते.

आईः नाही, आल्यावर जेवल्याशिवाय जात नाही. बरेच दिवस झाले आलाच नाही घरी.

(ह्रषिकडे पहात) तुमची ओळख झाली असेल ना?

ह्रषिः (किंचित हसून) चांगलीच!

आईः तुम्ही बसलात ती पेटंट जागा त्याची आमच्या घरातली. किती साधा आहे ना? बघीतलच असेल तुम्ही! चौथीत आणला होता त्याला इकडे शिक्षणाला, काका मावशींनी. इकडे समोर रहायचे. हुशार होता पण तेव्हा सगळयांनी टिंगल केली, हयाला काय येणार? हयाला शेंबूड तरी पुसता येतो का वगैरे वगैरे. आज तेच सगळे मागे पुढे गोंडा घोळतायत. हे बाजूचे लिमये, सतत त्याच्यावर खार खाऊन असायचे. त्यांच्या मुलाची बायोडायव्हसिर्टीची अॅडमिशन करुन दिली हयानी आत्ता, मग काय गप्पा एकदम! वाडयातल्या सगळया मुलांवर एकदम जीव त्याचा आणि अमूवर तर विशेष!  (अमृता शांतपणे पहाते. ह्रषि ऐकतोय. ) तुम्हाला सांगते एक दा शनिवार वाडयावर सायकल खेळायला गेले, तेव्हा हिला एका मुलानी पाडलं, असा संतापला त्याला बोलत बोलत घेऊन गेला कॉर्पोरेशनच्या पुलावर आणि त्यांची सायकल दिली पुलावरुन खाली टाकून!

अमृताः आई त्याला उशीर होतोय.

ह्रषिः नाही नाही... सांगा तुम्ही धमाल आहे हे! (त्यांच्याकडे पहातो.)

आईः पहील्यांदा सुटटीसाठी आला तेव्हाच हटट धरुन बसला हिच्याशीच लग्न करायचंय... मग काय लोकांनी इतकं समजावलं तेव्हा कुठे परत गेला. जातानाही हिचा धरला माझ्याबरोबर चल म्हणून!

ह्रषि अमृताकडे पहात हसतो. कॉफी पितो.

CUT TO…

46. Ext-Int/ Home/ Night

पूर्ण घरात अंधार दिसतो. एकच दिवा चालू आहे. ह्रषि बाल्कनीत बसला आहे. फोनवर बोलतोय.

ह्रषिः असं आहे सगळं. नाही मी शांतच आहे. रागाच्या पलिकडे गेलोय मी. साधी मॅच्युरिटी नसावी हिच्यात? मला माहीत नाही राधिका तुला हे कसं वाटेल पण जे मला तुझ्याशी शेअर केल्यावर, बोलल्यावर, तुझ्याबरोबर असल्यावर वाटतं ते तिच्याबरोबर का वाटत नाही? बर, मी आयुष्यात सगळयात जास्त डिपेंडंट तिच्यावर आहे गं! दुसरं कोण आहे मला. हो! बघतेयस ना तू? आणि त्यात जर ही स्वतः अशी वागायला लागली वर माझ्यावर अत्यंत चीप लेव्हलचे संशय घ्यायला लागली तर काय करायचं मी. म्हणजे आज त्या दोघांना मी समोर पकडलं, आय मीन पाहील, तेव्हा एवढं सगळं होऊनही त्याची मस्करी संपत नव्हती आणि ती एका शब्दानी त्याला थांब असं म्हणाली नाही. म्हणजे त्यांच्या दृष्टीने काहीच सिरीयस नाहीये यात. इतकं कसं कोणी थिल्लर वागू शकतं. हो मी म्हणलं आपण ब्रेक घेऊयात. सोडून आलो तिला. हां, बोल ना... का? चल गं त्याचा काही संबंध नाही. राधिका, तू बँगलोरला न आल्याने काहीही होणार नाहीये. अगं आपलं काम महत्वाचं आहे का तिचा संशय? आणि तू आल्याने मला किती बरं वाटेल याचा विचार कर ना... (मान खाली घालत) नाही गं... सगळे असे का वागतायत मला कळत नाहीये. राधिका, आय नीड यू देअर. (थांबतो.) हं, हं, हं, ओ के. भिती वाटते गं खूप...

फोन कट करतो. तसाच बसून रहातो.

CUT TO…

47. Int/Home/Evening

फ्रेम पुसली जाते. हृषि ती पुसून बाजूला ठेवतोय. शेजारी हिम्मत आणि तिची फ्रेम दिसते. ती फ्रेम हातात घेतो. अचानक त्याला काहीतरी आठवतं. तो मोबाईल काढतो. काहीतरी आठवतं. हसतो. त्या फोटोकडे पहातो. तसाच खाली ठेवतो. मोबाईलच्या फोनबुक मध्ये हिम्मतराव टाईप करतो. हिम्मतरावचा कॉन्टॅक्ट दिसतो.

CUT TO…

48. Int/Amruta Home/ Day

आई हातावर बाटलीतून तेल घेते. अमृता समोर केस मोकळे सोडून बसलीये. पुस्तक वाचतेय.

आईः काय झालंय बघ त्या केसांच! लोक विचारतील आईला जाऊन किती दिवस झाले?

अमृता आईला फटका मारते.

आईःस्वतःची काळजी घ्या जरा आता, आणि शिकेकाई दिली होती त्याचं काय केलंस? लोणचं घातलंस?

अमृताः आई किती चढचढ करतीये? आणि मोगॅम्बो कुठाय?

आई तिच्याकडे पहाते, कान पिरगाळते.

अमृताः (हसते.) अगं हो! ए आई आज अप्पा बळवंत चौकात जाऊया का? मला दहावीच मराठीचं पुस्तक घ्यायचंय.

आईः असं दहावीत म्हणाली असतीस तर मला किती आनंद झाला असता.

अमृताः हा हा हा हा मला असे ते सगळे धडे वाचावेसे वाटतायत आत्ता!

आईः तेव्हा अभ्यासात असतात म्हणून किंमत कळत नाही. नंतर कळतं पाठीवरती हात ठेऊन फक्त लढ म्हणा आपण चार मार्कांचं संदर्भासहीत स्पष्टीकरण म्हणून पाहील.

अमृताः आठवी, नववी, दहावी ही तीन वर्ष आयुष्यभर रहायला पाहीजेत आई. काय मजा येईल ना? मोठंच व्हायचं नाही आयुष्यात.

आईः म्हणजे तू आयुष्यभर मार खाणार माझ्या हातचा...

अमृताः आई तू मान्य कर तू उगाच मारलं होतंस मला...

आईः शाळा बुडवून मंगलाला मॉर्निंग शो वरुन बाहेर आलेली दिसल्यावर काय पंचारती ओवाळायची तुझी? आणि आत्ता बोलतेयस, तुला मुलं होऊ दे. मग कळेल!

अमृताः आई परवा मावशी विचारत होत्या पाळणा कधी हलवणार, म्हणलं पाळणा हलवायला एवढं लाजून का सांगतायत. मग लक्षात आलं. (हसायला लागते.)

आईः एक विचारु का? काल काही भांडण वगैरे झालं का तुमच्यात?

अमृता एकदम चमकते. तिच्याकडे पहाते. तेवढयात फोन वाजतो. मंदोदरी मावशीचं नावं आणि लाऊड फोटो दिसतो.

अमृताः घ्या. जरा साने व्हावं म्हणलं तर देशपांडयाचे फोन सुरु होतातच. (फोन घेते) बोला मावशी, मी सांगते, डोहाळेजेवण, करेक्ट! हो आहे ना, हो येते, काय? नाही हो कोंबडी पळाली नाहीये माझ्याकडे! (आई हसते.) मावशी नऊवारीच नेसून येणारे मी. येस्स. बाकी टिपटॉप! (फोन ठेवते. आणि हसायला लागते.) डोहाळजेवणात नाचाची रिहर्सल करायला कोंबडी पळाली पाहीजे!

आई आणि ती दोघी मनमुराद हसतात. आई पुन्हा तिचे केस विंचरायला लागते.

CUT TO…

49. Ext/ villege / Evening

चारचा सुमार.  ह्रषिची गाडी गावात शिरते. एका घराजवळ थांबते. ह्रषि काच खाली घेतो. एका घराजवळ पोराला बोलावतो.

ह्रषिः हिम्मतराव धोंडे पाटील?

मुलगाः कोन? सांयटिस?

ह्रषि हसतो.

मुलगाः खात्या हातानं वर जा अन मग धुत्या हातानं गेलात की तिसरं घर.

ह्रषि हसतो, गाडी घेऊन तिकडे जातो.

CUT TO…

49A. Ext/ villege / Evening

भांडणाचे आवाज येतात अगं 'तुझ्या बापानी तरी कधी पाहीलं होतं का? फिरायचा गावभर हुंगत, बापाला काही बोलायचं नाही नाहीतर बघा' काय करनार गं तू? दगड बांधून टाकीन विहीरीत!

ह्रषि (दारासमोर येत)ः हिम्मतराव?

आतून धाडकन एक पातेलं बाहेर टाकलं जातं . ह्रषि दचकतो. इकडे तिकडे पहातो. शेजारी एक माणूस शांत बसलाय.

ह्रषिः हिम्मतराव?

माणूसः बांधावर असलं त्यो. जा सरळ…

CUT TO…

50. Ext/Bandh/ Evening

संध्याकाळी ह्रषि आणि हिम्मत बांधावर दिसतात.

हिम्मतः पाणी?

ह्रषि बॅगेतून बिसलेरी काढतो. आणि पितो. हिम्मत बसतो.

हिम्मतः बरं झालं आलात, मी पण आठ दिवस नाहीये उदयापासून. तुमचा फोन आला तेव्हा दोन मिनिटं घाबरलो हो! म्हणलं गावाकडं पोर घेऊन माराबिरायला येत असायचात (ह्रषि हसतो. हिम्मत त्याला पाठीवर थापटतो.) पण काहीही म्हणा, तुमच्या आत एक ओपन माईंडेड मन आहे. नाहीतर आपली बायको आपल्याला न सांगता ज्याला भेटली अशा माणसाला भेटायला एवढया लांब येणं. सगळयांना नाही जमत.

ह्रषिः अशा किती जणींच्या नवऱ्यांना भेटलायस तू?

हिम्मतः (खिन्नपणे हसतो.)

ह्रषिः माझा प्रॉब्लेम अत्यंत जेन्युईन आहे. आमच्या रिलेशनशीप मधली अर्ली फेज संपत आलीये आणि कंटाळा, पझेसिव्हनेस, प्रायव्हसी, स्वतःची स्पेस याची जाणीव व्हायला लागलीये. एकमेकांचा आधार व्हायच्या ऐवेजी डोक्याला ताप व्हायला लागलाय आणि यात तिने स्वतःला जपलं नाही तर अवघड आहे.

हिम्मतरावः तुमच्या दृष्टीने जपणं म्हणजे अर्ध्या चडीतले फोटो डिलीट करणं असेल, तर बरोबर आहे, पण ती काही लहान नाही.

ह्रषिः ती लहान आहे याचा त्रास आहेच. पण लोकं हुशार असतात हा दुसरा त्रास.

हिम्मतरावः लोकं कितीही हुशार असली तरी पोरी सगळयांचा बाप असतात. तुम्हाला सांगतो आम्ही गेलो हाँगकाँग लेन मध्ये खरेदी करायला. तिथं पोरानं मुददामून हिला हात लावला, ही

वळली आणि जी हाणली त्याच्या थोबाडात. हेलपाटलं ते पार. मी तर बुवा प्रेमातच पडलो तुझ्या बायकोच्या. लव्ह अ‍ॅट फर्स्ट फाईट! (हसतो.)

ह्रषिः (थांबून त्याच्या डोळयात डोळे घालत) तुमच्यात खरंच काही आहे का रे?

हिम्मतः (त्याच्या खांदयावर हात टाकत) ती माझी मानलेली बहीण आहे अन मी तिचा मानलेला भाऊ हे मी सांगूच शकलो असतो तुम्हाला. पण हे मानलेले भाऊ बहीण वगैरे असं काही नसतं हो. आणि आहे ना! माझ्यात आणि अमरीत नुसत्या मैत्री पलिकडचं काहीतरी आहे पण त्यात तुम्हाला वाटतं तसं काहीही नाहीये.

ह्रषि छदमी हसतो.

हिम्मतः चला... बसूया जरा...

ह्रषिः आत्ता?

हिम्मतःरात्री कोणाला कळतंय तेव्हा!

दोघं उठतात.

CUT TO…

51. Ext/ Road/Evening

एक लहान मुलगा आणि एक मुलगी एकत्र चाललेत.

हिम्मत त्यातल्या पोराच्या डोक्यावरुन हात फिरवतो. पुढे चालत येतो.

ह्रषिः मग तू काय म्हणालास?

हिम्मतः मी तर म्हणलं अपल्या मनात तर असं काहीही नाही. बर आपली परिस्थीती हिदी पिक्चरमधे दाखवतात तशी, रहायला पंधरा बाय बाराच्या दोन खोल्या, घरमे विधवा माँ, दो जवान बहने, भरीस भर काकाकेदो पोरगे, मग काय मग ते ऑफीशीअली अमरीला कटवायच्या मागे लागले.

ह्रषिः थोडक्यात तुमची मैत्री इतकी घटट होती की लोकांना वाटायचं तुमचं लग्न होईल.

हिम्मत आणि ह्रषि पाठमोरे जाताना दिसतात.

हिम्मतः लोकांच सोडा हो, लोकांना काहीही वाटतं, फार कॉमेडी असतं ते. त्यांना वाटतं पोरापोरीला गाडीवर एकत्र जाताना पाहीलं म्हणजे पकडलं. पोरगा पोरगी पिक्चरला गेले म्हणजे आहे अंधारात डाकूडाव, आणि एखादा पोरगा एखादया पोरीकडे रहायला गेला, म्हणजे यांच तर सगळंच झालंय.

दोघे पाठमोरे लांब जात रहातात.

CUT TO…

52. Int/ Bar/Night

हिम्मतराव आणि ह्रषि टेबलवर बसलेत. मागे तुम तो ठहरे परदेसी गाणं चालू आहे. समोर ग्लास भरलेले आहेत.

हिम्मतः हा दुसरा आणि शेवटचा हां, माग एकदा तीन पेग प्यायलो तर स्पीडब्रेकर आकाशात दिसत होते.  अमरीला एक फोन लावू का? सांगतो तिला आपण बसलोय ते.

ह्रषिः लाव, म्हणजे आहे त्याची अजून वाट लागेल. आधीच ती काही कमी मूर्खासारखी वागत नाहीये.

हिम्मतः मी तुम्हाला एक सांगू का, अमरीचा जवळचा मित्र म्हणून… तिला एवढया पटकन शहाणं करायला जाऊ नका. राहू दे थोडी मूर्ख, बालिश, वेंधळी… उलट असा विचार करा, किती साधी मुलगी आहे, किती मोजक्या गरजा, किती बेसिक आनंद आहेत. अहो पावसात भिजताना कुडकुडत गरम गरम वडापाव खाल्ला तर दोन दिवस आनंदात जातात तिचे. बसमध्ये जागा मिळाली तर तिनदा कंडक्टरला बोलून दाखवलं होतं तिनं. ह्रषिकेशराव लहानपण  मिळालं नाही हो तिला. ज्या मुलीला लहानपणी नेमकं काय करतात याचा

एक्सीपिरीयन्सच नसेल तिला आता तसं व्हावंस वाटणार ना? आणि ती चुकतेच, मी म्हणतंच नाही ती चुकत नाही म्हणून, पण समोरच्याच्या चुका त्याला न सांगता सुधारणं यालाच तर समजूतदारपणा म्हणतात ना?

ह्रषिः सांगणं सोप्प आहे. करणं खूप अवघड.

हिम्मतरावः माहीतेय मला, बायकोच्या मित्राला भेटायला दोनशे किलोमीटर गाडी मारत येणाऱ्या पहिल्याच माणसाला भेटलोय मी. म्हणून सांगतोय. एका वाक्यात सांगतो, पालक नाही मित्र व्हा तिचे. थोडे दिवस तिला तिचं बालपण यथेच्छ उपभोगू दे, मग संसार, मुलं बाळं, जबाबदाऱ्या आहेतचं. कसं आहे, लहान पोराशी खेळायचं म्हणजे गुडघ्यावर बसावचं लागतं. तिथे पँटची इस्त्री बिघडल, टाय खराब होईल असा विचार करुन नाही चालत.

ह्रषिः अच्छा म्हणून तु लुंगी नेसतोस का?

हिम्मतरावः  गाढवापुढं वाचली गीता अन कालचा गोंधळ बरा होता.

ह्रषिः (करंगळी वर करतो.) कुठं?

हिम्मतरावः जा कुठंही, होल वावर इज अवर! (मोठयाने) लाव रे बाबा जेवण लाव!

CUT TO…

52A. Int/ Bar/ Night

एक वेटर येतो. बिल ठेवलं जातं.

ह्रषिः या सगळया गोष्टीवर मला एक सोल्यूशन सापडलंय. मी तुला एक रिक्वेस्ट करु?

हिम्मतरावः (आळस देतो. बाहया वर करतो.) सांगा ज्याच्यासाठी इतक्या लांबवर आलात!

ह्रषिः अमृता बरोबरचा कॉन्टॅक्ट कमी कर.

हिम्मतः फोन करुन सांगायचं ना!

ह्रषिः (चिडत) तुला टिंगल वाटतेय?

हिम्मतः नाही, मला मी एकदम ह्रतिक रोशन आहे असं वाटतंय, कहो ना प्यार हे मधे नाही का आमिषाचा बाप म्हणतो माझ्या पोरीचा कॉन्टॅक्ट कमी कर, आपला अग्निपथ म्हणतो नाही. काय म्हणतो नाही!

ह्रषिः तुझी मैत्रीण नाही माझी बायको आहे ती. आणि लाज नाही वाटत लग्न झाल्यानंतर सारखे मेसेजच कर, पाकीटात फोटोच ठेव, कधी मिठीच मार, कधी घरीच ये रात्री बेरात्री, लपून छपून भेट वर म्हणायचं की तुझा नवरा यायच्या आत चल, मी काय आंधळा आहे हे सगळं न दिसायला...

हिम्मतरावः चढलीये तुम्हाला, फार बोलू नका.

ह्रषिः तू कोण मला सांगणारा रे? अं तू कर लग्न एका मुलीबरोबर मग मी खेटतो असा तिला येऊन चालेल का?

हिम्मतः  (ओरडतो.) बास झालं हां... बास झालं.

ह्रषिः (त्याच्यावर आवाज लावतो, त्याची गचंडी धरतो.) ऐ, बास तू कर! मैत्रिणीच्या आयुष्याची जराजरी काळजी असेल ना तरी लांब हो, कळलं ना, लांब हो!

दोन क्षण जातात. सगळे तिकडे बघतात. हिम्मत सोडवतो. झब्बा नीट करतो. तिथून निघून जातो.

ह्रषि टेबलवर पैसे टाकतो.  टेबलवर पैसे पडतात.

CUT TO...

52B. Int/ Home/ Night

ह्रषि गाडीत बसलाय. हिम्मत त्याच्या विंडो जवळ येतो.

हिम्मतः खालच्या अंगान जाऊ नका, भुतं झपाटतील...

ह्रषिः मी बघीन कुठून जायचं ते, तू लांब रहायचं. कळलं? लांब रहायचं! आपणहून?

हिम्मतः रहातो ना. असंच लांब राधिकाला रहायला सांगणार का आपणहून ? आँ? आणि तुम्हाला काय वाटलं मला कळलं नाही कॅफेत तुम्ही राधिकाला भेटायला आला होतात. तिला यायला उशीर झाला, मग तुम्ही एकटेच पुढे आलात आणि आम्ही दिसलो. कसं आहे मालक, जग फार छोटं आहे, आणि त्यात माझे कॉन्टॅक्ट खूप चांगले आहेत.

मागे जातो.

हिम्मतरावः (गाडीवर ठाप ठाप मारत) चला, जाऊ दया!

हिम्मत पहील्यांदा चिडलेला दिसतो. चिडून तो गेलाय त्या दिशेनी पहात रहातो.

CUT TO…

53. Int/ Radhika home/ evening

एक मुलगा अत्यंत छान आवरलेला खुर्चीवर बसलाय.

मुलगाः मी सिनियर एच आर हेड आहे आणि गेल्याच वर्षी अब्रॉड जाऊन आलोय.

राधिकाचा फोन वाजतो. राधिका पाहून कट करते.

मुलगाःमी बोस्टनला होतो दोन वर्ष. ऑफर होती कन्टीन्यू करायची पण मी नाही म्हणालो.

फोन पुन्हा वाजतोय. यावेळी हृषि कॉलिंग असं दिसतंय. ती कट करते. सायलेटं वर टाकते.

मुलगाः (शांतपणे) तू एकतर फोन घे, नाहीतर मी बाहेर जातो.

राधिकाः सॉरी.

मुलगाः इटस ओ के. कारण मला लग्न करुन इकडेच सेट व्हायचंय. कारण कुठेही जा गं, पुणं ते पुणंच! (एकटाच हसतो.) माझ्या घरी आई बाबा आहेत, एक छोटा भाऊ आहे. आणि प्रभात रोडला आमचं जुनं घर होतं आम्ही आता बाणेरला शिफ्ट झालोय.

(राधिकाचा चेहरा दिसतो. त्याचा आवाज.) आणि माझा खूप मस्त मित्रांचा ग्रुप आहे. शाळेपासून. चार जणं, तिघांचं लग्न झालं मी एकटा राहीलोय.

राधिकाचा चेहरा दिसत रहातो. मोबाईलचा व्हायब्रेटरचा आवाज पुन्हा ऐकू येतो.

CUT TO…

54. Int/ Radhika Home / Evening

किंचीत तडा गेलेल्या आरशासमोर बसून राधिका दागिने उतरवतीये. देविका आईला खुणेनेच विचारते. आई थांब थांब असं खुणेनीच सांगते.

देविकाः (मोठयाने) मस्त होता ना पण तो. स्मार्ट आणि सेन्सिबल वाटला, काय ताई?

राधिका तिकडे पहात नाहीये. शांतपणे दागिने उतरवतीये.

आईः राधिका, कसा वाटला तुला? माझं तर म्हणण आहे, लवकर होकार सांगूयात.

राधिका डोळे गच्च मिटून घेते. पुन्हा उघडते. शांतपणे समोर पहाते.

आईः पुढच्या महिन्यात खूप चांगला मुहूर्त आहे. राधिका, असा मुलगा परत नाही मिळायचा.

राधिकाः (न वळताच) मला नाही करायचं लग्न

आई त्रासिक नजरेनी तिच्याकडे पहाते.

देविकाः ताई काय गं? किती चांगला मुलगा आहे.

राधिकाः तरीही नाही करायचं! (शेवटची बांगडी काढते आणि उठते.)

आईः का? अगं अजून काय पाहीजे तुला? दिसायला चांगला आहे, सेटल्ड आहे, लोकं चांगली आहेत आणि ॲडजेस्ट करायला तयार आहेत. आणखी काय पाहीजे.

राधिकाः मला माहीत नाही पण मला नाही करायचंय आता लग्न.

आईः अगं पण का? तेच विचारतेय मी.

राधिका शांत बसलीये.

देविकाः (हातातलं मॅगझीन खाली टाकत) सोड आई, ती काय उत्तर देईल. काही असेल तर बोलेल ना ती!

राधिकाः देवू, तू नको सांगूस मला कसं वागायचं आणि कसं नाही ते.

आईः तिच्यावर कशाला चिडतेयस? मला आणि तिला काही हौस नाहीये. सगळं तुझ्याच चांगल्यासाठी चाललंय.

राधिकाः (ओरडत) तू तर माझं काही चांगलं करायला जाऊच नकोस आई, कळलं ना! आयुष्यभर प्रेशराईज केलंस. आता बास! आणि तुम्ही दोघींनी जर परत माझ्या लग्नाचा विषय काढला किंवा मला ऐनवेळला कोणासमोर उभं करायचा प्रयत्न केला तर बघा मी काय क रते! बाबा असते ना...काही चाललं नसतं तुमचं.

देविकाः हे अति होतंय.

राधिकाः तुला हे अतिच वाटणार. तुझं सगळं बरं आहे ना म्हणून तुला हे सगळं अतिच वाटणार. (दोघींकडे पहात) फार नाही पण  थोडा वेळ माझ्याजागी विचार करुन पहा. रडवेली होत फुटते.) आणि तुम्हाला मला या घरातून काढायची एवढीच घाई असेल तर मी दुसरीकडे जाते पण हे लग्न बिग्न नको मला!

रडत रडत आत जाऊन दार लावून घेते. आरशात आई आणि बहीण एकमेकींकडे पहाताना दिसत रहातात.

CUT TO...

55. Int/ Hall / Evening

आवाज येतोः वल्हं उजव्या हातात धरा.

एक प्रेग्नंट बाई उजव्या हातात वल्हं घेऊन होडीत बसलेली दिसते. फोटो काढला जातो.

पुन्हा आवाज येतोः हां आता पाणी उडवल्यासारखं करा...

तीच प्रेग्नंट बाई पाणी उडवल्यासारखं करते.

तिचा फोटो काढला जातो.

अमृता नऊवारी नेसून घाईघाईने आत येते.  इकडे तिकडे पहाते. अचानक तिच्या कानावर सूर येतात. अमृता समोर पहाते. मंदोदरी मावशी होडीच्या शेजारी उभी आहे. चार पाच बायका बाजूला... मावशीने गाणं म्हणायला सुरुवात केलेली आहे. शेजारी बायका नाचायच्या तयारीत आहेत.

मावशीः हा भार सोसेना... आला जीवात जीव राणी... पोटात बाळ हसते...

त्याच्यासाठी म्हणू गाणी...

अमृताला हसू येतं. ती रुमालाता तोंड लपवून हसायला लागते.

चांद हा पुनवेचा... कशी रुपाने गोजिरवाणी...काढू तिची दृष्ट... बाळ नाचेल अंगणी...

बाळराजा येऊन... घरभर नाचून... आनंद देईल जगाला...

बाळराजा येऊन... घरभर नाचून... आनंद देईल जगाला...

अमृता हसू आवरत समोर पहाते. मावशी तिला पहाते आणि तिथूनच हात करते. प्रचंड खूश झालीये. अमृता पण मावशीला मोठयांदा हात करते. मावशी तिच्याकडे पाहून कपाळावर बोटं मोडते.

CUT TO…

55A. Int/Hall /Evening

मावशीः नमस्कार मी मंदोदरी कुलकर्णी, हृषिकेशची मावशी.

अमृता हसते.

अमृताः मावशी काय हो?

मावशीः नाही कारण तू आणि तुझा तो निरलज्ज नवरा, दोघेही एव्हाना विसरला असाल मला. गावभर फिरायला वेळ आहे, मावशीकडे यायचं म्हणलं की बोलतो काहीतरी इंग्लीश मध्ये पटापटा. झालं आपल्याला काय कळतंय. (एक क्षण जातो.) आणि तू काय सोडलंस त्याला?

अमृताः काय झालंय काय मावशी आज तुम्हाला?

मावशीः नाही...तुम्ही आजकालच्या मुली घरात मंगळसूत्र घालत नाही, तुम्हाला बाहेर जाताना गडबड असते हे सगळं मान्य आहे पण मंगळसूत्र घालायचं विसरलीस तू! कुठाय मंगळसूत्र? का दिलं टाकून वाऱ्यावर?

अमृता दचकते, तिला लक्षात येतं.

अमृताः सॉरी. चुकून राहीलं.

मावशीः तू एक तशी आणि तो दुसरा नग! काल फोन केला तर उचलला नाही, वर परत फोनही नाही.

अमृताः तुम्ही त्याला फोन करत होतात का?

मावशीः हो, अरे देवा! तुला सांगायचंच राहीलं. मी पिक्चरमध्ये काम करतेय.

अमृताः (मोठयांदा) काय??

दोन तीन बायका वळून पहातात.

अमृताः मराठी?

मावशीः हिंदी. आमच्या भोमे बाईंचा मुलगा आहे तिथे असिस्टंट डायरेक्टर. मला म्हणाला इमरान का कोण हाश्मी आहे त्याच्या बरोबर काम आहे. मी त्याला म्हणलं मला बाई भिती वाटते. हे म्हणाले कर बिनधास्त.

अमृताः तुम्ही एक नंबर आहात.

मावशीः तशी अभिनयाची मला पहिल्यापासून आवड! शाळेत गॅदरिंगला मी ‘शबरीची बोरं’ नाटकात शबरीचं काम केलं होतं. पण ऐनवेळेला सगळी बोरं मीच खाऊन टाकली. त्यामुळे पडदा पाडावा लागला. (थांबून) वाईट वाटतं गं. तशी बोरं आजकाल कुठेही मिळत नाहीत.

अमृताः मावशी किती एनर्जी आहे हो तुमच्यात.

मावशीः म्हणजे काय? मस्त रहायचं आणि खायचं मस्त पैकी. खाल्लस का तू?

अमृताः नाही आत्ता नको काही. मी निघते लगेच. आज ह्रषि यायचांय ना... बँगलोर हून!

मावशीः व्वा व्वा! सव्वाशे रुपयानी ताट आणलंय, नाही खाल्लसं तर काय फेकून देणार? चल खाऊन घे,

तिला उठवते. दोघी उठतात.

मावशीः (खांदयाला पर्स लावत) गुलाबजाम खाऊन पहा. जोशी गोखल्यांची स्पेशालिटी आहे.

अमृताः चला...

दोघी चालायला लागतात. चालत बुफेच्या दिशेनी जातात.

मावशीः अमरे, गाणं कसं वाटलं? मीच लिहीलं होतं.

अमृताः मस्त होतं.

मावशीः अमरे, हे म्हणतायत कर म्हणून पण अंगावर बिंगावर यायचा नाही ना गं तो?

अमृताचा हसण्याचा आवाज येतो.

CUT TO...

56. Int/Home/ Night

दार उघडलं जातं. त्याला तीन चार दिवसाचे पेपर्स तसेच लागलेले. ह्रषि आत येतो. खाली वाकून मॅट खालून काही पत्र, बिल्स उचलतो.

ह्रषिः (पेपर्स नीट लावत) इतक्या वेळा सांगीतलंय. तरी सरळं दाराखालंन आत टाकतात. आता ते मॅटच्या खाली राहतं दर वेळेला.

मागे वळून पहातो. राधिका उभी आहे.

ह्रषिः आत ये ना...

राधिका त्याच्याकडे पहाते. आत येते.

ह्रषिः नाईस सँडल्स!

तीचे सँडल्स दारापाशी उतरवले जातात. दोघे बसतात.

ह्रषिः मघाचपासून बघतोय, तू अशी गप्प गप्प का आहेस?

राधिकाः नाही कुठे काय?

ह्रषिः हाय मी ह्रषिकेश, आपली आजच ओळख झाली.

(ती खिन्नपणे हसते.) अगं काल फोन नाही उचललेस माझे, मग आज अचानक एअरपोर्टवर आलीस. आणि भेटल्यानंतर काहीच बोलत नाहीयेस. अशी का वागतेयस गं?

राधिकाः (त्याच्याकडे पहाते.) माहीत नाही, असं का होतंय. ह्रषि माझं खूप चुकत ना रे?

ह्रषिः म्हणजे?

राधिकाः नाही मी कालपासून खूप विचार करतेय. खूप चुकीचं वागते मी. अशी अॅटीटयूड घेऊन फिरते, भकाभका सिगरेट ओढते, सतत मी किती आनंदी आहे मजेत आहे असं स्वतःलाच सांगायचा प्रयत्न करते. खरंतर यातलं काहीच करायचं नसतं मला, पण करते मी. का?

ह्रषिः राधिका काही झालंय का?

राधिकाः (उठून त्याच्या जवळ येते. त्याच्याकडे पहात. डोळयात पाणी ) ह्रषि मला खरचं लग्न नाही करायचं. मला खरंच लग्न नाही करायचं. मी किती वेळा सांगीतलं कोणीही ऐकत नाही.

रडायला लागते. ह्रषिला काय करावं कळत नाही तिच्या पाठीवर हात फिरवतो.

ह्रषिः इटस ओके, शांत हो. (ती त्याला मिठी मारते.) राधिका , प्लीज असा काही विचार करु नकोस, एव्हरीथिंग वील बी ऑलराईट! आणि मी आहे ना! हं, वेडी आहेस, का? तू आहेस म्हणून मी स्टेबल असतो उलट, तूच अशी झालीस तर कसं व्हायचं. हं?

ती त्याला आणखीन घटट बिलगते. दोघे मिठीत आहेत.

राधिकाः मला खूप भिती वाटते ह्रषि. खूप!

ह्रषिः डोन्ट वरी! हं, डोन्ट वरी आर डी!

ती तशीच बिलगून आहे. तो मिठीतून बाहेर यायचा प्रयत्न करतो. तिने धरुन ठेवलंय. तिला सोडवतो. उठतो.

ह्रषिः (शर्ट नीट करत) बस, बस, मी चहा करतो आपल्यासाठी.

आत जातो. राधिका तशीच उभी आहे.

CUT TO…

56A. Int/Kitchen-home/ Evening

किचनचा लाईट लागतो. ह्रषि किचन येतो. फ्रीजमधून दूध काढून वर ठेवतो. गॅसवर पातेल ठेवायला जाणार इतक्यात राधिका मागून येऊन त्याला मिठी मारते. ह्रषि स्तब्ध होतो. वळतो.

राधिकाः (त्याला घटट धरुन) ह्रषि आपण किती एकटे आहोत ना? गेल्या पंधरा वीस दिवस तुही कुठल्या त्रासातून जात असशील कल्पना आहे मला, आणि म्हणून मला वाटतं की, की मी सतत तुझ्या बरोबर असावं. तुझी काळजी घ्यावी. ह्रषि तू प्लीज स्वतःला कधीही एकटा वाटून घेऊ नकोस. मी आहे, हं तू सांग, मी तुला हवी ती हेल्प करायला तयार आहे.

ह्रषिः तुला आत्ता काय वाटतंय हे मला कळतंय, (तिचा हात थांबवत)पण नाही! अ, आपण जाऊया इथून. प्लीज! चल मी तुला घरी सोडतो आधी, चल,चल.

लगबगीने बाहेर येतो. दारापाशी जाऊन किल्ली घेणार इतक्यात राधिका त्याला वळवते.

राधिकाः (रडवेली होत) काय प्रॉब्लेम आहे? सांग ना? त्या, त्या एका मुलीमुळे तुझं नुकसान होताना मला बघवत नाहीये.(त्याच्या जवळ जात) ह्रषि फरगेट एव्हरीथिंग, मी आहे ना, तू प्लीज नाही म्हणू नकोस.

त्याच्या केसातून हात फिरवते आणि त्याच्या पायावर स्वतःचा पाय टाकते. तो भिंतीवर कलतो. ती स्वतःचा शर्ट काढायला जाणार इतक्यात तो तिचा हात धरतो. लॅचने दार उघडतं आणि अमृता आत येते. समोर पहाते तर भिंतीला टेकून ह्रषि आणि त्याच्यावर राधिका असं दृश्य दिसतं. अमृता त्याकडे पहाते. प्रचंड शॉक्ड होते. ह्रषिला काय करावं कळत नाही. तो राधिका ला बाजूला करतो. ती कशीबशी बाजूला जाऊन उभी रहाते.

ह्रषिः अमृता एक मिनिट, तुला वाटतं तसं काहीही नाहीये.

अमृता मान वळवून रडायला लागते. तो तिचा हात धरतो. अमृता झटकते.

ह्रषिः (राधिकाचा हात धरत.) तू तू सांग हिला, आपल्यात असं काहीही नाहीये, म्हणजे माझ्याकडून काहीही नाहीये. सांग! सांग ना...

राधिका रडवेली होऊन तिच्याकडे पहाते. अमृता निघायला लागते, तो तिला पुन्हा थांबवतो. अमृता त्याचा हात सोडवते

अमृताः (ओरडत) कशाला थांबवतोयस? मी जाते ना, चालू दे तुमचं!

रडत रडत चालू लागते.

ह्रषिः (तिला थांबवत) थांब तू जरा, ऐक माझं प्लीज!

पायऱ्यांवरुन अमृता धाडधाड चालत येते. ह्रषिपण तिच्या मागे खाली उतरतो.

जिन्यावरुन खाली उतरुन ह्रषि पळत पळत तिच्या पुढे जातो.

ह्रषिः तू ऐक तर, मी काय म्हणतोय ते!

अमृता त्याच्याकडे संतापाने अगतिकतेने पहाते आणि ताडताड निघून जाते.

CUT TO…

56B. Ext/ home/ Evening

उघडं दार दिसतं. राधिका दारातच मटकन खली बसून रडतेय. ह्रषि समोरुन येतो. तिच्याकडे प्रचंड रागाने पहातोय. आत जातो. राधिका बसलेलीच आहे. ह्रषि उभा आहे. तिला उठवतो.

ह्रषिः ताबडतोब चालती हो. आऊट!

राधिका रडवेली होऊन पहातेय. तिला हाताला धरुन बाहेर काढतो.

ह्रषिः (ओरडत) कळत नाहीये का तुला? जा ना बाई!

राधिका त्याच्याकडे मागे वळून पहाते. तिचे सँडल्स आणि पर्स तिच्या पुढयत येऊन पडतात. ती त्याकडे पहाते, वर पहाते तो धाडकन दार लावून घेतो. सँडल्स आणि पर्स उचलली जाते.

CUT TO…

57. Int/ Amruta home/ Evening

वाडयाचं दार उघडतं आणि अमृता पळत पळत पळत आत येते. थेट घरात जाते. आई समोर उभी आहे. अमृता दारात तिच्यासमोर रडवेली.

आईः ( चष्मा काढत) काय गं?

अमृता जाऊन मिठी मारते. आईला काहीच कळत नाही . अमृता ओक्साबोक्शी रडतेय.

आईः अमृता, ऐ अमू, काय गं, काय झालं?

मिठी सोडवून तिच्याकडे पहाते.  अमृता तिच्याकडे पहाते आणि अचानक तिच्या पायातलं त्राण जातं. आई तिला धरते तिला लक्षात येतं काहीतरी सिरीयस आहे. तिला तशीच कवटाळते आणि अमृता अमृता म्हणून ओरडून विचारते.

CUT TO…

58. Int/ Amruta home/ Evening

अमृता बेडवर बसलीये. दोन तीन लोकं बसलेली आहेत.

वडीलः हीचा मला फोन आला, ताबडतोब निघून आलो, हातातला चहाही अर्धा टाकला आम्ही,

काय हो?

मित्रः हो.

वडीलः मी म्हणलं चहा काय केव्हाही पिता येईल, मुलीची काय काळजी आहे का नाही?

मित्रः नाही नाही.

वडीलः बरं वाटतंय ना आता...? काय माऊ? (अमृता मान डोलावते.)

आईः जा तुम्ही.

वडीलः म्हणून नाही विचारलं!

आईः नाही खरचं जा, ( सगळयांना) तुम्हीही जा आता... खूप मदत झाली सगळयांची.

१ः काळजी घे सोने

२ः वहीनी काही स्वयपाक वगैरे असेल तर सांगा, चार पोळया करुन देते.

आईः नाही, पोळया आहेत सकाळच्या.

वडीलः मी येताना काही आणू का?

आईः तुम्ही फक्त वेळेवर या.

सगळे निघतात. आई दाराशी जाऊन पहाते. मागे वळते.

CUT TO…

अमृता बसलेली आहे. पार्टीशनच्या मागे आई फोनवर बोलतेय.

आईचा आवाजः कसा विश्वास ठेवायचा? नाही नाही असेलही, पण तिने जे पाहीलं ते...?? नाही त्यात बँगलोर ला जायच्या दोन दिवस आधी हिला इकडे पाठवून दिलत तुम्ही, का? सहज? अहो नाही नाही तुम्ही रडू नका... मी काय माफ करणार? नाही पण तिला असं

कोणाच्या अंगावर पडलेलं पाहीलं असतं तर माफ केलं असतं तुम्ही? तिला त्रास झालाच आहे. चक्कर येऊन पडली ती इथे. (रडवेली होत) आम्ही आपले पोरींना संसारी व्हा संसारी व्हा ओरडायचं! कोणासाठी ? नाही, बोलते मी तिच्याशी पण तिला राहू दे इथंच, आणि तुम्ही नका तिला त्रास देऊ फोन करुन.

फोन ठेवते. डबा उघडते. दोन्ही मुठीत काहीतरी भरलेलं आहे. बाहेर येते. अमृताकडे बघते.

आईः इकडे बघ.

अमृता तिच्याकडे पहाते. आई तिची दृष्ट काढते. गरागरा हात फिरवते.

CUT TO…

59. Int/ Office/Day

मॅनेजरच्या केबिनचं दार उघडलं जातं. त्यातून शांतपणे ह्रषि बाहेर येतो. दार मागे आपोआप लागणार तेवढयात राधिका बाहेर येते. ती ही इक्वली शांत. ह्रषि आणि त्याच्या पाठीमागे ती थोडेसे पुढे जातात, आजूबाजूला अजून तीन चार जण आहेत. राधिका त्याच्या थोडी जवळ जाते.

राधिकाः (ह्रषिला ऐकू जाईल असं) सॉरी!

ह्रषि मागे वळतो.

राधिकाः ह्रषि आय एम सॉरी.

ह्रषिः (चिडलेलाच आहे, थोडासा आवाज लावतो.) मग? काय करु मी? माझी गेलेली बायको परत येणार आहे का तू सॉरी म्हणून? (हात जोडतो.) जा तू, परत समोर नको येऊस माझ्या. उगाच काही नसताना फालतूपणा करायचा...

वळतो. राधिका उखडते. त्याला वळवते.

राधिकाः काय? काय म्हणलास तू? काहीही नसताना? आँ? हाऊ कॅन यू से दॅट?

सगळे वळतात. तिकडे पहातात.

राधिकाः माझ्या हातून काल जे काही झालं ते मान्य. पण इतके दिवस तूही काही कमी इंडीकेशन्स नाही दिल्यास मला!

ह्रषिः मी? डोकं फिरलंय तुझं. बाकी काही नाही!

राधिकाः अच्छा मग मला प्रोजेक्टमध्ये इन करुन कोणी करुन घेतलं तुझ्या वडलांनी? रात्री थांबू, मग एकत्र जेवायला जाऊ, मग बॅडमिंटनचं विचारलंस, मग रात्री बेरात्री घरी काम करायला बोलवलंस. बँगलोरला यायचा आग्रहही तूच केला होतास. आठवतंय का अजून सांगू?

मॅनेजर बाहेर येतो. त्याला कळत नाही काय चाललंय.

ह्रषिः वाटटेल ते बोलतेयस तू. मी तुला कसल्याही इंडीकेशन्स दिल्या नव्हत्या.

राधिकाः ओह, मग का केलंस रे सगळं? कोणाला दाखवायला? का मला सतत असा फिल दिलास की आपल्यात परत काहीतरी होणारे.

ह्रषिः आपल्यात काहीही नव्हतं आणि नसणारे,

राधिकाः आपल्यात काहीही नव्हतं? कुठल्या तोंडाने म्हणतोस तू? दाखवू आणून सगळे फोटोग्राफ्स, मेल्स, चॅटस, माझ्याकडे तुझ्या अजूनही पडलेल्या वस्तू, दर वाढदिवसाला पाठवलेली पत्र, तुझे टी शर्टस, बँकेतलं जॉईट अकाऊंटच पासबुक? दाखवू सगळ आणून?

ह्रषि खाली पहातो.

राधिकाः चुकूनही हे म्हणू नकोस की आपल्यात कधीच काहीच नव्हतं. सांगितलंयस का कधी बायकोला की आपलं ब्रेक अप झाल्यावर धक्का पचवता आला नाही म्हणून परदेशात गेलास. सांगितलंस?

ह्रषि तिच्याकडे पहातो, संतापलाय. मॅनेजर मध्ये येतो. राधिका जवळ जातो.

मॅनजरः राधिका प्लीज जा... इथं सगळयांसमोर तमाशा करु नका. चला एव्हरीबडी गो बॅक टू युअर वर्क.

राधिकाः मी जाणारच आहे, फक्त हा जो आव आणलाय ना, बरं का मिस्टर हृषिकेश देशपांडे हा दुसऱ्या कोणासमोर तरी दाखवायचा माझ्यासमोर नाही.

तिथून ताड ताड निघून जाते.

मॅनेजर हृषि जवळ येतो. तो मान खाली घालूनच उभा आहे. मॅनेजर त्याच्या खांदयावर हात ठेवतो.

हृषिः मी? मी इंडीकेशन्स दिल्या हिला? काय बोलतेय ही?

ंमॅनेजरः हो, म्हणूनच मी तुला आधीच बोललो होतो जरा हळू म्हणून.

हृषिः तुलाही?? (त्याला झिडकारत) काय लोकं आहात तुम्ही? तुम्हाला का वाटतयं हे असलं काही? आणि प्लीज माझ्या पर्सनल गोष्टीत लक्ष घालू नका. आजिबात.

मॅनेजरः (त्याच्याकडे पहातो.) एकतर पर्सनल गोष्ट तू ऑफीसमध्ये आणलीस. आणि दुसरं म्हणजे मी मित्र म्हणून हे सांगत होतो, पण तुला फक्त प्रोफेशनली वागायचं असेल तर मला काही प्रॉब्लेम नाही!

मॅनेजर तिथून चालायला लागतो.

हृषिः विनय, प्लीज...

मॅनेजर न ऐकता निघून जातो. हृषि डोक्यावर हात मारुन घेतो.

CUT TO…

59A. Ext/ Office-smoking zone/ Day

सिगरेट पाकीटातून काढली जाते. राधिका थँक्स म्हणते लाईट करते.

राधिका च्या डोळयात पाणी आलंय. ती कठडयाजवळ उभी राहून सिगरेट ओढतेय. डोळयांच्या कडा पुसते आणि तशीच समोर पहाते.

CUT TO…

60. Int/ Rishi Home/ Evening

मोबाईलवर इन बॉक्स उघडला जातो. अमू डॉन असं लिहीलेले पन्नास एसेमेस दिसतात. ह्रषि त्यातला एक एसेमेस उघडून वाचतो. आय लव्ह यू आणि पुढे आठ स्माईलीज दिसतात. ह्रषि खिन्नपणे हसतो. मेसेज लिहीतो. एकदा भेट प्लीज, प्लीज, प्लीज! मेसेज पाठवतो. तसाच बसून रहातो. शांतपणे पहातो. आणि काहीतरी सुचतं. फोनबुक मध्ये हिम्मतरावचं नाव काढून ठेवतो.

CUT TO…

61. Ext/ Forest/ Evening

हातामध्ये तंबाकू घेतलेली दिसते. मचाणावर एक फॉरेनर हातात तंबाकू घेऊन बसलाय.

समोर हिम्मत.

जेम्सः हाऊ?

हिम्मतः मर तिकडं मी नाही सांगणार. अरं, तंबाकू खायला आला का काम करायला? अरं, च्युईंग टोबॅको इज इन्ज्युरियस टू हेल्थ!

जेम्सः लिटील...

हिम्मतः घे अन काय आता... (तंबाखू ओतून घेतो.) तुझ्यामुळे मलाही खायला लागती. (ओततो.) टेक सम चुना अन रगड दना दना, (दोघे रगडताना दिसतात.) नाऊ रिमूव्ह अनवॉन्टेड पोर्शन, (जेम्स हसतो.) डोन्ट टेक टेंशन, हां, ग्रॅब इट इन युअर फिंगर टिप्स, देन ओपन युअर लिप्स, घे देवाच नांव, अन मस्त बार लाव.

दोघं बार लावतात. हिम्मत लगबगीने समोर पहातो. कॅमेरा समोर आहे. झपाझप फोटो काढतो. मागे पहातो जेम्स चक्कर येऊन पडलाय.

हिम्मतः हयाच्या आयला, अए, उठे, ऐ जेम्स ए हिराचंद, हे लंडन आय...

त्याला पाण्याची बाटली काढून पाणी मारतो. जेम्स दचकून उठतो. ह्रदयी वसंत फुलताना वाजतं. हिम्मत फोन घेतो. ह्रषिकेशराव कॉलिंग दिसतं. हिम्मत फोन कट करतो.

जेम्सः हू?

हिम्मतः अमृताचा नवरा...

जेम्सः सनई?

हिम्मतः सनई नाही साने! अमृता साने! ऐ, भावडया... र म्हण र...

जेम्सः व!

हिम्मतः ढेकर दिल्यागत वाटतंय च्यायला. व्ह!!

जेम्सः यू आर डिस्गस्टींग.

हिम्मतः पप्या पन हेच म्हणतो.

जेम्सः हूज पपै?

हिम्मतः पपै इज अ फ्रुट ! ॲण्ड माय फ्रेंडस नेम इज पप्या.

झेम्सः व्हॉट काईंड ऑफ नेम इज धीस?

हिम्मतः पाळण्यातल नाव आहे. खरं नावं ऐकलंस तर तुला परत चक्कर येईल.

पुन्हा फोन वाजतो. हिम्मत फोन हातात घेतो.

हिम्मतः दोनदोनदा करतोय, म्हणजे खरंच काहीतरी काम असलं. (फोन घेतो.) हॅलो? हां, बोला! मला? मला भेटायचं तुम्हाला? नक्की हाच नंबर पाहीजे ना? आँ ? नाही! मी येतोय उदया. ती कशी आहे?तिला एक माहेरी जायला निमित्तच पाहीजे. नाही, आपण नाही केला

कॉन्टॅक्ट!  आपल्याला सवय नाही ना याचं त्याला त्याचं हयाला करायची! हां... काही सिरीयस नाही ना?

CUT TO…

62. Int/ Coffee shop/ Evening

ग्लासातून कोल्डकॉफी कमी कमी होताना दिसते. हिम्मतराव ती पितोय. समोर ह्रषि बोलतोय.

ह्रषिः (आवाज) आणि तीनं ते पाहीलं.

हिम्मतराव अचानक थांबतो. वर पहातो.

हिम्मतरावः आयो, रेड हँड रेड हँड म्हणतात ते हेच!

ह्रषिः असं काही नाहीये.

हिम्मतरावः मग काय संध्याकाळी सहज भेटून पकडापकडी खेळत होतात घरात.

ह्रषिः राधिकानी ते सगळं चालू केलं, आणि अमृतानी हे सगळं पाहील हा निव्वळ योगायोग होता.

हिम्मतरावः मला तुमचे फंडेच कळत नाहीत. कॅफेत समोरासमोर भेटलेल्याला तुम्ही योगायोग मानायला तयार नाही आणि इथं पार एकमेकांत मिसळला होतात हा योगायोग? तुम्हाला असं पाहून कुणालाही हेच वाटेल.

ह्रषिः लोकांना उगाच वाटतं, आम्ही चोवीस तास एकत्र असतो म्हणजे आमच्यात काय आहे लगेच?

हिम्मतरावः पण तुमच्या दोघात तसं शेअरिंग असतं रिलेशन असतं असं नाही वाटत तुम्हाला?

ह्रषिः तू माझीच वाक्य मला सांगू नकोस. मी कुठल्या परिस्थीतीत आहे ते बघ!

हिम्मतरावः घरी जाऊन भेटा मग तिला.

ह्रषिः मला वाटतं तू तिला समजवावस, तुझं ऐकेल ती.

हिम्मतरावः तिचं ठरलं असेल तर कोणाचही एकणार नाही ती!

ह्रषिः तू मला घाबरवू नकोस.

हिम्मतरावः अहो घाबरवायचं काय त्यात? परिक्षेत पेपर कोरा सोडलेल्याला नापास व्हायची भिती वाटायचं काहीच कारण नाही. आणि कसं आहे, १०० चे १००० झाले तर चूक, १००००० झाले तर घोटाळाच ना? तुमचं तसं झालंय आत्ता. मला नाही वाटत मी काही करु शकीन.

ह्रषिः हिम्मत मी तुला एकच सांगतो, एकटेपणाची खूप सवय करुन घेतली होती, अमृता आली आणि ती सवय तुटली, आता परत एकटा रहाण्याची मला इच्छाही नाही, आणि ते झेपणारही नाही.

हिम्मतरावः किती वेळात बोलायला लावू? दोन मिनिट? का एक मिनिट? आज मै एक सेकंड का एक हजार लूंगा...

ह्रषिः काय?

हिम्मतरावः मोहरा मधला डायलॉग आहे, मी आणि अमरीनी पाहीला होता मंगलाला मॉर्निंगला, पिक्चर संपवून गेली आणि समोर बसस्टॉपवर आई उभी, जे हाणलाय हिला. (हसतो.) चला... जाताजाता सांगतो.

ह्रषिः मी पण यायचं?

हिम्मतः तशेच कुठंतरी जेवायला घेऊन जा ना तिला! तुम्हाला सगळं सागायला लागतं. चला!!

ह्रषि ताडकन उठतो.

हिम्मतः आणि ते... बिलाचं!

ह्रषि त्याच्याकडे पहातो. पाकीट काढतो. पैसे टेबलवर ठेवलेले दिसतात.

CUT TO...

63. Ext/Wada/Night

ह्रषि बाहेर उभा आहे.

हिम्मतः चला...

ह्रषिः नाही तू जाऊन ये. तू  आधी बोल तिच्याशी.

हिम्मत त्याचा हात धरतो.

हिम्मतः अहो चला!

ह्रषिः नाही, प्लीज! मी मी थांबतो इथेच.

हिम्मतः (त्याला नमस्कार करतो.) प्रभू रामचंद्रांनतर तुम्हीच!  थांबा इथं! आलो मी दोन मिनिटात.

आत निघून जातो. ह्रषि आशाळभूतासारखा पहातो. वाडयाच्या भिंतीआडून ह्रषि आत डोकावतो.

CUT TO…

63A. Ext/Wada/Night

हिम्मत दारातून डोकं आत काढून उभा आहे.

हिम्मतः काकू कुठाय जिवंत बॉम्ब?

आईः (हाक मारत) अमृता हिम्मत आलाय.  (आत जाते. ) आले रे, बस.

अमृता बाहेर येते. त्याच्याकडे पहाते.

अमृताः तू कधी आलास?

हिम्मतः (आत येत) आत्ताच. काही नाही सहज आलो होतो भेटायला, एकदम सहज! इकडनं चाललो होतो म्हणलं आयला अमरीचं घर आलं. म्हणून आत आलो.

अमृताः बाहेर कोण वडील उभे आहेत वाटतं?

हिम्मत तिच्याकडे आश्चर्याने पहातो.

अमृताः मी काय लहान आहे?

हिम्मतः अमरे जी लोकं सतत असं म्हणतात ना, मी काय लहान आहे? मी काय लहान आहे? ती खरंतर चेक करत असतात, मी खरचं लहान आहे का?

अमृताः त्याविषयी बोलायला आला असशील तर आधीच बाहेर जा.

हिम्मतः अमरोझ, मोठ्ठा गैरसमज झालाय तुझा, आता भेटले मला ह्रषिकेशराव. सगळं सांगितलं, योगायोग आहे तो.

अमृताः कशावरुन?

हिम्मतः मी सांगतो ना!

अमृताः तू होतास त्या दिवशी पहायला? आँ ? पाहीलंस का तू? ( ओरडते) सिरीयसनेस कळतो का तुला त्याचा?

आई बाहेर येते.

आई : काय गं?

अमृताः आई त्याला आधी बाहेर जायला सांग.

हिम्मतः ए अमरे उगाच नाटकं करु नको हां. त्यांचे बघ काय हाल झालेत, म्हणजे कळेल तुला हे खरं आहे का खोटं आहे. लफडी करणारा माणूस असा मरतुकडा होऊन कशाला भेटायला येईल तुला? चल गपचूप,

तिला हाताला धरतो.

अमृताः हिम्मत सोड, मला नाही भेटायचं त्याला!

हिम्मतः गपचूप बाहेर चल.

तिला बाहेर आणतो. ती आरडाओरडा करते. वाडयातली लोकं पहायला लागतात.

अमृताः मला नाही भेटायचं मी सांगितलं ना एकदा, तुला कळत नाही, सोड मला, हिम्मत,

मूर्खासारखा वागू नकोस! हिम्मतः (चिडून) अमरे कशाला ताणती एवढं? सांगतोय ना मी!

अमृता संतापलेली आहे. साणकन त्याच्या मुस्काडात मारते. हिम्मत गाल धरुन पहातो.

अमृताः तू काय परमेश्वर आहेस? तू सांगशील तो कौल मानून मी ऐकायला? आँ? आमचं

काय करायचं ते बघू आम्ही, गपचूप जायचं इथून, एक मिनिटं ही दिसायचं नाही!

आईःअमू काय  गं हे?

अमृताःआई तू थांब! हया अशांना कसं सरळ करायचं मला चांगलं माहीतीये.

हिम्मत वर पहातो.

अमृताः काय बघतोयस? तुला मराठी कळत नाही? निघ इकडनं असं म्हणाले मी.

हिम्मतः एवढा तिटकारा बरा नाही अमरे.

हिम्मतराव आई कडे पहातो आणि निघून जातो. बाहेर येतो. ह्रषि लांब चालत जाताना दिसतो.

CUT TO…

SONG 4: SAD SONG: MOMENTS: राधिका घरात बसलेली आहे. फोन काढते. अमृताला फोन करते. उचलला जात नाही. फोन फेकून देते. मॅनेजर बसलाय. राधिकाचं रेझिग्नेशन लेटर मिळतं. तो बाहेर पहातो. ह्रषि तंद्रीत बसलेला. मॅनेजर वाईट वाटतं, ह्रषि त्याच्याकडे पहातो, मॅनेजर दुसरीकडे पहातो. आई अमृताला समजावते. अमृता ऐकत नाहीये. दोघी बोलतायत. वडील येतात. आई एकदम शांत होते.  अमृता गाडीवरुन चाललीये. एका ठिकाणी थांबते. लॉयर कडे जाते. ह्रषि फोनवर रडतोय. मंदोदरी मावशी ऐकते. त्याला धीर देते.

राधिकाची आई तिला जेवायला विचारते. राधिका नाही म्हणते.  अमृता लॉयरच्या इथून बाहेर येतो. समोर बापाचा हो नाही करणारा मित्र तिला पहातो.

CUT TO…

64. Ext/ Road/ Night

एका गाडीचे ब्लिंकर्स चालू आहेत. आडोशाला राधिका उभी राहून रडतेय. शेजारी हिम्मत शांत उभा आहे.

राधिकाः मी नाही कंट्रोल करु शकले स्वतःला त्या वेळेला. फक्त अमृता अशी समोर येईल मला वाटलं नव्हतं.

हिम्मतः आपल्याला जे कधीच होणार नाही असं वाटत तेच होतं मॅडम.

राधिकाः त्यानी हाताला धरुन घराबाहेर काढल्या क्षणापासून मनात हाच विचार होता, काय करुन बसलो आपण. आपल्यामुळे त्याच्यात खूप मोठया लेव्हलचे प्रॉब्लेम्स येणार आता.

हिम्मतः आलेच आहेत ते. ब्रहमदेव आला तरी ते काही एकत्र रहाणार नाहीत आता.

राधिकाः मीच जबाबदार आहे या सगळयाला.

हिम्मतः तुम्ही एकटया कुठं? मी आहे ना! माझ्यामुळे तर सुरुवात झाली सगळयाला. बघता बघता वाट लागली त्यांच्या संसाराची. मी मजे मजेत घालवलं सगळं पण विचार करतो तेव्हा वाटतं आपल्यालाही कळात नाही कोणाच्या किती जवळ जावं, कोणाला किती आपलेपणा दाखववावा.. ( पॉज) मॅडम मी खरंच कधी कधी जास्त करतो ना? डोक्यात जाईल असं वागतो बोलतो ना?

राधिका शांतपणे पहाते.

हिम्मतः उत्तर मिळालं मला मॅडम!

राधिकाः तरीही तूझी चूक माझ्याएवढी मोठी नाहीये. मी ह्रषिला कितीही शिव्या घातल्या तरी फायनली मीच रिस्पॉन्सिबल आहे या सगळयाला. वाााटलं होतं एकदा अमृताशी बोलीन, तिला सगळं सांगीन आणि निघून जाईन नाहीतर जीव देईन. ते घर नको, आई नको, बहीण नको, ते ऑफीस नको, माणसं, रिलेशन्स, त्यात अडका अडकी काही नकोच. मी गेले म्हणजे सगळयांच्याच डोक्याचा ताप मिटेल...

हिम्मतः त्यानी काय होणार?

राधिकाः आपल्यामुळे आयुष्यात कोणाचं तरी वाटोळं झालं याचा गिल्ट घेऊन मी नाही राहू शकत! आणि त्यात ह्रषिच्या आयुष्याचं, ज्याच्यावर मी इतकं मनापासून प्रेम केलं होत.

रडत रडत दुसरीकडे निघून जाते. हिम्मत पहात रहातो.

हिम्मतः मॅडम थांबा...

ती निघून गेलीये. हिम्मत तिच्याकडे पहातो. मग वर पहातो.

हिम्मतः देवा पांडुरंगा, काय रे हे चाललंय, तूच काहीतरी करं बाबा... कोणाला तरी बुध्दी दे...

तिथून निघतो. तिच्या मागे जातो.

CUT TO…

65. Int/Amruta Home/Morning

मावशी आणि अमृता समोर बसल्यात

मावशीः अजून काय सांगणार मी? रागाच्या किंवा भावनेच्या भरात कोणताही टोकाचा निर्णय घेऊ नकोस बाळा.

अमृता काहीच बोलत नाही. काका तिच्याकडे पहातात.

मावशीः मला म्हणााला तो, म्हणाला कसला ? रडतच होता फोनवर...

अमृता वर पहाते. काहीच बोलत नाहीये. काका तिच्याकडे आणि मंदोदरी मावशीकडे पहातात.

मावशी  काकांकडे पाहून हसते.

काकाः अं, मी आहे बाहेर. (तिच्याकडे पाहून निघून जातात. मावशी तिच्याकडे पहाते.)

मावशीः बघीतलंस, किती समजूतदार माणूस आहे. काय नाही म्हणून नाही, मीच फार कमी पडते गं सारखी. तेव्हाही कमी पडले. एक मूल देऊ शकले नाही. तरीही तसेच आहेत. मला म्हणाले आपल्याला मूल नाही हे आपलं नशीब आणि ते माहीत असूनही मला तुझ्याचबरोबर संसार करायचाय. कारण माझं फक्त तुझ्यावर प्रेम आहे. दोघं आहोत तरी एकटेपणा काही संपत नाही, मग एकटयाचं तर काय होत असेल? म्हणून मग आम्ही आपले सण समारंभ कार्यक्रम साजरे करत बसतो. तुम्हा पोरा पोरींवर अधिकार गाजवत फिरतो. मला माहीतेय आत्ताही तुला वाटलं असेल का हे इथे आलेत आपल्याला त्रास दयायला.

अमृताः नाही हो असं का वाटेल?

मावशीः (भावूक होत) वाटलं तरी तुमच्याशिवाय कोण आहे गं दुसरं आमचं? पोटची नसली तरी माझी मुलं आहात तुम्ही दोघं., इथंच बसून तुला पहिल्यांदा पाहीलं तेव्हाच वाटलं होत की पंप्याचं घर ताईनंतर कोणी नीट ठेऊ शकेल तर हीच. आजही हेच वाटतं मला. आणि पंप्याचं म्हणशील तर त्याला माझ्याइतकं कुणीच ओळखत नाही. तो चुकला असेल याची गॅरेंटी आहे पण त्यानं तुला फसवलं नाहीये याचाही विश्वास आहे मला.

अमृताः मी काय बोलू यावर? तुम्ही म्हणताय त्यातली काळजी कळतेय मला. पण मी कुणाच्याही सांगण्यावरुन निर्णय घेणार नाही. जो पर्यंत मला मनापासून वाटत नाही तो पर्यंत मी एकही पाऊल उचलणार नाही.

मावशीः ठीक आहे. जशी तुझी मर्जी... चल मी निघू?

अमृताः नाही थांबा तुम्ही प्लीज.

मावशीः नाही जाते खरंच. अगं बाई, विसरले...( पर्समधून गिफ्ट काढते) तुझ्यासाठी, गेल्या आठवडयातचं घेऊन ठेवलं होतं, म्हणलं लग्नानंतर पहिलाच वाढदिवस आहे. मावशी गेल्यानंतर तीचं काहीतरी लक्षात राहीलं पाहीजे.

तिच्या हातात गिफ्ट देते. अमृता गि फ्ट घेते. पाया पडते.

मावशीः (तिच्या पाठीवर हात ठेवत) सगळयाचा विचार करुन योग्य तो निर्णय घे बाळा. मी आहेच. हं?

तिथून निघते. दारात आई येते हातात पिशव्या.

आईः काय हो, केव्हा आलात?

मावशीः झाली दहा पंधरा मिनिट... निघालेच.

आईः बसा ना... (अमृताला) चहा तरी विचारलास का त्यांना?

अमृता कन्फ्युज्ड उभी.

अमृताः नाही मी ते...

मावशीः विचारला तीने मीच नाही म्हणाले, परत दुसरीकडे होईलच.

आईः आत ठेव हे जरा, दूध तापत ठेव, आणि भाज्या फ्रीजमध्ये काढ. आणि कणीक मळून घे जमलं तर.

अमृता घेऊन आत जाते. आई आणि मावशी बाहेर येतात.

आईः काय म्हणाली?

मावशीः होईल सगळं नीट.

आईः काळजी वाटली हो खूप. म्हणून तुम्हाला फोन केला. म्हणलं तुम्ही सांगून तरी काही...

मावशीः बघूयात, कळवा मला काय होतंय ते.

आवाज येतो. अमृता अमृता... बाप ओरडत आत येतोय. या दोघींना पहातो.  थांबतो.

मावशीः नमस्कार.

वडीलः हां... (आईकडे) आहे का घरात आहे? (आई मान डोलावते.)

वडील तसेच निघून जातात. आई काळजीने पहाते.

मावशीः (त्यांच्याकडे पहात) चला मी निघते.

आई मान डोलावते. मावशी निघते. आई थांबते. अचानक दाणकन काहीतरी फेकल्याचा आवाज येतो. आई वळून पहाते. बोल कुणी अक्कल सांगीतली तुला? बोल! असा आवाज येतोय आणि पळत पळत आत जाते.

Cut To..

आई दारापाशी थबकते. वडील समोर उभे आहेत. अमृता समोर मान खाली घालून उभी आहे.

आईः काय? झालंय काय?

वडीलः मला विचारतेय तू उलंट? या बेअक्कल मुलीला विचार? कुलकर्णी वकीलाकडे का गेली होती ही

आईः तू वकीलांकडे गेली होतीस? (अमृता तिच्याकडे पहाते.)

वडीलः लक्षात ठेव परत जर असलं काही केलंस आणि मला बाहेरुन कळालं ना मी जागेवर ठेवणार नाही  कोणालाच. आणि तू आजच्या आज निघायचं घरातनं...

आईःपण मी काय म्हणते की एकदा जरा...

वडीलः तुझीच फूस असणार तिला. कुठनं आलं एवढं अंगात बळ, मला न सांगता सगळं करायला.

आईः तुम्ही दोन मिनिट थांबा तर, आपण विचारु ना तिला...मलाही आत्ताच कळतंय...

वडीलः काय तुला माहीत नाही? एकटीच डोकं नाही हे.

आईः माझं ऐका मला नाही माहीत.

वडीलः थोबाड फोडीन खोटं बोललीस तर.

आईः (संतापाची तिडीक गेलीये) काय म्हणलात तुम्ही? थोबाड फोडणार? फोडा, खुशाल फोडा. दुसरं जमलंय काय तुम्हाला?

वडीलः आगाउपणा करु नको हां.

आईः मी? मी आगाऊपणा करतेय? स्वतःची मुलगी आलीये ती का आलीये, तिला काही त्रास असेल अडचण असेल, घुसलंय का कधी डोक्यात? विचारलंत कधी एका शब्दानी? आहे काही काळजी? रोज आपलं हा मित्र, तो कटटा आणि गावभरच्या गप्पा! अमेरिकेच्या अध्यक्षानं अमुक करायला पाहीजे, सचिन नी तसं खेळायला पाहीजे, प्रदूषण कमी करायला पाहीजे, सगळं माहीतेय आम्हाला! अहो, घरात बघा आधी.

अमृताः आई तू जरा थांब.

आईः बोला ना, अंघोळ करुन पडलेली चडडी नीट ठेवलीत का कधी? आँ? का पिऊन झाल्यावर चहाचा कप ठेवलात ओटयावर? आणि काय हो, तुमची कसंली डोंबलाची अब्रू? वाडयातलं कुत्र तरी विचारतं का तुम्हाला?

वडीलः तू तिच्यासमोर उगाच बोलू नको हां...

आईः नव्हतेच बोलत, तुम्ही बोलायला लावताय. आले जाब विचारायला... पंचवीस वर्ष झाली आज, सतत दिखावा, बडेजाव, आणि अधिकार गाजवायचा. जबाबदारीच्या नावानी ठो! कमवायची अक्कल नाही आणि दोन्ही खिसे सतत फाटलेले. म्हणे यांचे वंशज पेशव्यांचे हिशोब सांभाळायचे, हयांच्या आजोबांनी पुण्यातली पहिली सायकल चालवली, जा जाऊन

वाण्याला सांगा बघा डाळीचे दोन रुपये कमी करतो का ते? आँ? आणि वर एक तारखेला बिल आलं की माणूस गायब.

वडील: (ओरडत)मी अमृता वकीला कडे गेलीहोती त्या बददल विचारतोय.

आई: आवाज खाली करा आधी. या मुलीला जन्माला घालण्या पलिकडे तुम्ही काहीही केलेलं नाहीये, त्यामुळे तिच्यावर सोयीनुसार अधिकार गाजवायचा नाही. तीने काय करायचं हे ती ठरवेल. आणि तुम्हाला सांगायच असेल तर सांगेल. परत या विषयावर जर मला त्रास दिलात तर स्वतः काम करुन खावं लागेल, आणि ते तुम्हाला परवडणार नाही!

वडील धुसफुसत पहातात आणि निघून जातात.

अमृता: आई शांत हो.

आई: मरु दे काय करु शांत होऊन? तुझा बाप आहे म्हणून बोलले नाही कधी पण काय आहे या माणसात हयाच्या बरोबर एकत्र रहाण्यासारखं? तरी रहातेय या कोंडवाडयात ! तू विचारत होतीस ना आई बदली का करुन घेत नाहीस. बदली मी उदया मागीतली तरी मिळेल! इथे पुण्यात! पण घेऊन करु काय? पुण्यात ऑफीस म्हणजे सकाळी नऊ पर्यंत आणि संध्याक ाळी सहा नंतर घरात थांबणं आलं. काय करु थांबून? म्हणून नाही घेतली बदली. पन्नास वेळा विचार आला होता, सोडून निघून जावं, पण तुझ्याकडे पाहून रोज तशीच परत यायचे. त्रास सहन केला पण सगळं वाऱ्यावर नाही सोडलं. अमू हा, हा माणूस आहे तरी मी ॲडजेस्ट क रतीये आणि तू वकीलाला भेटून आलीस? एक चूक, तीही झाली का नाही नक्की माहीत नाही असं असताना एवढया टोकाला जायचं. अगं, बोल ना एकदा! बघ,
कदाचित मार्ग निघेल.

अमृता: राहू दे आई नको बोलायला.

आईः का राहू दे? तुला काय करायचंय तूच ठरव, पण गोष्टीचा  बाऊ करायचा का त्याच्यावर मार्ग शोधून मोकळं व्हायचं हे शेवटी आपल्याच हातात असतं.

अमृताः मला तुझं सगळं मान्य आहे पण तरीही...

फोन वाजतो. अमृता कट करते. दोघी एकमेकांकडे पहातात. घरच्या नंबर वर वाजतो.

आईः  (फोन उचलते) हा बोल, नाही तिला नाही बोलायचय तुझ्याशी. काय? एक मिनिट... (तिला फोन देते.) अर्जंट आहे काहीतरी.

अमृताः हं, काय? कधी?(फोन तसाच पडतो.) आई राधिकाने आत्महत्या करायचा प्रयत्न केलाय!!

CUT TO...

66. Int/Ketki Home/Afternoon

अमृता दार उघडून आत येते. दार लावून घेते.

समोर राधिका मान खाली घालून बसलेली आहे. बाजूला एक बाटली पडलीये. त्यात काही गोळया आहेत.  हिम्मत समोर उभा आहे.

हिम्मतः काल रात्री भेटली तेव्हा म्हणाली होती मला स्वतःला संपवून टाकावं वाटतंय, मी समजावलं पण होतं. पण मला माहीत नव्हतं ही एवढा झट की पट कारभार करल. मला एसएमएस केला, मी स्वतःला संपवून घेतेय. आलो तर गोळया घेतच होत्या.

अमृताः का केलंस तू हे?

राधिका काहीच बोलत नाही.

अमृताः का केलंस? आणखी वाईट व्हायला?

राधिका नकारार्थी मान डोलावते.

अमृताः मग काय? दिलास तो त्रास कमी नाही का? सतत मला फोन, मेसेज! का ऐकून घ्यायचं मी तुझं का विश्वास ठेवायचा?

राधिकाः हिम्मत... तो बॉक्स काढ जरा...

हिम्मत वर चढतो. एक बॉक्स काढतो.

राधिकाः ओत खाली.

हिम्मत तिच्याकडे पहातो. बॉक्स खाली ओततो. त्यातून काही गिफ्टस, ह्रषि आणि राधिका चे फोटोज, वस्तू सगळं पडतं. अमृता त्याकडे पहाते. अवाक होते. ह्रषि आणि राधिकाचे फोटो दिसतात.

Cut To...

राधिका बसलेलीच आहे. अमृता तिच्या गादीवरच बसलेली आहे. हिम्मत समोर उभा आहे.

राधिकाः आईनी जो मुलगा दाखवला, त्याला भेटले आणि दोन महिन्यात त्याच्याशी एंगेजमेंट केली. मग लग्न करुन अमेरिकेला गेले.

अमृताः तुझं लग्न झालंय?

राधिकाः डिव्होर्सही झालाय माझा.

हिम्मत मान खाली घालतो. इकडे तिकडे पहातो. अमृता स्तब्ध आहे

राधिकाः लग्नानंतर एक वर्ष मी कसंबसं दडपणाखाली काढलं. दिवसभर त्याचं काम करुन तो यायचा, तो पर्यंत माझा पुतळा व्हायचा... माझ्या दिसण्यावरन पसेसिव्ह होऊन त्यानं माझं इंटरनेट वापरणं बंद केलं, मला तो घराबाहेर पडला तरच पडायचं वगैर सांगायला लागला, माझा फोन चेक करायला लागला, मी एकदा एका मित्राला भेटून येताना उशीर झाला तर आल्यावर पटटयानी मारलं त्यानी मला... बरं बोलायला कुणी नाही, कुणाला सांगायची सोय

नाही, इकडे सगळयांना वाटलं मला जॅकपॉट लागला... मी कशी पळून आलेय ना माझं मला माहीती!

अमृताः (तिच्याकडे पहात) मला हे काहीच माहीत नव्हतं, पण मला कळू शकतं...

राधिकाः नाही अमृता, तुम्हाला कोणालाही कळू शकत नाही की लग्न अनसक्सेसफुल होतं म्हणजे नेमकं काय होतं? लग्न मोडून मुलगी घरी आली की तिला कशा कशाला तोंड दयायला लागतं. नवरा फक्त त्याला हवा तसा आणि हवा तेव्हा सेक्स करत राहीला की किती हेल्पलेस वाटतं. लोकांचा नजरा, डिव्होर्सी आहे म्हणजे अव्हेलेबल आहे असा समज, मग तशा इंडीकेशन्स. मी सगळं सहन केलं. मग मागे टाकून दिलं. पोस्ट ग्रॅज्युऐशन केलं. नोकरी मिळवली. आणि हृषिच्या कंपनीत जॉईन झाले. (थांबते. तिच्याकडे पहात) आमच्यात जे काही झालं, त्यावेळेला मला जेन्युइनली त्याच्याशी फिजीकल व्हायचं होतं. पण तो शेवट पर्यंत नाही म्हणत होता.

अमृताः (प्रंचड धक्यात आहे. धक्यातून बाहेर येते.) कुठाय तो? (फोन घेते.फोन लावते. फोन ऑफ आहे.) मला हृषिला भेटायचंय. (तिथून उठते. पर्स घेते. वळते, राधिकाला ) तू काळजी घे! हिम्मत मला आत्ताच्या आत्ता हृषिला भेटायचंय.

हिम्मतः मी कशाला पाहीजे आता, शोध की स्वतः, मला थोबाडात हाणलीस ना? अजून राम लक्ष्मण सीता आहेत माझ्या गालावर, आई म्हणली काय झालं खोटं सांगितलं, गाडीचं चाक गेलं म्हणून!

राधिका त्याच्याकडे पहाते. अमृता त्याचा हात धरते.

अमृताः जास्त शहाणपणा करु नकोस नाहीतर त्या गालावर पण मारीन! चल...

अमृता त्याला घेऊन तिथून जवळपास पळत जाते.

CUT TO…

67. Int/ Home/Afternoon

जोरजोरात पळण्याचे आवाज येतात. घराचं दार उघडतं. अमृता आत येते. हाक मारत सगळीकडे शोधते. किचन मध्ये जाते, बाथरुममध्ये जाते, हिम्मतराव गॅलरीत पहातो. ह्रषि कुठेच नाहीये. अमृता बेडरुममध्ये येते. फोनवर मावशीचा नंबर टाईप करते.

अमृताः (मावशीला फोन करते.) मावशी ह्रषि आलाय तिकडे? नाही आज रविवार आहे ना! ऑफीसला नसणार. बरं, बघा आला तर सांगा... मी आत्ता आलेय घरी, भेटून सांगते मावशी खूप गोष्टी आहेत, आधी त्याला भेटते. हो तेच माहीत नाही कुठे असेल तो.

फोन ठेवते समोर पहाते. अचानक काहीतरी जाणवतं. ती पुढे चालत चालत येते. फोटोफ्रेम उचलते. त्यात तिच्या आणि हिम्मतच्या फोटोत हिम्मतच्या जागी ह्रषिचा फोटो कट करुन लावलाय. तिच्या डोक्यात झटकन प्रकाश पडतो. हिम्मत आत येतो.

हिम्मतः काय गं? कुठेय काही कळालं का?

अमृताः कळालं.

हिम्मतः चल मग!

अमृताः नाही, मी एकटी जाणारे... तू नको येऊस!

हिम्मतः आँ?

अमृता त्याच्या शेजारुन निघून जाते. तो तिच्याकडे पहातो आणि तिच्या मागे जातो.

CUT TO…

67A. Ext/ Building/Afternoon

हिम्मतराव समोर ती गाडीत बसून एकटी निघून जाते. हिम्मतराव तिच्याकडे पहातो. गालातल्या गालात हसतो. त्याला काहीतरी आठवतं.

हिम्मतरावः आयो, मॅडम...

CUT TO…

68. Int/ Ketki home/ Afternoon

राधिकाची आई रडतीये. शेजारी बहीण आहे. हिम्मत समोर उभा आहे.

आईः तुमच्यामुळे वाचलीये ती. मी आत्ताच हिला म्हणाले, चुकूनही तिच्या मागे लागणार नाही लग्न कर म्हणून. मला ती सुखी हवी होती, आणि माझ्या हातून झालेली पहिली चूक निस्तरायला मी तिला सारखी मागे लागले पण मला हे कळत नव्हतं की त्यामुळे तिला आणखी त्रास होतोय.

हिम्मतः रडू नका, देव आहे लक्षात ठेवा. (देविकाकडे पहात) तुमचं नावं काय?

देविकाः देविका!

हिम्मतः याची कुठंही वाच्यता करु नका. नाहीतर तिला पुन्हा त्याचा त्रास होईल,

आईः तुमचे उपकार कसे फेडू मी?

हिम्मतः हा आहे ना, जाम जुन्या मराठी पिक्चर मधला डायलॉग वाटतो. तुम्हाला करायचं असेल तर शिरा करा. मस्त केळीचे काप बीप टाकून. मी आलोच तिला भेटून.

आईः बर...(आई जाते.)

देविकाः थँक यू!

हिम्मतः आभार प्रदर्शनाचा कार्यक्रम झाला असलं तर जाऊ का आत?

देविका खिन्नपणे हसते...

CUT TO…

गोळयांची बाटली उचलली जाते. हिम्मत बाटली उचलून एक गोळी तोंडात टाकतो.

हिम्मतः पचनाला मस्त आहेत या.

तिच्या शेजारी बसतो. तिच्याकडे पहातो. ती पण हयाच्याकडे पहाते. दोघे पहात रहातात आणि अचानक फुटतात. हसायला लागतात.

हिम्मतः तुझी आई म्हणजे माहेरची साडी आहे एकदम! तुमचे उपकार कसे फेडू? बहीण चांगली आहे मॅडम तुमची, लवकर लग्न केलं का पण?

राधिका त्याच्याकडे पाहून हसतेच आहे. हसता हसता ती रडायला लागते. रडते, तिला रडू अनावर होतं ती हिम्मतला मिठी मारते. ओक्साबोक्शी रडतेय.

हिम्मतः (तिला समजावत) मॅडम, शांत व्हा, ओ मॅडम... शांत व्हा एकदम! फार पाणी वाया घालवू नका, आधीच दुष्काळी परिस्थिती आहे. (तिला धीर देतो. ती डोळे पुसते.) झालं मनावरचं सगळं ओझं हलकं झालं?

ती मान डोलावते.

राधिकाः (रडक्या स्वरात) ते दोघं भेटले पाहीजेत फक्त! बास, बाकी काही नको. तो असला पाहीजे तिथे.

हिम्मतः असला पाहीजे? आहे!

राधिकाः कसं काय?

हिम्मतः आता घरी जाऊन पोस्टकार्ड आणि पत्र ठेऊन आल्यावर कोण गाढव नाही जाणार?

राधिकाः तू?

हिम्मतः मी नाही, मग हू? लक्षात ठेवा असलं हिम्मत तर होईल गम्मत!

दारावर टकटक ऐकू येते.

हिम्मतः (तिकडे बघत ) शिरा झाला एवढयात?

CUT TO…

69. Ext/Light house/ Evening

संध्याकाळी एक गाडी लाईटहाऊस पाशी येऊन थांबते. त्यातून अमृता उतरते. इकडे तिकडे पहाते. चालायला लागते. जिन्यातून चढत चढत वर येते. इकडे तिकडे शोधते आणि दमून उभी रहाते. समोर पहाते.

ह्रषि एका कोपऱ्यापाशी शांत उभा आहे. हातात फुलं आणि केक आहे. तो समोर येतो. दोघं एकमेकांकडे पहातात. काहीच बोलत नाहीत. ती त्याच्या जवळ जाते.

ह्रषिः (तिच्याकडे पहात) कशी आहेस?

अमृताः कशी वाटतेय?

ह्रषिः ड्राईव्ह करुन आलीस?

अमृताः प्रश्न सुचत नाहीयेत का तुला?

ह्रषिः नाही. कारण तू येणार नाहीस असंच वाटत होतं सारखं. तरीही आलो इथे. म्हणलं झाली तर आज आणि इथेच भेट होईल आपली. अमृता मला माफ कर. तुला शहाणं करायच्या नादात मी खूप मूर्खासारखा वागलोय. पण हळूहळू कळुन चुकलंय मला, की तुझ्याशिवाय मी एकटा नाही राहू शकत. आणि ते केवळ आपल्याला एकमेकांची सवय झालीये म्हणून नाही, तर माझं तुझ्यावर मनापासून प्रेम आहे म्हणून. अमृता इतके दिवस मी तुझा नवरा होतो, आता मला तुझा सगळयात जवळचा मित्रही व्हायचंय.

अमृता वळते.

ह्रषिः थांब ना...

ती वळते. त्याच्या समोर उभी रहाते.

अमृताः म्हण प्लीज... थांबतेस का गं अमृता?

हृषिः (रडवेला झालाय. चेहऱ्यावर हसू आणून) प्लीज, थांबतेस का गं अमृता?

तिचे डोळे पाण्याने भरलेत. ती जाऊन त्याला कडकडून मिठी मारते.

CUT TO…

70. Ext/Light house/ Evening

दोघे कठडया जवळ उभे आहेत.

अमृताः तू काय बुलेट चालवायचास? बी ग्रेड फिल्म्स पाहयचास आवडीने? राधिकाला घेऊन मुळशीला जायचास रात्री बेरात्री?

हृषिः तुला कोणी ?

अमृताः राधिकानं सांगीतलं. तिने म्हणून राग आला खूप पण या सगळयात तुझ्या मनाचं काय झालं असेल हयाचा विचार केला आणि वाटलं तुझ्या या वागण्याला, माझी सतत काळजी करण्याला काहीतरी पॉझिटीव्ह बाजू आहे. बरं झालं मला तुझं हे जुनं रुप नव्याने कळालं.

हृषिः या सगळयात तू सुध्दा मला नव्याने कळलीस. अमू, खूप विचार केल्यावर एक साधी गोष्ट जाणवली मला, आपण नवरा बायको असलो तरी दोन वेगळया व्यक्ती आहोत, आपण एकमेकांवर आपापले स्वभाव लादत होतो खरंतर ते जपले पाहीजेत आणि मी जपेन!

दोघं एकमेकांना मिठी मारतात.

CUT TO…

71.

**व्हॉ ओः** हिम्मतराव आणिराधिकाच्या बोलण्याचे आवाज येत रहातात.

हिम्मतः ते सोडा मॅडम, तुम्ही बोला तुमचं काय आता?

राधिकाः माहीत नाही पण मी नवीन पार्टनरचा नक्की विचार करीन.

हिम्मतःसायंटिस्ट चालेन का?

राधिकाः सायंटिस्टला मी चालेन का पण?

हिम्मतः मी नाही, आपला मित्र आहे शैलेश देशपांडे म्हणून!

राधिकाः तुझं काय रे आणि?

हिम्मतः स्लीपींग ब्यूटी! घरी जाऊन झोपणार! दोन दिवस झोप नाही!

राधिकाःपुढचं म्हणजे आयुष्यात पुढचं?

हिम्मतः मी काय चाललोय काझीरंगाला महिनाभर. सुजेन येतीये ब्राझीलवरुन! मला आणि गेंडयांनाही दोघांनाही बरं वाटतं ती आली की! पण मॅडम मला टेंशन होतं हृषिकेशरावांना पोस्टकार्ड मिळतंय का नाही? पण मिळालं असणार शंभर टक्के! त्या शिवाय का गेले असतील...

CUT TO...

Int/ Hrishi Home/ Day

हयावर एक दार दिसतं. दाराच्या खाली मॅट दिसते आणि मॅटच्या खाली पोस्टकार्ड तसंच पडलेलं दिसतं.

CUT TO...

72. Ext/Light house/ Evening

लेन्सवर पाण्याचे थेंब पडतात. हाताने टिपले जातात. अमृता आणि हृषि समोर उभे आहेत. अमृता पाऊस पाऊस ओरडत ते टिपतेय! तो तिच्या गालांना धरतो. ती थांबते. पहात रहाते. दोघे कडकडून मिठी मारतात. वरुन पाऊस पडतोच आहे.

## समाप्त